# किमया

डॉ. सुहास पेठे



आपलं जीवन प्रकाशमय करणारी सोपी विचारसूत्रं

।। श्री ।।

# किमया

(आपलं जीवन प्रकाशमय करणारी सोपी विचारसूत्रं)

डॉ. सुहास पेठे

एम्. ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

किमया
पुस्तकरूपाने प्रकाशित सहावी आवृत्ती : ऑक्टोबर २०१९
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

आकाशवाणीच्या
सहृदय, चिंतनशील,
असंख्य ज्ञात–अज्ञात श्रोत्यांना ...

'किमया'ची
ही नवी विस्तारित आवृत्ती –

– कृतज्ञतापूर्वक अर्पण

– सुहास पेठे

♣

# किमया - चिंतनाची...

आपल्या दैनंदिन आयुष्यात घडणाऱ्या साध्या साध्या घटना अनेकदा आपल्याला अंतर्मुख करतात, एखाद्या मोठ्या तत्त्वावर प्रकाश टाकून जातात - असा मला अनेकदा अनुभव येतो. अशा घटनांवर, तत्त्वांवर अधिक चिंतन घडलं तर या साध्या साध्या वाटणाऱ्या घटना जीवनाला विधायक वळण देणारी सूत्रं देऊन जातात. या अर्थानं चिंतनाच्या 'किमये'चा अनेकदा अनुभव येतो. किमयेची जुनी विद्या ही सोनं करण्याची थोडी फसवी व नकारात्मक विद्या असली तरी ही चिंतनाची 'किमया' मात्र आपलं जीवन सुखी करणारी, कल्याणाचं करणारी, चांगल्या अर्थानं सोन्याचं करणारी विधायक विद्या आहे, असं आढळून येतं.

'जाग'या पुस्तकातून काही वर्षांपूर्वी प्रथम अशी उपयोगी चिंतनसूत्रं प्रसिद्ध झाली. 'जाग'च्या आता सवलतीच्या पाचपेक्षाही जास्त आवृत्ती उत्तम प्रतिसादामुळं प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या नव्या चिंतनसूत्रांची - 'किमया'ची - ही पुढची आवृत्तीही आता प्रकाशित होत आहे. आधीच्या आवृत्तीतली हरिपाठावरील चिंतनं वगळून इतर अनेक नव्या चिंतनांचा आणि विषयांचा समावेश किमयाच्या दुसऱ्या सुधारित आवृत्तीत आधीच केला आहे. हरिपाठावरील सदर चिंतनं त्या विषयावरील इतर अनेक नव्या चिंतनांसह स्वतंत्र पुस्तकरूपानं - हरिपाठपराग - मधून वेगळी प्रसिद्ध झाली आहेतच.

यातील बरीचशी चिंतनं आकाशवाणीच्या सातारा केंद्रावरून वेळोवेळी प्रसारित झाली आहेत. चिंतनांच्या श्रोत्यांचा गेल्या सुमारे दोन दशकांचा ऋणानुबंध स्थापित करणाऱ्या आकाशवाणीचा आणि या प्रेरक श्रोत्यांचा मी ऋणी आहे. मूळ विचारसूत्रं स्पष्ट व्हावीत म्हणून उल्लेखलेल्या बोधकथांच्या कर्त्यांचा व संबंधित प्रकाशकांचा मी आभारी आहे.

नवी आवृत्ती दर्जेदार राहून ती जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचण्यासाठी मदत करणाऱ्या साधक मंडळींचा व अन्य सहकार्याबद्दल संतछायेतील उपासकांचा मी कृतज्ञ आहे.

संतनगरी, सातारा - सुहास पेठे

## ♣ किमया ♣

- अनुक्रम -


| | | |
|---|---|---|
| १. | चांगला फोटो | ७ |
| २. | सावध काम | १० |
| ३. | गळकं पातेलं | १४ |
| ४. | समग्रतेचं भान | १७ |
| ५. | भक्तदर्शन | २० |
| ६. | लागणारा आरसा | २३ |
| ७. | साथीची कला | २६ |
| ८. | कल्पनेतला देव | २९ |
| ९. | छापाच्या मूर्ती | ३२ |
| १०. | लहानांचं मोठेपण | ३५ |
| ११. | चौकटीचे उपयोग | ३८ |
| १२. | यूज अँड यूज | ४१ |
| १३. | अपवाद कुणासाठी ? | ४४ |
| १४. | एक वेगळी श्रीमंती | ४७ |
| १५. | गरजेची विद्या | ५० |
| १६. | प्रश्न वेळ घालवायचा की पुरवायचा? | ५३ |
| १७. | सोयीपुरती समानता | ५६ |
| १८. | काठावर | ५९ |
| १९. | आरसा आणि वृत्ती | ६२ |
| २०. | मदतीचं विश्व | ६५ |

२१. स्वत:चा अडथळा ६८
२२. खरी मदत ७१
२३. प्रश्न सोडवण्याचा मार्ग ७४
२४. दिसणं आणि पाहाणं ७७
२५. मदतीचा सुवर्णमध्य ८०
२६. सुशिक्षितपणाच्या खुणा ८३
२७. अज्ञानाचं ज्ञान ८६
२८. विकासाची वाट ८९
२९. स्वत:साठीही जगा ९२
३०. बोलकी मदत ९५
३१. एक विश्वासू हितचिंतक ९८
३२. नकोशी मदत १०१
३३. सामर्थ्याची साधना १०४
३४. साधेपणाची गरज १०७
३५. खरा वापर ११०
३६. विधायक नकार ११३
३७. अडचणीचे देव ११६
३८. खारीचा वाटा ११९
३९. देणारे भक्त १२४
४०. दुसऱ्यांचा प्रपंच १२७
४१. आरास १३०
४२. तुलनेतलं तारतम्य १३३
४३. किमया १३६



## १. चांगला फोटो

काही कारणानं मला एक फोटो लागायचा होता. जुना हाताशी तयार नाही, म्हणून नवाच काढून घ्यावा अशा हेतूनं चटकन फोटो देणाऱ्या फोटोग्राफरकडं गेलो. एक मिनिटांत फोटो ही पाटी मी जाता येता तिथं पाहात असे. म्हटलं उगीच वेळही जायला नको आणि जलद फोटो कसा निघतो तेही कळेल. फोटोग्राफरनीही बोर्ड लावल्याप्रमाणं त्वरित फोटो काढून दिला. वरवर पाहिला आणि गडबडीत असल्यानं पाकिटात ठेवून घरी परतलो.

घरी आल्यावर, फोटो नीट पाहिल्यावर लक्षात आलं की,फोटो काही बरोबर आला नाही.एकदा वाटलं की,हे झटपट काम करणाऱ्यांचं असलंच काम असतं. पटकन कॉम्प्युटरवर काहीतरी करतात, त्यामुळं दर्जेदार काम होत नाही. पैसे अक्कलखाती गेले असं मानून आमच्या नेहमीच्या शांतपणे फोटो काढणाऱ्या कलाकाराकडं गेलो. त्यानं नेहमीच्या पद्धतीनं, सफाईनं, कौशल्यानं फोटो काढला.

दुसरे दिवशी तो फोटो घेऊन घरी आलो. शांतपणानं पाहिला, तोही पसंत पडला नाही. इतका वेळ देऊन हाही फोटो बरोबर आला नाही, याचं आश्चर्य वाटलं. मी स्वत:च क्षणभर आरशासमोर उभा राहिलो, विचार केला की, आपला फोटो बरोबर का येत नाही?

ते सारं पाहाणाऱ्या माझ्या पत्नीनं विचारलं, हा काय प्रकार आहे? मी म्हटलं की, हे फोटोग्राफर काही बरोबर फोटो काढत नाहीत. त्यावर तिनं विचारलं की, फोटो तर अगदी नेहमीसारखेच आहेत, कुठं काय चुकलं आहे? तेव्हा मी तिला म्हटलं की, बारकाईनं पाहा बरं, किती रागीट चेहरा दिसतो आहे ! ती म्हणाली, मग बरोबरच आहे अगदी हुबेहूबच आहे, एवढ्याचसाठी उगाचच तुम्ही दोनदोनदा फोटो काढलेत ! माझा चेहरा नकळतच पडला.

आपण रागीट आहोत, तसाच फोटो येणं हे नॅचरल-अगदी सहजच आहे, हे सगळं जरी खरं असलं तरी ते ऐकल्यावर माझा चेहरा वेगळ्या अर्थानं फोटो काढण्यासारखा झाला असावा! त्यामुळं पत्नी समजावण्याच्या सुरात म्हणाली,'अहो, त्यात काही एवढं वाईट वाटून घेण्यासारखं नाही, फोटोग्राफरवर रागावण्यासारखंही काही नाही! फोटो बदलायला हवा असला तर माणसाचा चेहरा नको का बदलायला?'

हे वाक्य सहजच उच्चारलेलं असलं तरी त्यातला अर्थ त्याही पलीकडचा होता. कृष्णमूर्तींसारख्या अनेक थोर तत्त्वचिंतकांची आठवण करून देणारा होता. माणसाचा नुसता चेहराच नव्हे, तर त्याच्या अंतरंगात बदल व्हायला हवा होता, तर बाहेरचा बदल आपोआपच होणार होता. फोटोतला बदल तर करायची वेगळी गरजच नव्हती, तो तर सहजच घडायचा होता.

अनेक तत्त्वचिंतकांनी, महात्म्यांनी हे अनेकदा अधोरेखित केलेलं आहे. अनेक क्षेत्रात पदोपदी ते अनुभवायला येतं. त्याला दोन बाजू आहेत. त्या उदाहरणानंच पाहू या. समजा एखाद्याचं गाणं चांगलं होत नसेल आणि हे जर त्याला एखाद्या श्रोत्यानं, जाणकारानं सांगितलं तर तो गायक अंतर्मुख होण्याऐवजी नाराज होतो.

मग पुढं दोन गोष्टी होतात. एका बाजूनं तो श्रोत्यांवरच पक्षपातीपणाचे आरोप करील, त्यांच्याच जाणकारीवर शंका व्यक्त करील, दुसऱ्या बाजूला तो माईक, खाणंपिणं, हवा अशा कुठल्या बाह्य गोष्टीला दोष देईल. एकूण या कुठल्याही बाजूनं विचार करीत राहिला, तर गायकाला स्वत:ला क्षणभर समाधान मिळेल, सुटका झाल्यासारखं वाटेल.

पण याची खरी विधायक बाजू ही, की त्यानं त्याच्या गाण्याचं आत्मपरीक्षण करावं ! एखादा श्रोता किंवा जाणकार मुद्दामच त्याला नाउमेद करीत असेल तर तो अपवाद सोडून द्यावा. पण

त्यांच्या प्रतिक्रियेतलं घेण्यासारखं ते घेऊन त्याच्या साहाय्यानं आपल्या गाण्यातल्या त्रुटी दूर कराव्या, रियाज वाढवावा, गाणं आपोआपच चांगलं होईल, प्रतिक्रिया चांगली येईल हे काही वेगळं सांगायला नकोच.

पण हे लक्षात न घेतल्यानं अनेकदा एकमेकांबद्दल समज-गैरसमज, वेळी वितुष्ट, वादविवाद या साऱ्यांना उगीचच तोंड द्यावं लागतं.परस्परसंबंधांची, स्वत:च्या व्यक्तित्वाच्या विकासाचीही हानीही होते. ही गोष्ट व्यावसायिक यशाबद्दल होते, परीक्षेतल्या चांगल्या मार्कांबद्दल होते, घरच्या आदर्श वातावरणाबद्दल होते, उत्तम चित्र किंवा एखाद्या अशा कलाकृतीबद्दल होते, दर्जेदार स्वयंपाकाबद्दल होते, उत्तम पिकाबद्दल होते-जीवनातल्या कुठल्याही अंगातल्या चांगल्या स्थितीबद्दल होते. प्रत्येकाला उत्तम स्थिती हवीशी वाटते, उत्तम कामगिरी करावीशी वाटते. पण दुर्दैवानं ती न करता आली तर मी दिला तसा फोटोग्राफरला दोष द्यावासा वाटतो, चेहरा बदलावासा वाटत नाही, त्याहीमागे जाऊन आतली वृत्ती बदलावीशी वाटत नाही तोवर प्रगतीही नाही आणि इतर नुकसानं मात्र आहेत.

म्हणून पटतं आहे की, चांगला फोटो येणं फोटोग्राफरपेक्षा आपल्याच हातात जास्ती आहे, क्षेत्र कुठलंही असो !

***

## २. सावध काम

आयुष्यातल्या वेगवेगळ्या गोष्टी साध्य व्हाव्या, मार्गी लागाव्या म्हणून प्रत्येक माणसाची धडपड सुरू असते आणि ते योग्यच आहे. अगदी नकळतं लहान वय सोडून द्या, पण शाळेचा, बालपणाचा टप्पा पार केला की, माणूस साऱ्या गोष्टींकडं जबाबदारीनं पाहायला लागतो. मग ते उच्च शिक्षण असो, वैवाहिक जीवन असो, सामाजिक जबाबदाऱ्या असोत, व्यावसायिक कामं असोत, नोकरीच्या निमित्तानं करावे लागणारे वेगवेगळे उपक्रम असोत, कौटुंबिक प्रसंग असोत - प्रत्येक गोष्टीकडं जबाबदारीनं बघण्याचा त्याचा दृष्टिकोन हळूहळू तयार व्हायला लागतो. त्यानुसार एकेक गोष्ट पुरी करून तो ती हातावेगळी करतो, हे रास्तच आहे.

अर्थात माणसाचं आयुष्यच मुळात इतकं व्यापक आहे की, एक काम संपवावं तो दुसरं अगदी रांग लावल्यासारखं पुढं उभं असतं. एकापुढं एक अशी कामं संपवू शकणाऱ्या लोकांच्या हातून खूप कामं होऊ शकतात, खूप जबाबदाऱ्या ते पेलू शकतात. ते लौकिकदृष्ट्या यशस्वीही होतात.

हा सारा विचार मलाही इतके दिवस सरळ, सोपा आणि योग्य वाटत होता. त्यातही मला पुन्हा अशा सतत कामात राहाणाऱ्या मंडळींचं मोठं कौतुकही वाटत असे. कारण इतकं कामात राहाणं हे तसं कठीणच. पण क्षणभर यालाही दुसरी मोठी बाजू असेल आणि तीही तितकीच मोलाची असेल हे माझ्या एकदा सहजच लक्षात आलं.

आमच्या परिचयाच्या एका गृहस्थांचं घर बांधायचं कित्येक वर्षांचं स्वप्न होतं, ते स्वाभाविकच आहे. अनेक वर्षं त्यासाठी राबून त्यांनी ते स्वप्न पुरं करीत आणलं. त्यांच्या त्या आनंदात सहभागी व्हायला, ते घर पाहायला मी जाऊनही आलो. त्यानंतर वर्ष-सहा

महिने गेले, तरी त्यांची पूर्वीसारखी फिरायला जाताना, मंडईत भेट होईना.

म्हणून चौकशी करायला घरी गेलो.घर बांधायला लागायच्या पूर्वी त्यांची व्यायामाची, रोजची फिरण्याची चक्कर अगदी नियमित होत असे. घर बांधण्याच्या वर्षभरात त्यात खंड पडला, अनियमितता आली, हे समजण्यासारखं होतं. पण आता ते सारं काम संपूनही वर्ष झालं तरी हे का भेटेनात असं वाटू लागलं. म्हणून एक दिवशी चौकशी केली, तर ते बंगल्याच्या पिछाडीला होते.

मी गेल्यावर त्यांना आनंद झाला. पाहिलं तर त्यांची तब्येत रोडावलेली दिसली, अधिक चौकशी करता काही आजारही मागे लागल्याचं कळलं. मोठ्या उत्साहानं त्यांनी बंगल्याच्या साऱ्या बाजूंना हिंडवून आणलं. त्यांची देवाधर्माची आवड मला माहीत होती. बाजारातून ते नियमित फुलं आणीत.पण फुलवाल्याच्या शिळ्यापाक्या आणि त्याच त्या फुलांवर ते नाखूष असत, हेही मला ठाऊक होतं. त्यामुळं बंगल्याभोवती चार प्रकारची फुलं ते लावणार ही मला अपेक्षा होती, त्यांच्या बोलण्यातही तसं आलं होतं.

बंगल्याभोवती फिरताना त्यांनी उत्साहानं फुलबाग दाखवली. नुसती दाखवली नव्हे, ती दाखवून संपता संपेना. कारण असं की, देवाला लाल फूल पाहिजे इथंपर्यंत ठीक होतं, पण एकदोन करता करता लाल फुलं देऊ शकणाऱ्या जवळपास वीसेक प्रकारांची लागवड त्यांनी केली होती. तीच गोष्ट इतर फुलांच्या प्रकारांची होती. एखादा गुलाब किंवा जास्वंद ठीक होती, पण त्या प्रकारची बारा-बारा, चौदा-चौदा रोपं मोठ्या कष्टानं मिळवून त्यांनी वाढवली होती.

त्यांच्या घरातला देव्हारा मात्र मला क्षणभर आठवला. देव्हारा मुळात लहान. त्यात देव कमी. अख्खा देव्हारा देवांसह मढवून काढला तरी यांतली पाच टक्के फुलंसुद्धा लागली नसती.

मग इतक्या फुलांचं करता काय असं विचारल्यावर मात्र त्यांचा चेहरा जरासा बदलला. म्हणाले, अनेक फुलं न काढल्यानं गळून पडून वाया जातात, लोकांना वाटतो, काही लोक काढून नेतात, तरी या साऱ्याचा डोक्याला ताप होतो, हे मात्र खरं !

मग इतर गप्पांतून कळलं की, अलीकडं त्यांना त्यामुळंच फिरायला वेळ मिळत नाही, त्यांना त्यांच्या संगीताच्या आवडीकडं लक्ष द्यायला होत नाही, ऑफिसमध्येही अनेकदा हाच विषय डोक्यात राहतो, पूर्वी दोन सामाजिक संस्थांसाठी ते वेळ देत, तिकडं तर वार्षिक सभेला जाणंसुद्धा त्यांना होत नाही.

मला क्षणभर श्री निसर्गदत्तांच्या एका वाक्याची आठवण झाली. ते म्हणत की,'जगामध्ये कामं करणं कठीणच आहे, पण अनावश्यक कामांपासून दूर राहाणं त्याहीपेक्षा कठीण आहे.' देवासाठी लागणारी चार फुलं लावणं-मिळवणं एवढ्यापुरताच त्यांच्या दृष्टीनं आवश्यक असलेला उद्योग आता सावध न राहिल्यानं वाढत वाढत त्यांचा वेळ, तब्येत, मन:स्थिती, सामाजिक कामं सगळ्याला खात सुटून त्यांचंच नुकसान घडवू पाहात होता.

ही गोष्ट काही त्यांच्याच बाबतीतली होती असं नाही. पोटासाठी जमीन पाहिजे हे स्वाभाविक आहे. त्यासाठी जमिनीचा तुकडा मिळावा म्हणून किंवा तो अपुरा पडला तर त्याला गरजेसाठी दुसरा एखादा तुकडा जोडण्यासाठी रास्तपणे धडपडणारा शेतकरी आपण समजू शकतो. पण अनेकदा तोच बेसावध झाला तर पोटापुरतं मिळूनसुद्धा किंवा भविष्याची तरतूद करूनसुद्धा जमिनीला जमीन जोडण्याचा त्याला नाद कधी लागतो हे कळत नाही. शेवटी होतं असं की त्यातच सापडून तो इतकी जमीन गोळा करून आयुष्य संपवतो की,अखेर त्या प्रचंड जमिनीवरून फक्त वारसातली भांडणंच उरावीत!

तीच गोष्ट शिक्षणाची आवड असणाऱ्यांची. गरजेपोटी शिक्षण घेता घेता सवय पडून बेसावधपणानं हळूहळू नुसत्या पदव्यांची रास

रचून समाधानाच्या किंवा समाज - हिताच्या किंवा कौटुंबिक हिताच्या बाबतीत रिकामे राहाणारे खूप लोक आपण पाहिले असतील.

अशा वेळी आपलं कोणतंही काम गरजेपलीकडं जाऊन आपल्या इतर विकासाच्या बाबतीत अडथळा तर ठरणार नाही ना, यासाठी सावध राहाणं हिताचं ठरेल, असं म्हणावंसं वाटतं.

***

## ३. गळकं पातेलं

सकाळ सकाळी दूधवाल्याची बेल झाली. घरातल्या लहान मुलानं ती ऐकली. तो दूध घेण्यासाठी पातेलं घेऊन धावला. त्याच्या आईनं त्याला अडवलं. सांगितलं, अरे ते पातेलं गळकं आहे, दुसरं घेऊन ये. त्यानं दुसरं जरा धड बघून आणलं. आईनं ते भांडं पाहून ते विरजणाचं आहे, म्हणून त्याला परत आत पाठवलं आणि दुसऱ्या फळीवरचं पातेलं आणायला सांगितलं. ते त्यानं बरोबर आणल्यावर आईनं त्यात दूध घेतलं. मूल लहान असल्यानं काहीतरी चुकलं म्हणून आपल्याला दोन वेळा पातेलं बदलायला लावलं एवढंच त्याला वाटलं, क्षणभर रागही आला. आईला मदत करायलाच नको असंही कदाचित त्याच्या मनात आलं असावं.

त्यावरून गुजराथीतल्या एका फार जुन्या कथेची मला आठवण झाली. झुनून नावाचा एक थोर साधू पूर्वीच्या काळी होऊन गेला. अनेक लोक त्याच्याकडं आत्मविद्या, ईश्वरविद्या शिकण्यासाठी दूरदूरच्या देशांतून येत. त्याच्या उपदेशानं पावन होऊन पुन्हा आपल्या गावी जात. पण झुनूनची शिकवण्याची पद्धत मात्र ठोकळेबाज नव्हती, तो वेगवेगळ्या पद्धतीनं शिकवीत असे.

असाच एक नवा विद्यार्थी त्याच्याकडं शिकण्यासाठी दाखल झाला. त्याला झुनूननं ठेवून घेतलं. कशासाठी आलास वगैरेसुद्धा विचारलं नाही. याला वाटलं एकदोन दिवसांनी आपली विचारपूस होईल, आपला नंबर लागेल. एकदोन आठवडे नव्हे, महिने नव्हे तब्बल चार वर्षं लोटली. तेव्हा झुनूननं त्याला विचारलं,'तू इथं कशासाठी आला आहेस?' विद्यार्थी खूष झाला. उत्तरला,'आत्मविद्या शिकण्यासाठी.' गुरू काहीच बोलले नाहीत.

शेजारी उभ्या असलेल्या नोकराला बोलावून त्यांनी विचारलं की,'पेटी तयार आहे का?' त्यानं होकार देऊन एक छोटीशी लाकडी

पेटी समोर आणून ठेवली. झुनूननी या विद्यार्थ्याला सांगितलं की,'शेजारच्या गावी नदीच्या पलीकडं जो आश्रम आहे त्यात एक गुरू राहातात. त्यांना ही पेटी देऊन ये. नीट दे. हरवू नको. अशीच्या अशी ने. वाटेत कुणाकडं देऊ नको. तिथं गेल्यावरसुद्धा त्या गुरूंच्याच हाती दे. हे काम करून परत आलास की, तुला आत्मविद्येची दीक्षा देईन.'

काम फारच सोपं होतं. छोटीशीच परीक्षा म्हणून मोठ्या आत्मविश्वासानं ती एवढीशी पेटी या शिष्यानं उचलली. ती तर वजनालाही फारच हलकी होती. नेण्यात काहीच कठीण नव्हतं. आता फक्त नदी पार करून पेटी सुखरूप देऊन लवकरात लवकर परतायचं की काम झालं, या विचारात विद्यार्थी झपाझप गावाबाहेर निघाला.

नदी जवळ आल्यावर तो थकून गेला. त्यानं थोडा वेळ झाडाखाली थांबून विश्रांती घ्यायची ठरवली. बसल्या बसल्या पेटीकडं पाहाताना त्याच्या मनात विचार आला, पेटी तर फारच छान आहे, साधी आहे, शिवाय पेटीला नुसती कडी आहे, कुलूपसुद्धा नाही. म्हणजे काहीच महत्त्वाचं असणार नाही. काही नसेलसुद्धा कदाचित. नुसती उघडून बघायला काही हरकत नाही. क्षणाचं काम, लगेच बंद करून जशीच्या तशी पोच करू. आता नदीपलीकडं तर आश्रम आहे. नदी ओलांडल्यावर संधी मिळायची नाही.

म्हणून इकडंतिकडं पाहून त्यानं हळूच पेटीचं झाकण उघडलं. उघडता क्षणीच एक छोटासा उंदीर पटकन उडी मारून निघून गेला. पेटीत आणखी काहीच नव्हतं. त्यानं झाकण बंद केलं. पेटी घेऊन चालायला सुरुवात केली.

मग त्याला वाटायला लागलं की, यात काहीतरी गफलत झाली. त्याला त्या गुरूंची गाठ घेणंही अपराधी वाटू लागलं आणि परतणं त्याहीपेक्षा कठीण वाटू लागलं. अखेरीस त्यानं तो आश्रम गाठला, त्या गुरूंची भेट घेतली, पेटी दिली, मान खाली घालून उभा

राहिला.

त्या गुरूंनी पेटी उघडताच त्यांच्या सारा प्रकार लक्षात आला. ते म्हणाले,'ही तुझ्या चित्ताची परीक्षा होती. एक चांगली संधी तू गमावलीस. गुरूंनी सांगितलेली आज्ञा पाळताना तुझ्या मनावर जर तुझा एवढाही संयम राहिला नसेल, तर त्यांना जी मोलाची आत्मविद्या तुला द्यायची आहे, ती तू कशी सांभाळू शकशील? तू पुन्हा तयारी कर. संयम संपादन कर आणि झुनूनकडं जा.' शिष्यानं कठोर साधन करून ते साध्य केलं वगैरे पुढं आहेच.

पण हे अनेक बाबतीत खरं आहे. विद्यांचेसुद्धा खूप प्रकार असतात. त्या शिकायला, साठवायला लागणारी चित्ताची स्थिती, तयारीसुद्धा वेगवेगळी असते. तशी ती आपली आहे की नाही हे पाहाणं हे गरजेचं नाही का? अगदी जाताजाता शिकण्यापासून ते खूप वर्षं तपश्चर्या करून शिकण्यासारख्या विद्या आजही आहेत. पण त्या आपल्याला याव्या असं वाटत असेल तर त्याला योग्य असं चित्ताचं, मनाचं भांडं आपण नको का मिळवायला? ते न मिळवता शिकायला जाऊ तर अपयश येईल आणि विनाकारण शिकवणाऱ्याला बोल लावू.

साधं दूध घ्यायचं तर दही लावायचं पातेलं चालत नाही, ते गळकंही चालत नाही, मग अशा वैद्यकी, विज्ञान, आत्मज्ञान यांसारख्या विद्या साठवायला उत्तम चित्त लागेल आणि तसं चित्त मिळवण्यासाठी धडपडणं उचित ठरेल, नाही का ?

***

## ४. समग्रतेचं भान

संध्याकाळची वेळ. एका मित्रांबरोबर फिरायला चाललो होतो. समोरून एक गृहस्थ आलेले दिसले. तेही आमचे खूप दिवसांपूर्वीपासूनचे परिचित म्हणून सहज थांबलो. बरेच दिवसांनी भेटल्यामुळं ख्यालीखुशाली विचारणं झालं. मधल्या काळातल्या घटनांची विचारपूस झाली. तोवर माझ्या लक्षातही आलं नव्हतं की, ज्या मित्रांबरोबर मी फिरायला निघालो होतो ते कुठंतरी गेले. मी बोलत थांबलो तेव्हा ते जरा पुढं जाऊन थांबलेले दिसलेसुद्धा होते, पण पुढं दोनचार मिनिटं बोलण्याच्या नादात त्यांच्याकडं लक्ष गेलं नाही. तेवढ्यात ते दिसेनासे झाले. म्हणून तसाच जरा पुढं गेलो. जिथं ते उभे दिसले होते, तिथं आजूबाजूला पाहिलं तर जवळच्या एका दुकानात हे मित्र दुकानदाराशी बोलताना दिसले, म्हटलं बरं झालं, चुकामूक टळली.

मला पाहताच दुकानदाराचा निरोप घेऊन हे मित्र बाहेर आले आणि पुन्हा आमचं फिरणं सुरू झालं. रस्त्यानं जाता जाता मी सहज म्हटलं, अहो ते अमकेअमके गृहस्थ भेटले ना त्यामुळं जरा वेळ गेला. मित्रांनी ते शांतपणानं ऐकून घेतलं, मान हालवली.

ते भेटले, बरेच दिवसांनी भेटले, जुनी ओळख आहे म्हटल्यावर वेळ जाणार या माझ्या साऱ्या म्हणण्याला मित्रानं सहमती दर्शवली, साहजिकच आहे म्हणाले, पुढं हेही म्हणाले की, तुमचा वेळ जाणार म्हणून मी तोपर्यंत जवळच्या दुकानातलं कामही करून घेतलं ! मला तोपर्यंत काहीच लक्षात आलं नाही, पुढं दुसरा काहीतरी विषय बोलताना माझ्या लक्षात अचानक आलं की, या मित्रांची आणि त्या भेटलेल्या गृहस्थांची ओळख होती की ! ते पूर्वी एकाच गल्लीत राहायला होते.

ते आठवताच मी या मित्रांना म्हटलं की, अहो त्या गृहस्थांची

नि तुमची ओळख असेल की खरं, माझ्या लक्षात आलं नाही, तुम्हाला थांबवायला हवं होतं ! मित्र त्यावर म्हणाले, आता तुम्ही म्हणता म्हणून सांगतो. त्यांची माझी चांगली ओळख आहे, खूप जुनी आहे, आम्ही एकाच ठिकाणी राहायला होतो. इतकंच काय त्यांची मुलं एवढीशी होती तेव्हापासून त्यांच्यावर अनेक प्रसंग आलेले मी पाहिले आहेत, अनेक प्रसंगांत त्यांना कष्टानं, पैशानं, शब्दानं मदत केलेली आहे. पण फक्त एका प्रसंगात माझ्या स्वतःच्याच अडचणींमुळं त्यांच्या मदतीला मला जाता आलं नाही, तेव्हापासून त्यांनी तेवढंच लक्षात ठेवलं. सारी मदत विसरली, ओळखसुद्धा देईनासे झाले. म्हणून ते दिसल्यावर मी मुद्दामच थांबलो नाही. उगीच त्यांना अवघड वाटायला नको.

मला हे ऐकता ऐकताच खिन्नता आली होती. त्यातच भर म्हणून पुढं हे मित्र चालता चालता म्हणाले, अर्थात ते गृहस्थ तसे चांगले आहेत. बहुश्रुत आहेत. त्यांच्या अंगी अनेक कला आहेत. माझी ही एकदाची अडचणीची गोष्ट ते समजून घेऊ शकले नाहीत, एवढंच काय ते ! असू द्या. तेवढ्यानं काही तो माणूस वाईट ठरत नाही. माझ्याकडून मी ओळख ठेवायचा प्रयत्न करतो, पण त्यांना ते आवडत नाही असं लक्षात आल्यावर त्यांना त्रास नको म्हणून मी आपला नेहमीप्रमाणं बाजूला झालो, पुढं झालो. एरवी ते तसे चांगले गृहस्थ आहेत.

फिरणं संपलं. मित्र निघून गेले. पण एक महत्त्वाचं तत्त्वपुन्हा एकदा समोर आलं. ते म्हणजे समग्रतेचं भान.

दहा प्रसंगांत तुमच्यासाठी राबणारा एका प्रसंगी नाही राबला, तर लगेच मनुष्य दहा प्रसंग विसरतो. तेव्हा तो 'समग्रता' विसरतो नाही का? हे काही केवळ एका कुणा माणसाला किंवा एका कुठल्या प्रसंगाला लागू असतं असं नाही. एखाद्या माणसाला चांगला-वाईट ठरवतानासुद्धा अनेकदा त्याच्या अंगच्या पन्नास गुणांकडं दुर्लक्ष करून

त्याच्या एका दोषामुळं माणसं त्याला वाईट ठरवताना आपण पाहात नाही का ?

वर्षभर आपल्या पोटाला पुरणारं अन्न पिकवणारा पाऊस पडताना आपल्याला आनंद होतो. अति उन्हाळ्यानंतर येणाऱ्या त्या पावसाच्या सरींनी माणसाला अवर्णनीय दिलासा मिळतो. मरगळलेली आपली बाग पावसानंतर फुललेली पाहाताना तोच पाऊस उपकारकर्ता वाटतो, बराच वेळ तो पडल्यावर खडखडाट झालेल्या बोअरच्या पाण्याची पातळी वाढली की, पाणी पितानासुद्धा त्याच पावसाचे उपकार आठवतात.

पण एकच दिवस त्यानं येऊन आपल्या महत्त्वाच्या कार्यक्रमाच्या दिवशी हजेरी लावली आणि त्याच्यामुळं आपल्याला नि आपल्या पाहुण्यांना त्रास झाला की मात्र इतक्या सगळ्या बाबतीत चांगला ठरलेला पाऊस एकदम वाईट ठरतो. अशा वेळी जाते ती त्याच्याकडं समग्रतेनं पाहाण्याची दृष्टी! त्यानं आपलंही नुकसान आपण करीत असतो अन् इतरांचंही. कारण आपल्या या समग्रता विसरण्यानं, तात्कालिक, चुकीच्या, त्रासाच्या प्रतिक्रिया देऊन आपण एका बाजूनं अन्याय करतो आणि एक चांगला हितकर्ता गमावतो.

फक्त त्यासाठी आपल्याला समग्रतेचं भान कायम जोपासायला हवं, हे हिताचं ठरेल.

***

देवाला जाणारे अनेक लोक, अनेक भक्त आपण पाहिले असतील. नियमित जाणाऱ्यांपासून कधीकधी, वेळ मिळाला म्हणून, अगदी वेळ जात नाही म्हणून जाणाऱ्यांपर्यंत अनेक प्रकार आपण पाहिले असतील. हे प्रकार कसेही असोत, पण एकदा देवाला गेल्यावर तिथल्या देवाचं दर्शन साधारणपणे अगदी वेळ जात नाही म्हणून देवाला गेलेलासुद्धा घेतो.त्यातही देऊळ खूपच प्रेक्षणीय आहे, म्हणून ते पाहायला गेलेलासुद्धा सहज का होईना देवाचं दर्शन घेऊन जातो आणि बाकीचा सारा वेळ मग मंदिराच्या दर्शनात घालवतो.

यांतलं काहीही असलं तरी खरे जे भक्त नियमितपणे देवदर्शनाला जातात ते तर निष्ठावंतच असतात. विशिष्ट तिथीला, विशिष्ट वारी त्या त्या देवाला ते न चुकता जातात, काही दानधर्म तिथं करतात, तीर्थप्रसाद घेतात, त्यासाठी ते आपला मोलाचा वेळ देतात. त्यासाठी आपली घरची, बाहेरची इतर कामं जलदीनं, वेळेत, जादा कष्ट घेऊन उरकतात - तरीही वर्षानुवर्षं देवदर्शन करूनही त्यांच्या वृत्तीवर, आचरणावर अनेकदा त्याचा परिणाम दिसत नाही, असं आपण पाहिलं असेल. अर्थात इतरांबद्दल अशा तक्रारी करणारे लोक स्वतः अनेकदा काहीच करीत नसतात हा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवला, तरी या म्हणण्यात तथ्य आहे, हे नक्कीच.

अत्यंत नियमानं हे देवदर्शन करूनही त्या व्यक्ती किंवा ते भक्त तसेच लोभी, स्वार्थी, रागीट, मतलबी, दांभिक वगैरे वगैरे का असावेत असा प्रश्न त्यांच्या जवळच्या घरच्यांना किंवा इतरांना खूपदा पडतो. याची अनेक उत्तरं असू शकतात. पण यावरून एका गोष्टीची आठवण मला हमखास होते.

बब्बाजी नावाचे एक गृहस्थ होते. तेही असेच एका देवाचे भक्त होते. स्वाभाविकपणे अगदी लहानपणापासून जवळच्या एका

देवळात ते देवदर्शनाला जात. पुढं शिक्षण झालं. नोकरी सुदैवानं गावीच लागली. देवदर्शनात त्यामुळं खंड पडला नाही. मुलंबाळं मोठी झाली. यांना नातवंडं झाली. पुढं पुढं तब्येत थकत चालली. चालवत होतं तोवर ते अजूनही एकटेच देवाला जात.

काही काळानं त्यांना डोळ्यांचा त्रास सुरू झाला. त्यातूनही जाण्याइतपत दिसत होतं तोवर नियमानं जात. देवासमोर मिनिटभर उभं राहून त्याला डोळे भरून पाहात. पण पुढं डोळ्यांचा आजार वाढला,डोळ्यांचं ऑपरेशन करावं लागलं, डोळ्यांवर पट्ट्या आल्या. दुर्दैवानं ऑपरेशनला यश आलं नाही. बब्बाजींना दृष्टी गमवावी लागली.

स्वाभाविकच त्यांच्या नित्याच्या देवदर्शनाचा प्रश्न आला. डोळे सोडले तर त्यांची एरवीची प्रकृती चांगली होती. म्हणून देवाला जाण्याची वेळ झाली की, आपल्या नातवाला घेऊन ते पूर्वीच्याच वेळी, पूर्वीच्याच नियमितपणे देवदर्शनाला जात. फक्त वेळेच्या बाबतीत ते म्हणत माझ्या हातचं होतं तोवर मी विशिष्ट वेळी जात असे, आता नातवाला बरोबर न्यायचं असतं, त्यामुळं त्याला केव्हा सवड असेल तेव्हा त्याच्या सवडीनं जातो.

असेच एके दिवशी देवदर्शन करून परत येत असताना त्यांच्या ओळखीचे एक गृहस्थ वाटेत भेटले. आंधळेपण येऊनही देवदर्शनाला यांना नियमितपणे जाताना पाहून, न राहवून, इतर गप्पा मारता मारता यांनी बब्बाजींना विचारलं,'बब्बाजी, आता आपल्याला तर काहीच दिसत नाही, मग आपण देवळात का जाता ? तुम्हाला देवदर्शन होऊ शकत नाही. तुम्हाला काही देवाला पाहता येत नाही ना आता ?'

त्यावर बब्बाजी क्षणाचाही विलंब न लावता आश्चर्यानं म्हणाले,'म्हणजे आजवर मी काय फक्त देवाला पाहायला म्हणून देवदर्शनाला जात होतो अशी का तुमची समजूत आहे? मी

पहिल्यापासूनच जो देवाला जातो, तो देवाला पाहायला तर जरूरच जातो, पण त्याचबरोबर तोही मला पाहातो म्हणूनही जातो. त्यामुळं भले आज मला दिसत नाहीसं झालं असलं तरी देव तर मला आजही पाहातोच आहे. त्याला थोडंच दिसत नाहीसं झालं आहे?'विचारणारे स्तिमित झाले, नव्हे जागे झाले हे वेगळं सांगायला नकोच.

मला वाटतं, आपल्या पहिल्या प्रश्नाचं थोडं उत्तर यात आहे. देवाचं आपण दर्शन घेतो आहोत त्यावेळी तरी निदान तोही आपलं दर्शन घेतो आहे, आपल्याला पाहातो आहे ही भावना आपल्या मनात आली तर आपल्या कृतींवर, आपल्या वृत्तींवर ती विधायक परिणाम नक्की घडवून आणील. मग त्या देवदर्शनाचा आपल्या मनावर काही ठसा उमटेल. पुढं दिवसभर व्यवहार करताना तो ठसा आपल्या कृतींना सात्त्विक, योग्य, विधायक दिशा नक्की देईल - ज्याची आज स्वत:ला, कुटुंबाला आणि समाजालाही मोठीच गरज आहे.

पण त्यासाठी देवदर्शनाबरोबरच इकडं 'भक्तदर्शन' सुरू आहे, याबद्दल आपण जागरूक होणं गरजेचं आहे.

***

## ६. लागणारा आरसा

एका गृहस्थांनी उत्सुकतेनं जे. कृष्णमूर्तींचं एक पुस्तक वाचायला नेलं होतं. पण दोनचार दिवसांतच ते गृहस्थ अगदी सकाळीच येऊन ते पुस्तक परत करून गेले. वाचून झालं असेल असं वाटून मी विचारलं,'अरे वा लगेचच संपवलेलं दिसतंय !' त्यावर ते म्हणाले,'नाही हो, एक आठदहाच पानं वाचून झाली.' मग मी म्हटलं की,'मग काय गडबड आहे, सावकाश परत केलं तरी चालेल!'

पण त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसेना, खिन्नताच वाटली. अखेर ते म्हणाले,'नको. त्यानं फार अस्वस्थता येते. त्यांचे विचार तसे कळायला सोपे आहेत. पण ते फारच खरं सांगतात. एवढं पेलत नाही. त्यामुळं मी वाचन थांबवलं !' मी सहज म्हटलं,'खरं तुम्ही एवढं अस्वस्थ होऊ नका, नाही वाचलं तरीही चालेलच, पण कृष्णमूर्तींचं काम थोडं आरशासारखंच आहे.'

हे मी म्हटलं खरं आणि हेअरकटिंग सलूनमधल्या घटनेची मला एकदम आठवण झाली. त्या गृहस्थांना दिलासा देऊन त्यांना रवाना केलं पण ते आरशाचं काही डोक्यातून जाईना. मला अलीकडं बऱ्याचदा असा अनुभव येई की, केशकर्तनालयात गेलं आणि कटिंग सुरू केलं की, एक दहा मिनिटांनी गरगरायला लागे, पोटात ढवळायला लागे.

असं बरेचदा झालं. तसं आटोक्यातलं होतं म्हणून मी ते झालं की, एकदाचा घर गाठी. पुन्हा महिनाभर हा प्रश्न नसल्यानं तो विषय तिथंच राही. प्रत्येक वेळी दुकानात मी विचार करी की असं का व्हावं. योगायोगानं एकदा आदल्या रात्री प्रवासामुळं जागरण झालं होतं. त्यामुळं असं वाटलं की, त्याचा परिणाम असेल.

एकदा वाटलं की, आज आपण सकाळी अनशा पोटी आलो.रात्री नेमकं अगदी कमी जेवलो,त्यामुळं हे चक्कर आल्यासारखं

झालं असेल. पण परवा परवा त्या कोड्याचा उलगडा झाला.

असाच परवा जरा जास्त त्रास झाला आणि शेवटी कटिंग थांबवून मी प्यायला पाणी मागितलं. ते शेजारच्या कारागिराच्या लक्षात येऊन तो चटकन अन् सहजपणे म्हणाला,'अहो काही विशेष नाही. तुम्ही जरा डोळे मिटून घ्या, थोडं पाणी प्या, पाच मिनिटांत चक्कर जाईल. काही नाही झालं, तुम्हाला आरसा लागला असेल !' मी त्याही अवस्थेत विचार करीत होतो, आरसा कसा काय लागला?

नंतर तो कारागीर इतर गिऱ्हाईकांशी गप्पा मारीत होता. ते ऐकताना उलगडा झाला की, हे 'आरसा लागणं' लाक्षणिक अर्थानं आहे. बराच वेळ आरशात स्वत:कडं पाहात राहिलं की, आरसा लागतो. बऱ्याच जणांना असं होतं. ती जिज्ञासा तिथं पुरी झाली.

पण आता ते पुस्तक परत घेताना झालेल्या चर्चेच्या वेळेला माझ्या मनात चमकून गेलं की, अरे या गृहस्थांना आरसा लागला ! हा आरसा आत्मदर्शनाचा होता. साध्या आरशात स्वत:च्या बहिरंगाचं दर्शन घडत राहिलं तरी त्याची एवढी सवय नसल्यानं आपल्याला गरगरतं.

कृष्णमूर्तींसारख्यांच्या लिखाणातून तर आपल्या स्वत:च्याच वृत्तीप्रवृत्ती,खरे स्वभाव,आपल्या तथाकथित चांगल्या वागण्यामागच्या खऱ्या कारणांवर प्रकाश पडून आपल्याला स्वत:च्या अंतरंगाचं इतकं स्वच्छ-निरपेक्ष दर्शन होतं की, हा 'आत्मदर्शना'चा आरसासुद्धा असाच अनेकांना लागतो आणि त्यामुळं त्यांना अस्वस्थता येते.

या अस्वस्थतेला अर्थात घाबरायचं काही कारण नाही. आपण भले साऱ्या जगाला जाणत असू, साऱ्याजगाचं आपल्याला ज्ञान असेल, पण स्वत:ला आपण जसे खरे आहोत तसे पाहाण्याची आपल्याला कधी ना सवय असते, ना प्रसंग. त्यामुळं ही अस्वस्थता येते.

अशा प्रसंगी येणाऱ्या अस्वस्थतेनं गडबडायचं अर्थातच काही

कारण नाही. कारण आत्मदर्शनाची ती पहिली पायरी असते. खऱ्या आनंदाच्या गावी जाण्याची खरी सुरुवात असते. ते काम आपल्या आयुष्यात असे सत्पुरुष आपल्या उपदेशाचा, शिकवणुकीचा आरसा दाखवून करीत असतात.

त्या आरशात डोकावणं आपल्याच हिताचं असतं हे मनाशी बाळगलं म्हणजे झालं !

***

## ७. साथीची कला

जगात इतक्या प्रकारची माणसं आहेत, इतक्या प्रकारची परिस्थिती आहे की, मला अमुकच एका पद्धतीचं काम हवं असं म्हणून कुठं चालणार नाही. तसं ते मिळणारही नाही. याउलट ज्या पद्धतीचं काम वाट्याला येईल ते आनंदानं, जीव ओतून चांगल्यात चांगलं कसं करता येईल हा खरा विचार करण्यासारखा प्रश्न आहे असं वाटतं. त्याचीच एक विद्या म्हणजे साथीची कला होय.

आपण सर्वांनी बहुधा गाण्याचे कार्यक्रम पाहिले असतील. मूळ कार्यक्रम त्या गाणाऱ्याचा असतो. तो अधिक चांगला व्हावा म्हणून त्याच्या बरोबर तबला आणि पेटीवाले साथीदार असतात.

तसा त्यांचाही तो कार्यक्रम असतोच. त्यांनाही स्टेजवर स्थान असतं, मानधन असतं पण त्यांचा तिथला जो रोल असतो, जे काम असतं ते साथीचं असतं आणि हे भान ठेवून ते काम करणारे कलाकार खूप कमी असतात. तबलजी म्हणून ते भले थोर असतील, पेटीवाले म्हणून ते भले तज्ज्ञ असतील, पण मूळ कार्यक्रम गायकाचा आहे हे लक्षात ठेवून त्याला ज्या पद्धतीनं तो प्रस्तुत करायचा असेल त्याला साजेसं वादन करून मूळ कार्यक्रम खुलवणारे, त्याच्या मागंमागं राहून स्वत:च्या वादनकौशल्याचं प्रदर्शन अजिबात न करणारे वादक विरळे असतात.

मूळ गाणारा कदाचित संगीतात त्यांच्यापेक्षा कमी जाणकार असला तरी तसं जाणवू न देता त्याच्या मांडणीला पूरक अशी मदत करील अशी आपल्या साथीची मांडणी करणारे साथीदार हे खरे साथीदार ठरतात हे आपण जाणतोच.

पण याउलट वेळोवेळी त्या मूळ गायकाला अडवणारे, त्याची तालात, सुरात, तानेत परीक्षा पाहाणारे व त्याप्रमाणं वादन करणारे, त्याची अनवधानानं काही चूक झाली तरी ती लक्षात येईल अशा

पद्धतीनं दाखवून देणारे, त्यानं पुढला सूर घ्यायच्या आतच तो आगाऊपणानं घेणारे, वेळी त्याच्यापेक्षा वादनाचा व्हॉल्यूम जास्त ठेवणारे, असेही साथीदार अनेकदा आपण पाहिले असतील.

हे साथीदार व्यक्तिशः कलाकार म्हणून थोर तबलावादक,थोर पेटीवादक असले तरी साथीदार म्हणून ते कच्चे आणि कमी प्रतीचे म्हणावे लागतात. कारण ते स्वतःच्या कलेत कितीही प्रवीण असले तरी साथीच्या कलेत कच्चेच ठरतात. अर्थात ही साथीची कला काही केवळ गाण्याच्या बाबतीत लागू आहे असं नाही.

माणसाला जीवनातसुद्धा कधी गाणाऱ्याची भूमिका असते तर कधी साथीदाराची भूमिका असते. त्या त्या वेळी त्या त्या भूमिकेला साजेसं काम करू शकणारे लोक मूळ काम तर चांगलं होऊ देतातच, पण ते आवडते ठरतात. इतरांना आनंद देणारे ठरतात. हा अनुभवही आपल्याला असेलच.

मग कधी अशी मूळ भूमिका कुटुंबप्रमुखाची असते, कधी ती एखाद्या कुटुंबातल्या माणसाच्या बाबतीतला निर्णय घेण्याची असते. अशा वेळी असे लोक मग ते पुरुष असोत, स्त्री असोत, मुलं असोत आपापला रोल ओळखतात.

कधी कुणाला वैचारिक मदत करण्याची भूमिका असते, कधी सल्ला देण्याची भूमिका असते, कधी स्वतः निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका असते. त्या त्या वेळचं आपलं काम मूळ कार्यक्रम करण्याचं आहे की साथ देण्याचं आहे, हे ओळखून असे लोक तो रोल बरोबर पार पाडतात. त्यावेळी तो तो प्रसंगही सुखरूप पार पडतो, यशस्वी होतो.

याऐवजी आपली साथीची भूमिका सोडून मूळ काम करणाऱ्यावर अतिक्रमण करणारे लोक तो कार्यक्रमही अडचणीत आणतात आणि स्वतःही अडचणीत येतात. असा अनुभव लग्नाचे ठराव, घरजमिनीच्या बाबतीतले घरगुती निर्णय, ऑफिसमधले

कार्यक्रम, कौटुंबिक वेळप्रसंग, सामाजिक संस्थांतले उपक्रम अशा वेळी हमखास येत असलेला आपल्याला दिसेल.

म्हणून आपल्याला परमेश्वरानं एवढीतरी बुद्धी आणि शांतपणे विचार करण्याची क्षमता द्यावी की, माझी भूमिका या प्रसंगात काय आहे, माझ्याकडून ऑफिसच्या, कुटुंबाच्या, जोडीदाराच्या, मित्रांच्या अपेक्षा काय आहेत, ते मला ओळखता यावं आणि त्यानुसार आवश्यक तेवढंच काम मला करता यावं, जे सर्वांच्याच हिताचं ठरेल.

***

## ८. कल्पनेतला देव

तसा माणूस हा स्वत:ला फार बुद्धिमान, हुशार, कर्तबगार, निसर्गावर विजय मिळवणारा, सर्व प्राण्यांपेक्षा विलक्षण प्रगत वगैरे समजत असतो आणि त्या सर्वांतही त्याला त्याचं स्वातंत्र्य फार प्रिय असतं आणि स्वत:ला तो स्वतंत्र समजतो, स्वतंत्र राखायचासुद्धा प्रयत्न करीत असतो.

पण दुर्दैवानं म्हणा किंवा याच्या बेसावधपणामुळं म्हणा, वस्तुस्थिती मात्र अनेकदा फारच वेगळी असल्याचं निदर्शनाला येतं. स्वतंत्रपणा तर सोडाच, पण माणसाच्या वाट्याला आलेली गुलामी इतक्या प्रकारची असते की, हे लक्षात आलं तर थक्क व्हायला होतं. माणूस कधी पंथाचा गुलाम असतो, मतांचा गुलाम असतो, कुणा व्यक्तीचा गुलाम असतो, एखाद्या संस्थेचा, एखाद्या काल्पनिक व्यवस्थेचा गुलाम असतो. इतकंच काय तो त्याच्या विचारांचा गुलाम असतो, कल्पनांचा गुलाम असतो - सारंच मोठं विलक्षण आहे.

त्याच्या त्याच्या विचारांची, कल्पनांची जेवढी झेप असते तितकीच त्याच्या ध्येयाची, स्वातंत्र्याची - साऱ्याची झेप असते. पण हे फार क्वचित लक्षात येतं. जशी एखाद्याची सुखाची कल्पना, त्याच्या कल्पनेत येऊ शकणाऱ्या सुखाएवढीच मर्यादित असते !

म्हणजे एखाद्याला खाण्यापिण्याची फार आवड असेल तर खाण्यापिण्यातल्या उत्तमात उत्तम, म्हणजे अर्थातच त्याच्या कल्पनेनुसार - उत्तमात उत्तम खाण्यापिण्यापर्यंतच त्याच्या सुखाची मजल जाते. त्याला वाटतं की, ही हद्द झाली. माणूस जास्तीत जास्त एवढंच मिळवू शकतो. इतकाच जास्तीत जास्त सुखी असू शकतो, होऊ शकतो. पण या पलीकडं सुखाची कल्पना गेलेला माणूस यातला अपुरेपणा फारच चटकन ओळखू शकतो, नाही का ?

जी गोष्ट सुखाची आणि ते निर्माण करणाऱ्या आणि मर्यादित

करणाऱ्या कल्पनांची, तीच गोष्ट साक्षात 'देवांची'ही असावी, हे माणसाचंच काय देवाचंही दुर्दैवच म्हणावं लागेल, नाही का ? माणसाचा देवसुद्धा त्याच्या त्याच्या कल्पनेच्या आटोक्यातला, कल्पनेच्या मर्यादेतला असतो हे किती धक्कादायक आहे !

खलिल जिब्रानची एक प्रसिद्ध गोष्ट आहे. एक कुत्रा जंगलातून फिरत जात असताना त्याला खूप मांजरं कळप करून बसलेली दिसली. त्याला आश्चर्य वाटलं. तो अगदी सावधपणानं जपून त्यांच्या जवळच्या झुडुपाजवळ जाऊन बसला आणि गुपचुपपणे काय चाललंय हे पाहू लागला. मांजरं तर सारी शांतपणे डोळे मिटून बसली होती. कुत्र्याच्याही हा प्रकार लक्षात येईना.

इतक्यात त्या कळपातला एक भलामोठा बोका डोळे उघडून बसला आणि गंभीरपणे साऱ्या मांजरांना उद्देशून म्हणाला,'मित्रहो, आपली ही देवाची प्रार्थना आपण श्रद्धेनं अशीच चालू ठेवू या ! अशीच अधिक अधिक श्रद्धेनं आपण प्रार्थना करीत राहू तर देव आकाशातून उंदरांचा पाऊस पाडील !'

हे ऐकल्यावर कुत्रा बसल्या जागीच हसला ! पण जिब्रानच्या गोष्टतली खरी गंमत पुढंच आहे. तो कुत्रा त्या मांजरांच्या कळपाकडं एक तुच्छतेचा कटाक्ष टाकीत तिथून जाताना म्हणाला,'प्रार्थनेनं देव पाऊस पाडतो तो उंदरांचा नसतो, हाडकांचा असतो हे आमच्या ग्रंथांतसुद्धा लिहून ठेवलेलं आहे ! या मूर्खांना काय कळतंय !'

माणसाच्या जगण्याच्या प्रकारची, सवयींची, कल्पनांची मर्यादा त्याच्या 'देवा'लासुद्धा पडते. यावरून आपली तर इतर साऱ्या बाबतीतसुद्धा किती दयनीय अवस्था असेल याची कल्पना येऊ शकते.

माणसाचं त्याहीपुढचं वैशिष्ट्य म्हणजे त्याला पुन्हा दुसऱ्याच्या कल्पना संकुचित आणि हास्यास्पद वाटतात. या वृत्तीनं आपण आयुष्यभर अनेक गोष्टींबद्दल किती संकुचित कल्पना केल्या

असतील, इतरांच्यावर लादल्या असतील, त्यानं केवढं नुकसान झालं असेल याची कल्पना करणंही कठीण आहे. अशा वेळी बाकीचं राहू द्या पण 'देवां'वरसुद्धा आपल्या या कल्पनेच्या गुलामीमुळं केवढा अन्याय आपण करीत असू !

देव असेलच तर त्याचं खरं स्वरूप ओळखायला तरी निदान आपण आपल्या कल्पना बाजूला ठेवून प्रयत्न करू शकू का ?

***

## ९. छापाच्या मूर्ती

माणूस जन्माला येतो, तेव्हा डोळे उघडल्यापासून त्याला कुणी ना कुणी, काही ना काही दिसू लागतं आणि त्यातून त्याचं अनौपचारिक शिक्षण सुरू होतं. दिसण्याबरोबरच कानांवर पडणारे आवाजही त्याच्या शिक्षणात भर घालतात. भाषा असो, पशुपक्ष्यांचे आवाज असोत, तो सारं काही ऐकून-ऐकून तसं करून-करून बऱ्याच गोष्टी शिकतो, आत्मसात करतो. इतरांचं अनुकरण करण्यातून तो बरंच काही शिकतो. हे आपण पाहातोच.

फक्त त्यातून त्याच्या ठिकाणी अशी काही एक प्रवृत्ती नकळत निर्माण होते की, पुढं मोठा-व्यावहारिकदृष्ट्या स्वतंत्र होऊनसुद्धा तो कुणासारखं तरी करण्याचा-वागण्याचा प्रयत्न करीतच राहातो. बरं कुठली एकदम नवीन गोष्ट असली आणि ती प्रथमच पाहिली तर ती समजून शिकून घेण्याचा प्रयत्न एकवेळ ठीक. पण सतत कुणासारखं तरी होण्याचा प्रयत्न करणं म्हणजे ईश्वरानं किंवा निसर्गानं स्वतंत्र होण्याचा, वेगळेपणा टिकवण्याचा माणसाला दिलेला हक्कच नाहीसा करण्यासारखं आहे.

आपण मूर्तींचे कारखाने पाहिले असतील. गणपतीचे असोत किंवा इतर मूर्तींचे असोत. त्या त्या मूर्तीचे एका विशिष्ट प्रकारचे, आकाराचे छाप बनवलेले असतात. जर त्या छापातून काढलेल्या मूर्तीवर व्यक्तिशः वेगवेगळे कष्ट घेतलेले नसतील तर अनेक मूर्ती अक्षरशः एकसारख्या एक दिसतात. त्यांतला वेगळेपणा अक्षरशः शोधावा लागतो.

याउलट निसर्गाची निर्मिती आहे. आजवर कोट्यवधी माणसं जन्माला आली, पण एकासारखा दुसरा चेहरा, आवाज, ठेवण नाही. प्रत्येक निर्मितीवर ती ती निर्मिती वेगळी व्हावी म्हणून निसर्ग किती कष्ट घेत असेल ती कल्पनाही करवत नाही. एकासारखं दिसणारं

जुळं भावंडं हा लाखातला एक अपवाद असेल, पण अगदी निसर्गानं प्रत्येकाला स्वतंत्र आणि वेगळं बनवलेलं दिसेल. निदान आपल्याला कळायला लागल्यावर तरी दुसऱ्याकडं बघून आपलं व्यक्तित्व जरूर घडवावं. पण ते स्वतंत्र घडवावं हे निसर्गक्रमाला धरून नाही का? उलट अतिअनुकरण करून छापाची मूर्ती होणं, हे अनैसर्गिक म्हणावं लागेल.

अनुकरणाचं हे फॅड इतकं नकळत माणसात शिरतं की, ज्याचं अनुकरण करावंसं वाटतं त्याचंसुद्धा माणूस बरंचसं बाह्यांगाचंच अनुकरण करतो. शर्ट, पँट, ड्रेस त्याच्यासारखा करतो, बसणं, उठणं, बोलणं अशा स्टाईल त्याच्यासारख्या करतो.

आपण आजूबाजूला पाहिलं तर असे अनेक लोक दिसतील, युवक दिसतील की, जे असं कुणासारखं तरी होण्याच्या प्रयत्नांत अडकलेले दिसतील. याला कुठल्या क्षेत्राचा अपवाद नाही. समाजकार्य असो, विज्ञान असो, अध्यात्म असो, क्रीडा असो, सिनेमा असो की आणखी काही असो. गुरूसारखा ड्रेस घालून, नटासारखा पोशाख करून, नटीसारखे तसेच केस कापून आणि कुणा विशिष्ट नेत्याची लकब अंगीकारून का कुठं तसं होता येतं ? संगीतातल्या गुरूसारखा वेष करून, त्याच्यासारखं उठणं, बसणं, पाहाणं शिकून का कुठं उस्ताद होता येतं ?

वास्तविक, त्याच्यासारखं व्हायचं असेल तर जे घ्यायचं ते म्हणजे त्याची रियाजाची जिद्द, कलेवरचं प्रेम, साधनेचं सातत्य असल्या आंतरिक गोष्टी घ्यायच्या असतात. ते सोडून त्याच्यासारखे ड्रेस घालून नि बाह्य अनुकरण करून, शब्दांची फेक करून, बाह्यवागण्याचा प्रयत्न करून, तसं होऊ पाहाणाऱ्यांचा प्रयत्न बालिशपणाचा ठरतो, हास्यास्पद ठरतो. माणसाला फारसा उपयोगी पडत नाही, याचं कारण उघड आहे.

एके ठिकाणी मुलांच्या साहसाच्या अनुकरणाची एक छोटीशी

उद्‌बोधक गोष्ट आहे. आठदहा मुलं एकत्र आली होती. ती सतत गोष्टींची पुस्तकं वाचीत. त्यात त्यांनी 'साहसी प्रवासी' हे पुस्तक अन् त्यातली साहसं वाचली. त्यांना ती फारच प्रभावी वाटली आणि त्यांनी त्या साहसाचं अनुकरण करायचं ठरवलं. पुस्तकाप्रमाणं वर म्हटलं तसं बाह्य अनुकरण सुरू झालं.

कथेत वीस मुलं होती. ही आठदहाच होती. म्हणून मोठ्या कष्टानं त्यांनी आणखी दहा मुलं कशीबशी गोळा केली. पुन्हा पुस्तकात पाहिलं. त्यात लिहिलं होतं की, ती वीस मुलं जंगलात जातात. हेही सर्वजण जंगलात गेले. पुढं वाचलं. त्यात लिहिलं होतं मग त्यांच्या अंगावर वाघ येतो. इथं गाडं अडलं. बाह्य अनुकरणाचं गाडं असंच कुठंतरी अडतं. वास्तविक, कथेतून साहस शिकायचं होतं. ते प्रत्येकाच्या वाट्याला येणाऱ्या अडचणीत-प्रसंगांत कसं आणता येईल हा विचार केला असता तर तो उपयोगी पडला असता.

हीच परिस्थिती 'अमुक' होऊ पाहाणाऱ्या अनेकांची होते. मग ते 'विवेकानंद' व्हायचं असो नाहीतर झाकीर हुसेन-शाहरूख किंवा माधुरी व्हायचं असो, मग गाडं अडतं. कारण निसर्गाला स्वतंत्र मूर्ती कितीही चालतात, पण छापाच्या मूर्ती चालत नाहीत !

***

## १०. लहानांचं मोठेपण

सकाळी सकाळी फिरायला गेलो असताना गावाबाहेर असलेल्या आमच्या मित्राच्या बंगल्याजवळ रस्त्याकडेला एक नवी कोरी गाडी लावलेली दिसली. त्यावेळी काही विषय झाला नाही. दुसरे दिवशी ती तिथं नव्हती आणि ते मित्रही गेटवर उभे दिसले, तेव्हा विषय झाला. काल एक नवी गाडी दिसली, त्यांची की काय ? वगैरे.

त्यांनी ते नाकारत म्हटलं, गाडी एका ओळखीच्यांची होती. लग्नाला जायचं म्हणून निघाले. पण लगेचच बंद पडली. फॉल्ट काही लक्षात येईना. वेळ कमी होता. माझी ओळख होती म्हणून ढकलून इथं लावली नि दुसऱ्या वाहनानं लग्नाला गेले. परतल्यावर मॅकॅनिकला आणून दुरुस्ती केली. एक पार्ट गेला होता तो टाकला, रात्री गाडी घेऊन गेले. मी सहज विचारलं,'केवढा पार्ट होता?''छे हो, कुठलं काय, ते म्हणाले, 'दहा रुपयाला मिळतो, मॅकॅनिकचे दहा रुपये, सारी वीस रुपयांची बाब !'

बाब तशी फारच लहान, त्यांच्या दोन-तीन लाखांच्या गाडीच्या मानानं ! पण तिचं महत्त्व एवढं होतं की, वेळेला त्या दोन-तीन लाखांची किंमतसुद्धा तिनं काही काळासाठी शून्य केली. एवढा लहानसा पार्ट एवढं काम करू शकतो, हे कुणी आधी सांगितलं असतं तरी त्या गाडीवाल्यानं त्यावर विश्वास ठेवला नसता. त्याला कारण आपली एक मनोवृत्ती आहे. वस्तूंना, माणसांना लहानमोठं ठरवण्याची यंत्रणा आहे. भले ते आकारानं असो, हृदयानं असो, पैशानं असो, प्रतिष्ठेनं असो, सत्तेनं असो - काहींना लहान ठरवलेलं असतं, काहींना मोठं.

ज्याला लहान ठरवलेलं असतं त्यालाही असं वाटतं की, आपण खरोखरच क्षुद्र आहोत, लहान आहोत, नगण्य आहोत. या

साऱ्या मोठ्यांच्या जगात आपल्यामुळं काही घडणारही नाही नि काही बिघडणारही नाही ! त्यामुळं एक तर अशी छोटेपणा वाट्याला आलेली माणसं खंत करीत, न्यूनगंडात तरी आयुष्य काढतात किंवा अकारण मोठ्यांशी तुलना नि स्पर्धा मांडतात आणि आपलं सारं आयुष्य अस्वस्थतेचं नि संघर्षाचं करून घेतात.

पण वस्तुस्थिती तशी आहे का ? आपण एखादं नाटक पाहायला जातो. प्रत्येकाला भूमिका वाट्याला येते. ती ती तो तो करीत असतो. नायकाची भूमिका 'मोठी', कदाचित तीन तासांत दोनअडीच तासांची असते. पण एखाद्या चपराशाची किंवा आगंतुक पात्राची भूमिका पाचच मिनिटांची असते. चांगल्या अर्थानं पाहिलं तर दोनअडीच तास रंगमंचावर वावरायला मिळूनही जो परिणाम एखाद्या नायकाला 'मोठी' भूमिका करूनही साधता येत नाही, तो परिणाम पाचच मिनिटांच्या भूमिकेत जीव ओतून अत्यंत 'लहान' भूमिका करून एखादा शिपाईसुद्धा साधू शकतो. असा आपला अनुभव नाही का ?

तेच वाईट अर्थानं पाहिलं तर, दोन अडीच तास मेहनत घेऊन मोठी भूमिका सांभाळून साधलेला परिणाम पाचच मिनिटांच्या बेजबाबदार भूमिकेनं, अगदी 'लहानशा' भूमिकेनं एखादं पात्र धुळीला मिळवू शकतं हाही अनुभव आपण घेतो. पण प्रत्यक्षात मात्र माझ्या वाट्याला लहान भूमिका आली म्हणून त्रागा करणारी, गैरसमज करून घेणारी किती पात्रं आपल्याला रंगमंचावरच नव्हे तर आपल्या आयुष्याच्या रंगमंचावरही दिसतात की नाही ?

त्यामुळं आपल्या लक्षात येतं की, खरं तसं लहानमोठेपण हे निरर्थकच असतं. खरा अर्थ असतो तो आपलं नियत काम आपण किती प्रामाणिकपणे जीव ओतून केलं आणि ते करून सारा व्यवहार पार पाडायला आपण किती साथ दिली याला ! कुठल्याच मशीनचे सारेच पार्ट कधीच मोठे नसतात, कुठल्याच नाटकातली सारीच

माणसं नायक नसतात, कुठल्याच संस्थेत सारीच माणसं बॉस नसतात, हे खरंच आहे.

पण याचा अर्थ इतर लहानांना कमी महत्त्व असतं असा नसून त्यांच्या त्यांच्या काम करण्यावर त्यांचं लहानमोठेपण अवलंबून असतं आणि तरच त्या त्या ठिकाणचं कार्य सुरळीतपणे नि यशस्वीपणे चालतं असा खरा अर्थ आहे !

हे लहानाचं मोठेपण ओळखू शकलो तर आपली अकारण स्पर्धा, हेवा, असूया, न्यूनगंड, नैराश्य, खंत ही तर कमी होतातच, पण आपल्या आपल्या जीवनाचं सार्थक कसं करावं ही विद्याही गवसते.

***

## ११. चौकटीचे उपयोग

सांसारिक माणसाला, सामान्य माणसाला चौकटी नवीन नाहीत. घरादारांच्या चौकटी त्याच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. घरात जन्माला आलेलं लहान मूलसुद्धा हळूहळू रांगू लागतं तेव्हा या चौकटीपाशी जाऊन प्रथम अडतं, मागं फिरतं. आपल्या घरातला व्यवहार सुकर व्हावा यासाठी दारं, खिडक्या, झडपं बसवणं सोपं व्हावं म्हणून या चौकटी माणसानं घर बांधताना अपरिहार्यपणे उभ्या केलेल्या आहेत. एरवी चार भिंतींनी बंदिस्त आणि सुरक्षित केलेल्या घरालासुद्धा जर चौकट नसेल तर त्या घराचा उद्देशही सफल होत नाही अन् व्यवहारही सुकर होत नाही.

त्या त्या चौकटीत घराचा उंबराही बसवला जातो. ज्याला अनेकदा अनेक अर्थ प्राप्त होतात. घराच्या चौकटीच्या नि उंबरठ्याच्या आत मुलगा-मुलगी सुरक्षित असल्याचं मानलं जातं. तेच एकदा चौकट सोडून बाहेर पडलं की उघड्या जगात आता मायेनं, आपुलकीनं, आपल्या हितासाठी वागणारं, बोलणारं, झुरणारं कुणी मिळेल याची खात्री देणं अनेकदा कठीण असतं.

पण माणसाच्या जीवनात या चौकटींना आणखीही अर्थ आणि स्थान असतं, नाही का ? त्या त्या घराची, संस्कारांची, जगण्याचीसुद्धा एक न दिसणारी चौकट असते. घरातली माणसं, मुलंबाळं त्या त्या चौकटीतच वावरतात, वागतात. अनेकदा अशी घराची चौकट मोडणं अनेकांना मोठं कठीण पडतं. चौकट ही जशी बंदिस्त होऊ पाहाणाऱ्या घराला आत बाहेर येण्याची एक संधी आणि दिशा देते, तशी संस्कारांच्या दृष्टीनं ती ती विचारसरणी, मतं, पगडे या रूपानं ती ती चौकट त्या त्या व्यक्तींना बंधनात टाकणारीसुद्धा ठरू शकते.

ही चौकट तशी अनेक अर्थांनी अनेक बाबतीत विचार

करण्यासारखी  आहे. जशी संगीतातल्या एखाद्या घराण्याची अवस्था असते. एका विशिष्ट पद्धतीनं रागाची निवड, मांडणी करणं, विस्तार करणं, विशिष्ट प्रकारच्या तानांनी आणि पलट्यांनी तो राग सजवणं, विशिष्टच चीजा त्या रागात गाणं ही त्या त्या घराण्याची एक चौकट असते. त्यामुळं ते ते घराणं स्वतंत्र म्हणून आकाराला येतं.

तशीच एखाद्या मार्क्सवादी, गांधीवादी विचारसरणीची चौकट असू शकते. त्या त्या प्रश्नांचा त्या त्या पद्धतीनं विचार करण्याची ती चौकट असते. मूळ त्या चौकटीमुळं तो तो विशिष्ट वाद आकाराला येतो. जसं येण्याजाण्याच्या बाबतीत चौकटीमुळं एक विशिष्ट निश्चित दिशा आणि आकार प्रत्यक्षात येतो. त्यामुळं एका विशिष्ट दिशेनं विचार करणं शक्य होतं.

काही वेळा घराच्या संरक्षणानं जशी माणसं स्थिर होतात, जीवन जगू शकतात, त्यांची प्रगती साधू शकतात तशी तशी या घराण्यानं, वादानं माणसाची काही सामाजिक, वैचारिक वाढ, विकासही घडतो. तसाच त्याच्या विकासाला या चौकटी कदाचित मर्यादाही घालू शकतील. त्याचा विकासही खुंटवू शकतील.

अनेक संप्रदायांच्या बाबतीतही हे घडलेलं आहे. अनेक संघटनांच्या बाबतीतही हे घडलेलं आहे. विशेषतः युनियन्सच्या विचारांची एक चौकट असते. ती ती व्यक्ती त्या त्या युनियनमुळं आकाराला येते, सुरक्षित होते. पण पुढं पुढं त्याला त्या त्या युनियनच्या मांडणीची, विचारसरणीची, चौकटीची एवढी सवय होते की, एखादी नवीन, अत्यंत सत्य, अनुभवाचा मुद्दा असलेली गोष्टसुद्धा तो त्याच्या युनियनची नाही म्हणून ती दुर्लक्षित करतो, वेळी खोटीसुद्धा मानतो.अशा वेळी हीच चौकट आता उपयोगाबरोबर अडचण निर्माण करणारी झाली आहे हे सहज लक्षात येईल.

तीच गोष्ट आध्यात्मिक, सामाजिक संप्रदायांची आणि त्यांच्या अनुयायांची झाली आहे. त्या त्या सांप्रदायिक चौकटीमुळं आपण

उपकृत झालो आहोत हे जरूर मानावं, पण सारं सत्य केवळ त्यातच असल्याच्या भ्रमात वावरू नये हेही खरं. कारण सत्य ही तशी कुणाच्याच चौकटीत न मावणारी वस्तू आहे. म्हणूनच बहुधा विवेकानंद म्हणत, माणसाला संप्रदायात जन्म येणं भाग्याचं आहे, पण संप्रदायात मृत्यू येणं मात्र दुर्भाग्याचं आहे.

मला वाटतं, यात चौकटीतलं महत्त्वाचं तत्त्वच डोळ्यांआड होतं आहे, ज्यामुळं हे घोटाळे घडताना दिसतात. ते असं की, चौकटीतून माणूस जसा घरात जातो तसा तो घराबाहेरही पडतो, हे आपण विसरतो आहोत. चौकट ही घरात येणं सुकर करण्यासाठी आहे तसं घराबाहेर पडणंही सुकर करण्यासाठी आहे. मग आदानप्रदान आलं की ही अकारण संकुचितता जाईल, पण त्यासाठी चौकटीचे दोन्ही उपयोग लक्षात ठेवणं आणि करणं आवश्यक आहे.

***

## १२. यूज अँड यूज

आजकालच्या जमान्यात अनेक गोष्टी बदलल्या. वापरून स्वच्छ करून पुन्हा पुन्हा वापरण्याच्या वस्तू अनेकांना आवडत नाहीशा झाल्या. मग ते ग्लास असोत, डीश असोत. 'वापरा आणि फेकून द्या'चं युग आलं. शक्यतो बऱ्याचशा वस्तू आता एकदाच वापरायच्या आणि फेकून द्यायच्या असतात.

हे इतकं रूढ झालं की, चांगल्या टिकाऊ वस्तू तयार करणारी अनेक मंडळी आता कमी दर्जाच्या, एकदा वापरून टाकण्याच्या लायकीच्याच वस्तू तयार करण्याचा सराव करू लागली. एकदा ही घसरण सुरू झाली की, भल्याभल्यांचीसुद्धा धारणा कशी बदलते हे मोठं पाहाण्यासारखं आहे. जी माणसं वस्तू टिकाऊ बनवण्यासाठी संशोधन करीत होती, त्यातही किंमत कमी राखून अधिकात अधिक दर्जेदार आणि टिकाऊ वस्तू तयार करण्यात धन्यता मानीत होती तीच आता कमी किमतीत एकदाच वापरण्याच्या लायकीची वस्तू निर्माण करण्याचं संशोधन करून पाहू लागली.

हे डीश आणि ग्लासपुरतं राहिलं नाही. कपडे, घड्याळं, पेनं अशा वस्तूंची यादी हळूहळू वाढत चालल्याचं आपल्याला दिसेल. यूज अँड थ्रो चा जमाना इतका अंगवळणी पडत चालला की पूर्वी फार मतलबी लोक माणसालासुद्धा वापरून फेकून देत, वेळी नष्ट करीत. ती अवस्था, निदान तशी मनोवृत्तीसुद्धा पुढं येईल काय, प्रतिष्ठेची बनेल की काय इथंपर्यंत विचार करायची वेळ आली आहे.

यावर विचार का करायचा तर आज यूज अँड थ्रो चं म्हणून आणलेलं एक पेन मी मित्राकडं पाहिलं. त्यानं कौतुकानं दाखवलं. पण ते इतक्या चांगल्या दर्जाचं होतं की, वापरल्यावरसुद्धा फेकून द्यायची इच्छा होत नव्हती. फेकून देणं म्हणजे एका चांगल्या मटीरियलची, चांगल्या निर्मितीची ती नासधूस वाटत होती आणि ते

खरंही होतं.

अशा कित्येक गोष्टी आज व्यवहारात मातीमोलानं टाकून दिल्या जातात. हा जुन्या भाषेत उतण्यामातण्याचाच प्रकार वाटावा अशी अवस्था आहे. कारण एका बाजूला आपली साधनसंपत्ती घटत चालली आहे, तुटपुंजी ठरते आहे, दुसऱ्या बाजूला लोकसंख्येचा दबाव वाढत चालला आहे, हे आपणच पाहातो आहोत. नाईलाजानं बेकारी, कुपोषण, दारिद्र्य आणि त्यामुळं घडणारी गुन्हेगारी या साऱ्याला तोंड आपणच देतो आहोत आणि दुसऱ्या बाजूला ही 'थ्रो' संस्कृती आपणच कौतुकानं मिरवतो आहोत हे खरोखर विचार करण्यासारखं आहे.

याबाबतीत पूर्वीची माणसं नक्कीच काटेकोर होती. अनेक ऑफिसमध्ये बाहेरून आलेले लिफाफे उलटे करून लिखाणाला वापरण्यात येत होते. गांधीजींची एक गोष्ट आपल्याला जरूर आठवेल. त्यांना कुठलीही वस्तू पूर्ण निरुपयोगी होईपर्यंत वापरणं हे आपलं सार्वजनिक हिताचं कर्तव्य वाटे किंवा तसा वापर न करणं हा सामाजिक गुन्हा वाटे.

ते आगाखान महालात असताना त्यांच्या खोलीतील कॅलेंडरचं तारखेचं पान बदलण्याची जबाबदारी मीराबेनकडं होती. एके दिवशी त्या तापानं आजारी होत्या. त्यामुळं बराच वेळ झाला तरी तारीख बदलली गेली नाही म्हणून मनूबेनला वाटलं हे काम आपण करावं. तिनं उत्साहानं ते कालच्या तारखेचं पान फाडलं आणि खिडकीबाहेर फेकून दिलं.

दुपारी गांधीजींची प्रत्येकाकडं चौकशी सुरू झाली, आज पान कोणी बदललं. अगदी कस्तुरबासुद्धा त्यातून सुटल्या नाहीत. हे जेव्हा मनूबेनला कळलं तेव्हा तिनं अगदी उत्साहानं आणि कौतुकानं आपण ते काम केल्याचं सांगितलं. तिला वाटलं समजून काम केल्याबद्दल गांधीजींकडून शाबासकी मिळेल.

त्यावर गांधीजी म्हणाले,'ते ठीक आहे, पण ते पान कुठं आहे?' ती म्हणाली,'ते मी टाकून दिलं.' गांधीजी म्हणाले,'ते शोधून आण. कालचं फाडलेलं पान इथं एका पॅडला लावलं जातं. ते एका बाजूनं कोरं असतं, त्याचा उपयोग मी लिखाणासाठी करतो.'

आता मात्र मनूबेनचं धाबं दणाणलं. कारण एवढासा तो चिटोरा कुठं शोधणार ? सारा आगाखान महाल कामाला लागला. अखेर बाहेरच्या समाधीच्या कडेला ते पान चुरगळलेल्या अवस्थेत सापडलं. जेव्हा ते गांधीजींना आणून दिलं आणि त्यांनी ते सरळ करून पॅडला लावलं, तेव्हा तो विषय थांबला.

प्रश्न पानाचा नाही, आपल्याला मिळालेल्या वस्तूचा शेवटपर्यंत विधायक कामात उपयोग करण्याचा आहे. जो हे करील त्याला स्वाभाविकच निसर्गही कमी पडू देणार नाही. म्हणून जमाना कसाही असो, थोडा विचार करून आपण वागू शकतो.

निदान यूज अँड थ्रो ऐवजी यूज, यूज अँड थ्रो एवढं तरी अंमलात आणू शकतो. कारण ती वृत्ती अखेर माणसांच्याही वापरापर्यंत पोचणारी आहे आणि एकूणच विचार करण्यासारखी आहे.

***

## १३. अपवाद कुणासाठी ?

नियम, बंधनं या गोष्टी आपल्याला अपरिचित नाहीत. सर्वसामान्य व्यवहारात त्यांचा पदोपदी संबंध येत असतो. अनेक बाबतीत व्यवस्था राहावी, ती नीट चालावी, काही व्यक्तिगत आणि सामाजिक प्रगतीची उद्दिष्टं साध्य व्हावी यासाठी अशा बंधनांची गरज निर्माण झाली आहे, हे आपल्याला ठाऊक आहेच. ती सारी बंधनं साधारणपणे माणसांसाठी आहेत, ती पाळण्यानं त्यांचं स्वत:चं आणि त्यांच्या समूहाचंच कल्याण घडतं हेही आपण जाणतो.

फक्त हे सारं करणारा, पाळणारा पुन्हा माणूसच असल्यानं हा सारा बंधनांचा विषय जरा नाजूकपणेच हाताळावा लागतो. कारण नियम करणाऱ्यालाही स्वत:चा फायदा, स्वार्थ सुटत नाही नि तो पाळणाऱ्यालाही. म्हणून त्यावरही आवर घालण्यासाठी बाह्य गोष्टींतल्या बंधनांबरोबर व्यक्तिगत आंतरिक गोष्टींच्या बाबतीतली म्हणजेच आचारविचार, आहारविहार अशा बाबतीतली नीतीनियमांची बंधनंही ओघानंच आली.

हा सारा विचार मनात कशासाठी आला तर शेजारच्या घरी घडलेली घटना ताजीच होती. दोन मुलांच्यात वाद होता, तो ते त्यांच्या बाबांकडं घेऊन आले होते. धाकट्यानं रोज पूजा करायची ठरलेली होती. त्याची तब्येत बरी नसल्यानं त्यानं दोन दिवस आंघोळ केली नाही. म्हणून त्याच्या आईचं म्हणणं होतं की, आंघोळच केली नाही तर तो पूजा कशी करणार, कारण तसं बंधन नाही का ?

थोरल्याचा मुद्दा होता की, पूजा न करण्यासाठी ही पळवाट त्यानं काढली होती. त्यानं भले आंघोळ न करू द्या, गरम पाण्यानं स्पंजिंग केलं होतं, बाकी धुतलेले कपडे घातले, जेवणबिवण केलं, शाळा केली, थोडासा संध्याकाळी खेळलाही. हे बरोबर होतं. अर्थात हा सारा बंधनाचा नि नियमाचा ऊहापोह करण्याचं थोरल्याचं कारण

वेगळंच होतं, हेही दिसत होतं. कारण धाकट्यानं ती पूजा न केल्यानं, पूर्वी ठरल्याप्रमाणं ती आता थोरल्याला करण्याचं बंधन आलं होतं, त्याचा त्याला त्रास वाटत होता. त्यांच्या वडिलांनी हा वाद पुढं कसा सोडवला हे मला कळलं नाही पण थोर संत चैतन्य महाप्रभूंचे शिष्य ईशान यांच्या एका गोष्टीची मला आठवण झाली.

शेवटच्या बारा वर्षांत चैतन्य महाप्रभू बरेचदा देहभानावर नसत. अखंड ईश्वरचिंतनात असत. त्यामुळं स्वत:ची, देहाची काळजी घेणं दूरच. अशावेळी त्या महात्म्याची अवस्था जाणणारे खरे निष्ठेचे शिष्य ईशान रोज, रात्रंदिवस त्यांच्या देहाची काळजी घेत, देखभाल करीत, सेवा करीत.

एके दिवशी रात्री झोपायला जाण्यापूर्वी नेहमीप्रमाणं ते महाप्रभूंच्या पायाला तेल लावून द्यायला त्यांच्या खोलीत गेले. त्या छोट्याशा खोलीच्या दारातच महाप्रभू ध्यानमग्न अवस्थेमध्ये पडून होते. ते नेमके असे की, त्यांना ओलांडल्याशिवाय आत जाता येणंच शक्य नव्हतं. दुसरा मार्ग नसल्यानं गुरूंना ओलांडून ईशान आत गेले आणि महाप्रभूंच्या चिराळलेल्या पायांना तेलानं मालिश केलं आणि नंतर रात्रभर त्यांच्या पायाशी तसेच बसून राहिले.

पहाटेकेव्हातरी भानावर आल्यावर महाप्रभूंनी पायाशी पेंगणाऱ्या ईशानना आश्चर्यानं विचारलं,'अरे, तुम्ही झोपायला का नाही गेलात ?' ईशाननं सांगितलं की त्यांना ओलांडून बाहेर जाता येत नव्हतं. त्यावर महाप्रभूंनी चकित होऊन विचारलं,'मग आत येताना कसं आलात ?' ईशान शांतपणे म्हणाले,'तुम्हाला ओलांडून!'

महाप्रभू लगेच म्हणाले,'मग तसंच बाहेर जायचं की !' ईशान नम्रपणे म्हणाले, 'प्रभू, आत यायच्या नि बाहेर जायच्या उद्देशात फरक होता. आत यायचं होतं ते तुमची सेवा करायला, पण बाहेर जायचं होतं ते स्वत:ला झोप मिळावी म्हणून, म्हणजेच स्वार्थासाठी. तुमची सेवा करण्यासाठी बंधन मोडलं तरी चालेल, पण स्वार्थासाठी बंधन

मोडणं योग्य नव्हतं !'

मला वाटतं, आपली नेमनियम पाळण्याची कल्पना याच्या किती विरुद्ध आहे ! स्वत:च्या सुखासाठी आपण नियम किंवा बंधनं नाही पाळली तरी चालेल म्हणतो आणि दुसऱ्याच्या कर्तव्याच्या किंवा भगवंताच्या भक्तीच्या बाबतीत मात्र नियमात बसेल तर करू म्हणतो!

आंघोळ केलेली नसतानाही नियमाला अपवाद म्हणून शुचिर्भूतपणे देवाची सेवा केली, तर ती नक्की त्याला पोचली असती. पण आपण ते करीत नाही. त्यामुळंच आपल्याला महाप्रभू किंवा ईशानसारखं आपलं आयुष्य साफल्याचं करता येत नाही. कारण त्यांच्या नियमांना अपवाद दुसऱ्यांसाठी, त्यांच्यावरच्या श्रद्धेसाठी, त्यांच्या भल्यासाठी तर आपला अपवाद फक्त स्वार्थासाठी असतो, नाही का ?

***

## १४. एक वेगळी श्रीमंती

सामान्य माणसाचा व्यवहारातला अनुभव असा आहे की, हळूहळू पै पै जोडून, साठवून त्याच्याकडं साठा निर्माण होतो, तो श्रीमंत होत जातो. खूप काही साठवलेला माणूस समाजात श्रीमंत म्हणून ओळखला जातो, धनिक म्हणून नावाजला जातो. ही सामान्य पद्धत बरोबर आहेच, पण श्रीमंत व्हायची आणखी काही पद्धत असेल असं आपल्याला वाटतही नाही.

असे श्रीमंत लोक हे गोळा करून श्रीमंत झालेले नसून गोळा केलेलं वाटून टाकून श्रीमंत झालेले आढळतात. कारण काही काही बाबतीत अशी गोळा करण्याची श्रीमंती उपयोगी पडत नाही, उलट अडचणीची ठरते. याचं कारण असं की, माणूस मुळात पैसा साठवतो तो गरजेला उपयोगी पडेल म्हणून साठवतो. असा साठवलेला पैसा उपयोगी पडेल अशा खात्रीनं तो वावरतो. पण ते खरं असतंच असं नाही.

या बाबतीत एक गोष्ट मोठी उद्‌बोधक आहे. एका गावी दोन माणसं शेजारी राहात होती. एकाची प्रवृत्ती होती की, सतत काही ना काही मार्गानं पैसा जोडत असावं. शक्यतो स्वत:वरसुद्धा खर्च करू नये. इतरांची तर गोष्टच सोडा.

दुसऱ्याची प्रवृत्ती अशी होती की, योग्य मार्गानंच पैसा मिळवावा. होता होईल तो इतरांच्या वेळ प्रसंगात उपयोगी पडावं. हाताशी असलेल्या पैशातून त्यांनाही मदत करावी. त्यांच्या अडचणींच्या कामी तो पैसा वापरावा. त्यामुळंच याच्याकडं शिल्लक फारसं काही उरत नसे.

पहिला माणूस पैसा साठवून साठवून बऱ्यापैकी श्रीमंत, पैसेवान झाला होता. त्याला नेहमी या दुसऱ्याबद्दल वाईट वाटे. तो म्हणे, याच्यावर वेळप्रसंग आला तर हा काय करील? जे मिळतं तेही

हा उधळून मोकळा होतो. प्रसंगाला याच्यापाशी खर्च करायला काय आहे, पस्तावायची वेळ येईल.

दुर्दैवानं म्हणा, सुदैवानं म्हणा दोघंही यात्रेसाठी खूप लांबच्या प्रवासाला गेले असताना अपघातात सापडले आणि बेशुद्धावस्थेत त्यांना जवळपासच्या शहरातल्या दवाखान्यात नेलं गेलं. दोघांवरही खूप उपचार करावे लागले. प्रचंड पैसा खर्च झाला. जवळपास घरचं कुणीच नव्हतं.

दवाखान्यातून सोडायची वेळ आली तेव्हा दुसऱ्याचे कागदपत्र तयार होऊन तो बाहेर जायला तयार झाला. पहिल्याला मात्र बिल पूर्ण न भरल्यानं सोडलं नव्हतं. तेव्हा पहिल्यानं चौकशी केली की, बिल तर खूपच आहे. मी माझ्या गावी असलेल्या, इतकी वर्षं साठवलेल्या पैशातूनसुद्धा ते पूर्ण भरू शकणार नाही हे दिसतं आहे, तर यानं हे बिल कुठून भरलं आणि इथं परगावी ते कसं भरलं गेलं ?

तेव्हा दवाखान्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं, यांनी किती लोकांच्याकडं किती पैसे दिले आहेत कुणास ठाऊक ? त्यांना दाखल केल्याचं कळल्यापासून लोक उत्स्फूर्तपणे पैसे भरीत आहेत. बिलापेक्षासुद्धा जास्त पैसे यांच्या नावानं येत आहेत. काही लोकांना आम्हाला पैसे स्वीकारायला नकार देऊन परत पाठवावं लागलं.

शेवटी आम्ही लोकांना विचारलं,'तुम्ही यांची बिलं भरण्यासाठी का येता?' त्यावर ते म्हणाले,'हे त्यांचेच पैसे आम्ही त्यांना परत करतो आहोत. वेळेला ते आम्हाला मिळाल्यानं खरं तर आज त्याची कितीतरी पट आम्ही परत करणं योग्य आहे.' एवढं सांगून त्या पहिल्या गृहस्थाला त्यांनी विचारलं,'आपले पैसे भरायला कोणी येणार आहे का?की आपणच आपलं बिल भरणार आहात?'

साठवलेला पैसा असूनही त्याची काही पट व्हायची तर सोडाच पण तो आज मला हाताशीसुद्धा उपयोगाला नाही, त्यात तो असला तरी पुरेसा नाही, उलट भल्याबुऱ्या मार्गानं मिळवल्यानं उलट

घटलाच आहे, हे मनाशी ओळखून पहिला गृहस्थ म्हणाला,'मी माझा पैसा माझ्याकडंच सुरक्षित ठेवल्यानं माझं बिल मलाच भरावं लागेल. तो इतरांकडं सुरक्षित ठेवला असता तर कदाचित माझा पैसा वेळेलाही आला असता आणि वाढलाही असता. पण आता हा धडा इथून पुढं गिरवावा लागेल.'

म्हणून साठवून श्रीमंत होण्याच्या लौकिक मार्गापलीकडं वाटून श्रीमंत होण्याचाही एक मार्ग उपलब्ध असतो, तो अधिक आनंदाचा असतो हे निदान लक्षात तरी घ्यायला हवं नाही का ?

***

त्या दोनही मुली लहानपणापासून माझ्या पाहाण्यात होत्या. दोघीही तशा हुशार होत्या, पण थोरलीच्या स्वत:विषयी काही मोठमोठ्या कल्पना होत्या. हुशारीवरून,शिक्षणावरून, दिसण्यावरून, प्रगतीवरून, तिच्या बोलण्याचालण्यावरून अनेकांना असं वाटे की, ही बहुधा जीवनात काही विलक्षण होणार, एखाद्या क्षेत्रात झेंडा लावणार. मला का कुणास ठाऊक तसं वाटत नसे.

खूप वर्षांनी त्यांची पाठोपाठच भेट झाली. त्यावेळी थोरली बहीण प्रश्न बनून आईवडिलांकडंच राहात होती. धाकटी मात्र कधीच एक प्रपंच उभा करून खाऊनपिऊन सुखी होती. तिचे पाय पूर्वीही जमिनीवरच होते आणि आजही ते जमिनीवरच होते. त्यामुळं ती तिला मिळालेली साधीशी संधीसुद्धा स्वीकारू शकली. भले ती शिकण्याची असो, लग्नाची असो, घरादाराची असो.

आज तिनं आपलं जीवन तर सुखी केलंच होतं आणि तिच्याशी संबंधित नवरा, सासूसासरे, नणंदा, मुलं अशा साऱ्यांचं जीवनही सुखी केलं होतं. दुसरी मात्र तिच्या आयुष्यात तिच्या बऱ्याच अपेक्षांप्रमाणं घडण्याची वाट पहात, जे घडलं त्यात असमाधानी होत, चिडचिड अन् त्राग्यात आपलं आयुष्य कंठीत होती. कारण ते आयुष्य आता तिलाही ओझं ठरलं होतं अन् इतरांनाही ओझं ठरलं होतं.

त्यावरून मला एका गोष्टीची आठवण झाली. पूर्वीच्या काळी मुलांना वेगवेगळ्या आश्रमात शिकण्यासाठी पाठवीत, विद्याही आजच्यासारख्या त्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या असत. अगदी शस्त्रविद्येपासून ईश्वरविद्येपर्यंत !

अशाच एका गृहस्थानं आपल्या चारही मुलांना वेगवेगळ्या ठिकाणी शिकायला रवाना केलं. तिथल्या वातावरणाप्रमाणं, सोयीप्रमाणं, यांच्या आकलनाप्रमाणं शिकून दहाबारा वर्षांनी ते परत

आले. तेव्हा वडिलांनी प्रत्येकाला विचारलं की, तुम्हाला काय काय शिकायला मिळालं, कोणकोणत्या विषयाचा अभ्यास तुम्ही केला? त्यावर प्रत्येकानं आपापला अभ्यास सांगितला. कुणी व्याकरण, कुणी ज्योतिष, कुणी राज्यशास्त्र, कुणी शस्त्रविद्या - नाना तऱ्हेचे अभ्यास ते करून आले होते. एकेकानं एकेक दोनदोन विषयांत प्रावीण्य मिळवलं होतं. साऱ्यांचंच त्या गृहस्थांना मोठं कौतुक वाटलं.

पण एका मुलानं मात्र एक वेगळा विषय अभ्यासला होता. बाकी सारी मुलं आता आपापल्या विद्येनुरूप योग्य व्यवसाय मिळाल्यावर आपण कमावते होऊ असं सांगत होती. तर हा मुलगा म्हणाला, मी यासारख्या विद्येबरोबरच स्वत:चाही अभ्यास करायची विद्या शिकलो आहे.

माझ्या मनात कोणत्याही कल्पना इतरांप्रमाणंच येतात. पण मला गुरूंनी स्वत:च्या आकलनाचीही विद्या दिली आहे. त्यामुळं स्वत:विषयीच्या तटस्थ अभ्यासानं मला माझ्या वस्तुस्थितीचं यथार्थ आकलन होऊ शकतं. त्यामुळं मला माझ्याविषयी, माझ्या शक्तीविषयी, विद्येविषयी, परिस्थितीविषयी, भविष्याविषयी कोणताच भ्रम उत्पन्न होत नाही. त्यामुळं मी आता कोणत्याही परिस्थितीत वावरू शकतो, काम करू शकतो, कमवू शकतो, मला कुठलंच काम हलकं किंवा कमी दर्जाचं वाटत नाही. माझ्यावरच्या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यातही मला या आत्मविद्येची मदत होते.

गृहस्थ प्रसन्न झाले. इतकंच नव्हे तर ही विद्या शिकलेला मुलगा जीवनात उतरल्यापासूनच स्थिर झाला,यशस्वी झाला हे सांगणंच नको. अनेकदा असं वाटतं की, असं काही शिक्षण या मुलींना मिळालं असतं तर ? कदाचित हे चित्र नक्कीच बदललं असतं. विधायक झालं असतं. जरा चांगला आवाज असला, जरा चांगलं डोकं असलं, रूप असलं, विद्या असली की जीवनाबद्दल ज्या अवास्तव अपेक्षा निर्माण होतात. त्यामुळं अगदी सिनेमात पाहावं

तशा ऑफरची वाट पाहाण्यात मोलाची वर्षं घालवणाऱ्या या मुलांना मग नाईलाजानं कुठल्याही तडजोडीला तयार व्हावं लागतं.

याऐवजी थोडी 'आत्मविद्या' पदरात पडली तर वस्तुनिष्ठ दृष्टिकोन येऊन कुवत नसताना कुठली तरी कामं, कोर्स अंगावर घेणं, मग अपयशाशी झगडत राहाणं, अपमानित होणं, जोडीदाराबद्दलच्या अवास्तव अपेक्षा ठेवणं, शेवटी निराश होऊन मग मिळेल ते पत्करणं किंवा अगदी विजोड निकृष्ट परिस्थितीही स्वीकारावी लागणं या साऱ्या यातना नक्की टळतील, नाही का?

स्वत:विषयी जर खरोखरच शिकण्याची संधी वेळीच उपलब्ध झाली तर आपले आपले कल, कुवत, आवडी, क्षमता, घरच्यांची, मदत करणाऱ्यांची परिस्थिती अशा अनेक गोष्टींचं वस्तुनिष्ठ आकलन माणसाच्या जीवनात असले भ्रमाचे मनोरे तर उभे करणं टाळीलच, पण पुढं या मनोऱ्यावरून खड्ड्यात पडून दु:खी होण्याऐवजी प्रत्येकाच्या वाट्याला ठेवलेली निदान हिरवळीची पायवाट चालण्यातला आनंद तरी नक्की देऊ शकतील.

पण त्यासाठी थोडातरी या 'आत्मविद्ये'चा परिचय या लौकिक विद्यांबरोबर गरजेचा आहे.

***

## १६. प्रश्न वेळ घालवायचा की पुरवायचा ?

रविवार सकाळचे दहा वाजले होते. शेजारचे शिवरामपंत आमच्याकडं साप्ताहिक पेपर वाचनासाठी डोकावले. तास दीड तास सारा पेपर अगदी 'येथे प्रसिद्ध केले' इथपर्यंत वाचून झाल्यावर आळस देऊन चहा पिता पिता म्हणाले,'आज रविवार, कचेरीत जायचं नाही, अख्खा दिवस मोकळा ! कसा काय जाणार तेच कळत नाही.

तरी मी पेपर वाचायला सुरुवात करायला दहा वाजवले म्हणजे निदान बारा साडेबारा पर्यंतचा वेळ तरी जाईल आणि जेवायची वेळ होईल. जेवणात तासभर गेला की, दोन तास विश्रांती, मग थोडा वेळ टीव्हीत जाईल. तोवर संध्याकाळ होईल.

पण आज पेपरमध्ये इतक्या जाहिराती आहेत आणि कुणाच्यातरी साठीमुळं इतक्या शुभेच्छा आणि फोटो आहेत की वाचायला मजकूर कमी. त्यामुळं पेपर तर अकरालाच संपला. ऑफिसकडं जाण्यात अर्थ नाही. त्यात आज तुम्ही वाचलंच असेल ते माजी पंतप्रधान गेले. त्यामुळं एक दिवसाचा दुखवटा आणि रेडिओ टीव्हीवर नुसतं व्हायोलिन! त्यामुळं दुपार घालवणंही अवघडच आहे. याच आठवड्यात बघा ती नानक जयंती का कसलीतरी सुट्टी आहे वाटतं. तो दिवसही कसा काढायचा हा प्रश्नच आहे बघा.' असं बोलून, कंटाळून ते निघून गेले.

मला एका पुस्तकातल्या शॉ च्या दाढीची गोष्ट आठवली. तो सतत कामात व्यग्र असे. त्याला एकदा त्याच्या चाहत्यानं विचारलं,'आपण दाढी का वाढवता ? ती आपल्याला चांगली दिसत नाही. दाढी नाही ठेवलीत तर व्यक्तिमत्त्वाला ते अधिक चांगलं दिसेल असं वाटतं.'

त्या चाहत्याला त्यानं धन्यवाद दिले, पण म्हणाला

की,'आयुष्य इतकं थोडं आहे आणि करायच्या गोष्टी इतक्या ढीगभर आहेत की, मी काढून पाहिलं की रोजच्या दाढीला लागणारी दहा मिनिटं मी वाचवू शकलो तर माझ्या नुसत्या उरलेल्या आयुष्यातली तब्बल दोनेक वर्षं तरी मी वाचवू शकेन, जी मला कामाला उपयोगी पडतील आणि एरवी मी दोन वर्षं तर सोडाच, पण दोन ताससुद्धा कुठून विकत घेऊ शकणार नाही.'

यातली जरा अतिशयोक्ती सोडली तरी काही माणसांची अशी परिस्थिती दिसते की, त्यांना दिवस कसे घालवायचे हा प्रश्न आहे तर काहींना दिवस कसे पुरवायचे हा प्रश्न आहे. असा परस्परविरोधी प्रश्न का पडत असावा ? दोनही प्रश्न पडणारी माणसं आपल्याला पाहायला मिळतात. ती प्रामाणिक आहेत, प्रश्नही खरा आहे.

याचं कारण असं आहे की, त्या दोन माणसांमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. त्या दोन माणसांमधली पहिली झोपलेली आहेत व दुसरी जागी आहेत. लौकिक अर्थानं नक्कीच नाहीत. तर दुसऱ्या अर्थानं ती जागी नाहीत. मानवी आयुष्याची क्षणभंगुरता आणि त्याची सार्थकता या साऱ्या दृष्टीनं पहिल्यांना हा प्रश्नच कधी डोक्यात आलेला नाही. उठणं, बसणं, खाणंपिणं, दिवसभर पोटासाठी काही काम, प्रपंच, थोडीफार करमणूक बस्स, या पलीकडं त्यांना कोणतंही विश्व नाही, कोणती जागच नाही ! त्यामुळं काय करावं, दिवस कसा घालवावा असा प्रश्न त्यांना आहे.

जाग्या झालेल्या माणसांना आपापल्या परीनं करण्यासारखी इतकी कामं दिसतात. बरं ती माणसं अलौकिक, अवतारी वगैरे नाहीत, साधीच आहेत तरीही त्यांना एवढी कामं आणि एवढंसं आयुष्य हे गणित दिसतं आहे. त्यामुळं रात्रंदिवस काम करताहेत.

रंगाचा कारखाना चालवणाऱ्या विंझे नावाच्या रंगतज्ज्ञांना एका जिवावरच्या आजारानं असंच जागं केलं तेव्हा डॉक्टरांनी सल्ला

दिला, तुमचं मन रमेल असा एखादा छंद तुम्ही जोपासला तर तुमचं उर्वरित आयुष्य सुखाचं होईल व ते वाढेल. त्यांना संस्कृत सुभाषित वाङ्मयाची आवड होती. त्याच्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केलं. अनुवाद, संकलन एवढं प्रचंड काम त्यांनी उर्वरित आयुष्यात उभं केलं की, एखादा लेखकही लाजावा. अनेक पिढ्यांना ते उपयोगी होईल. तेरा कोटी जपाचा संकल्प सोडलेले एक जण मला म्हणाले, रोज दहा हजार जप झाला तरी किमान तीसचाळीस वर्षं लागतील, रोज राबलो तरी आयुष्य अपुरं आहे.

क्षेत्र कोणतंही असो, जागा झालेल्याला वेळ घालवायचा प्रश्न नाही, पुरवायचा प्रश्न पडेल हे खरं.

***

## १७. सोयीपुरती समानता

आजचा काळ तसा आधुनिकतेचा आहे. सामाजिक, वैचारिक पुरोगामीपणाचा आहे. त्याचा आपल्याला सार्थ अभिमानही आहे. अनेक समाजसुधारकांनी, द्रष्ट्या विचारवंतांनी, कृतिशील कार्यकर्त्यांनी गेलं शतकभर त्यासाठी कष्ट घेतलेले आहेत याची आपल्याला जाणीव आहे.

अनेक क्षेत्रांत या सुधारणांचे चांगले परिणाम आपण पाहात आहोत. हे सारं स्वागतार्हच आहे. इतर अनेक क्षेत्रांबरोबरच स्त्रियांच्या जीवनात या सुधारणांमुळं झालेले मूलगामी बदलही आपल्याला आज अनुभवायला येत आहेत. स्वत:च्या घराच्या उंबरठ्याबाहेरचं विश्व माहीत नसलेली एकेकाळची स्त्री आज कित्येक क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनंच नव्हे तर काकणभर सरस भूमिका पार पाडताना नि जबाबदाऱ्या झेलताना आढळते आहे.

ज्या क्षेत्रांत स्त्रियांचा आढळ होईल अशी कल्पनाही एक शतकापूर्वी कोणी केली नसती - अशी अंतराळविज्ञान, गुन्हेगार-तुरुंग यावरचं नियंत्रण, अति महत्त्वाची प्रशासकीय खाती, अत्यंत अवघड क्रीडाप्रकार अशा एक ना दोन, अनेक क्षेत्रांत स्त्री नुसती वावरत नसून तिनं त्यांत नैपुण्य संपादन करून उलट स्वत:चा एक ठसाच त्या क्षेत्रांवर उमटवला आहे, असं म्हटलं तरी ते वावगं ठरणार नाही.

या अर्थानं विचार केला तर स्त्रियांच्या बाबतीत जी एक समानता अभिप्रेत होती आणि आहेही ती बरीचशी साधली आहे, असं वाटतं खरं, पण खरोखरच अशी वस्तुस्थिती आहे की काय याविषयी जरा शंका यावी असे प्रसंग आपल्याला आजूबाजूला रोज दिसतील. पुरुषांच्या बरोबरीनं आज स्त्रीचा अर्थार्जनाचा हक्क मानला गेला आहे. त्यामुळंच नोकरीच्या बाबतीत, उद्योगधंद्याच्या बाबतीत तिला डावललं तर जात नाहीच, पण प्रोत्साहन दिलं जातं. तीही

त्याचं चीज करून घरच्या प्रपंचाला पुरुषांइतकाच हातभार लावते आहे.

उलट आपल्याला अनेकदा असं आढळेल की, योगायोगानं अनेक कुटुंबांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांनाच नोकऱ्या-उद्योग अधिक सुस्थिर, चांगल्या पद्धतीचे आहेत. अनेकदा त्याच प्रपंचात अधिक पैसा आणताहेत, कुटुंबाच्या, समाजाच्या प्रगतीला वेळी पुरुषांपेक्षा अधिक हातभार लावताहेत. यात पुरेशी 'समानता' आता आली आहे, असं म्हणावं लागेल.

पण याचा अर्थ सर्वत्रच अशी समानता आली आहे असं समजणं मात्र धोक्याचं होईल. कारण वस्तुस्थिती अनेकदा काही वेगळंच सांगते आहे. घरातल्या साऱ्या प्रगतीला कष्ट करून आपल्या पैशानं समान हातभार लावणाऱ्या स्त्रीचा विचार घरातले निर्णय घेताना 'समान' असताना क्वचित दिसतो.

साधा घराला रंग लावण्याचा विषय घ्या. रंगाचा निम्मा खर्च, प्रसंगी सारा खर्च करणारी घरातली मिळवती स्त्री रंग कुठं, कुठला नि केव्हा लावावा हा निर्णय करताना कर्त्या पुरुषाकडून सोयीनुसार कमी लेखली जाते, विसरली जाते. हा अनुभव आपण पाहिला नाही का? मग घरदार, मुलांची शिक्षणं, नोकऱ्या, लग्नकार्य असे मोठमोठे निर्णय तर सोडाच. किती काही आपला विचार असला तरी अखेर त्या कर्त्या पुरुषाचंच म्हणणं खरं होणार किंवा ते खरं करणार याची तिला कल्पना असते.

अखेर ही मानसिकता नाही का ? अनेक घरांमध्ये दमून येणारा पुरुष 'दमलो' म्हणून दिवाणखान्यात पाय पसरून पेपर चाळीत वा टीव्ही पाहात आतून येणाऱ्या चहा, कॉफीची वाट बघत बसतो आणि त्याच्या इतकीच किंबहुना अनेकदा त्याच्यापेक्षाही जास्त त्रासाची नोकरी करून आपलं 'समान' कर्तव्य बजावून येणारी स्त्री सारा थकवा विसरून स्वयंपाकाच्या कट्ट्याजवळ कामाला उभी

राहाते, हे चित्र दुर्मीळ आहे का ? प्रत्यक्षात समानतेची अपेक्षा असेल तर इथंही ती दाखवणं आवश्यक आहे. परिस्थितीमध्ये ती कशी दाखवावी याचे अनेक पर्याय असू शकतील. पण तसं वाटणं तरी आवश्यक आहे, नाही का ?

म्हणून अनेकदा असं वाटतं की, ही 'समानता' फक्त बाह्य कर्तृत्वापुरती निर्माण झाली आहे, सारी कर्तव्यं स्त्रीनं आपल्या बरोबरीनं बजावावी यापुरती निर्माण झाली आहे की काय? वास्तविक, त्याच बरोबरीनं तिच्या हक्कांच्या बाबतीत बाह्यच नव्हे तर आतून आणि मनातसुद्धा समानता जोवर पुरुषांच्या ठायी उत्पन्न होत नाही तोवर ही समानता 'सोयीपुरती समानता' म्हणावी लागेल.

***

## १८. काठावर

एक थोर सत्पुरुष होते. ते सर्वस्वी भगवंताच्या स्मरणात आणि आपलं कर्तव्य चोख पार पाडण्यात मग्न असत. त्यांच्या एका मुलीचं लग्न खूप प्रयत्न करूनही काही जमत नव्हतं. तिच्यासाठी व्यवहारानं जे प्रयत्न करायचे ते ते करीतच होते.

सर्वसामान्य माणसाची अशा वेळी कशी स्थिती असते की, तो हळूहळू चिंताग्रस्त होत जातो, खंगत जातो, काळजी, अस्वस्थता वाढत जाते आणि आपल्याला ते स्वाभाविक वाटतं. म्हणून एकांनी या सत्पुरुषांना विचारलं,'आपल्याला मुलीच्या लग्नाची काळजी नाही का वाटत?' त्यावर ते सहजपणे म्हणाले,'नाही, काळजी नाही वाटत. घरात ती आली-गेलेली दिसली म्हणजे फक्त आठवण होते.'

घरातल्या एखाद्या सामान्य माणसाच्या दृष्टीनं गंभीर आणि काळजी करण्यासारख्या विषयातही ते तटस्थ, स्थिर आणि विशेष म्हणजे आनंदित कसे काय राहू शकले आणि आपण सर्वसामान्य माणसं मात्र समुद्रात किंवा नदीत भोवऱ्यात सापडावं किंवा पोहता येत नसताना पाण्यात पडल्यानंतर गटांगळ्या खाव्यात तसे कासावीस का होतो ?

या संदर्भात पूज्य विनोबांनी एका गृहस्थांशी बोलताना मोठा छान संदर्भ दिला आहे. एका समुद्राच्या काठावर विनोबांशी ते गृहस्थ गप्पा मारीत बसले होते. त्या गृहस्थांनी विनोबांना शंका विचारली की, वास्तविक, आपला अनुभव पाहिला तर सारा संसार, प्रपंच इतका क्लेशदायक, दु:खदायक आहे ! पण जवळजवळ सारे सत्पुरुष तो भगवंताचा विलास आहे, माया आहे, खेळ आहे, आनंदाचा आहे - अशी भाषा कशी काय करतात ?

उत्तर देताना विनोबा समुद्राकडं बोट करून म्हणाले,'याच समुद्रात समजा आपण गटांगळ्या खात असू, बुडत असू तर हा समुद्र

गंभीर, सुंदर, विशाल, निळाशार, अथांग वगैरे आपल्याला वाटेल काय ? पण आपण काठावर बसलेले असू तर मग आपल्याला समुद्राच्या साऱ्या सौंदर्याचा आस्वाद घेता येईल. इतकंच काय, त्याच समुद्रात उद्या वादळ सुटलं, अगदी तांडव झालं तरी त्या साऱ्या रौद्र रूपाचासुद्धा आपण आनंद घेऊ शकू ! अर्थात त्यासाठी आपण त्याच्या काठावर असायला हवं !'

तसं ते सत्पुरुष भगवंताला सारा प्रपंच अर्पण करून साक्षी भावानं तो पाहात बसले होते म्हणून मुलीच्या लग्नाची काळजी किंवा ताण त्यांना नव्हता. फक्त कर्तव्य नि आठवण होती. ही गोष्ट भक्तीनं साध्य झाली. तीच गोष्ट विचारानंसुद्धा साध्य होईल.

यासाठी 'काठावर' राहाण्याची विद्या मात्र यावी लागेल. ती मुद्दाम अशासाठी शिकावी लागेल की, आपल्याला पाण्यात बुडी मारून बसायचीच सवय, सराव आणि आवड लागलेली आहे. प्रसंगात, मग कुठल्याही असो, जरा मनानं बाजूला होऊन त्या प्रसंगाकडं, त्या उलघालीकडं, त्या गोंधळाकडं, वेळी स्वत:कडंसुद्धा पाहायची आपल्याला माहितीही नाही आणि तशी सवयही नाही.

त्यामुळं दुर्दैवानं असं होतं की, साऱ्या प्रसंगाच्या परिणामातही आपण सापडतो. त्याचा सारा ताणतणावही आपल्याला सहन करावा लागतो. वर पुन्हा असं झालं म्हणून आपण तक्रार करतो, खंत करतो. मग त्यापूर्वीच 'काठावर' राहण्याचा थोडा अभ्यास करू शकलो तर?

बरं यात कुठं व्यवहार सोडायचा किंवा कशात भागच न घ्यायचा प्रश्न आहे असंही नाही. कारण हे 'काठावर' येणं, राहणं शरीरानं नाहीच आहे, ते मनाच्या पातळीवरचं आहे.

शरीरानं बाजूला व्हायचं ठरवलं तर घोटाळा आहे, आजूबाजूच्यांचे गैरसमज आहेत, कर्तव्यात कसूर होण्याची शक्यता आहे. पण तसं काही इथं अभिप्रेतच नाही, कारण त्रास, तणाव भोगतं ते मुख्य मन ! त्यालाच काठावर ओढण्याचा हा अभ्यास आहे.

यात शरीराचा किंवा व्यवहाराचा संबंध नसल्यानं त्यामुळं काही घोटाळा होण्याचाही प्रश्न नाही. हा अभ्यास मनाचा आहे. तो इतका आत आणि सहज आहे की, ना व्यवहार मोडत ना दुसऱ्याला कळत ! मग मन एकदा बाजूला व्हायला सरावलं की ताण सुटला, आनंद पसरला !

फक्त त्यासाठी 'काठावर' राहण्याच्या विद्येचा श्रीगणेशा करणं गरजेचं आहे !

***

## १९. आरसा आणि वृत्ती

आरसा ही काही आपल्याला अपरिचित वस्तू नाही. अगदी येताजाता आरशात डोकावून पुढं जाण्यापासून ते दिवसातून एकदाच आरशाचा वापर करण्यापर्यंतचे सारे प्रकार आपल्याला परिचित असतात. प्रत्येकाच्या सवयी वेगवेगळ्या असणं हे स्वाभाविकच आहे. परंतु यातून त्या व्यतिरिक्त आणखीही काही व्यक्त होत असतं हे मात्र आपल्याला ठाऊक असतंच असं नाही.

दिवसभर कितीही प्रवास करायला लागो, त्यामुळं धुळीनं-दगदगीनं स्वत:चा चेहरा काय, स्वत:चा पोशाख काय, कितीही विस्कटो - काहीही झालं तरी एकदा सकाळी आरशात बघून झालं ना, पुन्हा उद्या सकाळीच आरशात बघायचं, मध्ये पुन्हा बघण्याची गरज न वाटणारा माणूस नुसतीच एक सवय व्यक्त करीत नाही, तर त्याची स्वत:कडं बघण्याची एक दृष्टीही व्यक्त करीत असतो.

स्वत:चे केस, पोशाख, चेहरा अशा गोष्टींना तो कितपत महत्त्व देतो, किंबहुना त्याचं कामकाज, त्याचं ध्येयधोरण या असल्या बाबींपुढं असल्या स्वत:च्या गोष्टींना तो किती महत्त्व देतो, हे त्यातून नकळत व्यक्त होत असतं.

त्याला असं वाटत असतं की, माझं काम करीत असताना मला गावातून म्हणा, गावोगावी म्हणा जावं-यावं लागणार, फिरावं लागणार अशा वेळी पोशाखाची इस्त्री बिघडेल, चेहऱ्यावर धूळ उडेल, केस विस्कटतील या गोष्टी होणारच. त्या मी गृहीतच धरल्या आहेत. इतकंच नव्हे तर त्या लोकांनीही गृहीत धराव्यात, मी इतर गोष्टींना जसं कमी लेखतो आणि माझ्या कामाला, निर्णयांना,कर्तबगारीला महत्त्व देतो तसं त्यांनीही द्यावं, असं अशा माणसाला वाटतं !

याच्याच उलट एक वृत्ती आरशाच्या दुसऱ्या वापरातून व्यक्त

होते. अशी काही मंडळी असतात की जी जाता-येता, निदान आवश्यकतेनुसार किंवा वेळ मिळेल तेव्हा आरशात नजर टाकतातच. अशी माणसं असं व्यक्त करीत असतात की मी ठाकठीक असणं, दिसणं हे माझ्या व्यक्तित्वाचा आवश्यक भाग आहे.

मी काय करतो, मला काय वाटतं, मी काय कर्तबगारी करतो आहे, याच बरोबर मी कसा दिसतो आहे, कसं दिसायला हवं हे पाहाणंही अतिशय आवश्यक आहे. कारण मी जे काही काम करू इच्छितो, ज्या जबाबदाऱ्या पार पाडू इच्छितो ते यशस्वी होण्यासाठी मी बाह्यतः व्यवस्थित असणं, दिसणंही आवश्यक आहे !

मी कामकाजासाठी प्रवास करणार, नाना ठिकाणी उठबस करणार, राबणार म्हटलं की पोशाखाची घडी विस्कटणार, चेहरा धुळीनं माखणार-बिघडणार म्हणूनच वेळोवेळी आरशात नजर टाकून ते सारं पहिल्यासारखं ठीकठाक करणं हे आवश्यकच आहे, नव्हे तो कामकाजाचा एक भागच आहे. ते व्यवस्थित करण्यावरच माझी व्यावसायिक किंवा व्यक्तिगत यशस्विता अवलंबून आहे.

तसं पाहिलं तर हाही दृष्टिकोन खरा आहे. आपण एखाद्या कार्यालयात गेलो आणि तिथं एखादा असा सुव्यवस्थित माणूस भेटला, तर आपल्याला नक्कीच बरं वाटतं. आपल्या पुढच्या कामाबद्दल किंवा त्याच्याशी संपर्क साधण्याबद्दल मनातून एक प्रकारचा विश्वासही निर्माण होतो. तोच विश्वास आपल्याला आधी सांगितल्या तशा एखाद्या अस्ताव्यस्त राहणाऱ्या व्यक्तीबद्दल निर्माण होत नाही.

याचा अर्थ प्रत्येकानं आरशाचा सारखाच वापर करीत असावं असा नसून, आरशाच्या वापरातून आपली एक धारणा व्यक्त होत असते, याकडं लक्ष वेधावं हा आहे ! त्या वापरातून हे व्यक्त होत असतं की, आपण आपल्या बाह्यांगाला एकूण व्यवहारात किती प्रमाणात महत्त्व देतो आणि त्याचबरोबर हेही व्यक्त होत असतं की,

आपण इतरांना किंवा इतरांच्या बरं वाटण्यालाही आपल्या व्यवहारात किती महत्त्व देतो.आपण जगात वावरतो. त्यात व्यवहार अपरिहार्य असतो. व्यवहार म्हणजे दुसऱ्याशी संबंध आला. तो एकाशी येईल, अनेकांशी येईल. तो सामान्य, कौटुंबिक पातळीवर येईल किंवा खूप मोठ्या पदावर, पातळीवर येईल. कुठल्याही पातळीवर आला, तरी त्यात आपल्या आधी म्हटल्या तशा वृत्तीचं स्थान महत्त्वाचं असतं. ते स्थान समतोल ठेवणं हा अत्यंत मध्यम आणि म्हणूनच आदर्श मार्ग ठरेल.

या अर्थानं पाहिलं तर आपल्याला कळून येतं की, आरशाच्या वापरातून व्यक्तीच्या वृत्तीवर कसा नकळत प्रकाश पडत असतो !

***

## २०. मदतीचं विश्व

माणूस कितीही मोठा, शक्तिमान, बुद्धिमान म्हटलं तरी तो अनेक बाबतीत परतंत्रच असतो, हे कुणालाही मान्य होण्यासारखं तथ्यच आहे.

मुळात अगदी जन्मत:च शरीराच्या इतक्या नाजूक आणि परस्वाधीन स्थितीत माणूस असतो की, दुसऱ्या कुणी - ती आई असो, वडील असोत, डॉक्टर असोत - त्यांनी मदतीचा हात दिल्याशिवाय ना हातपाय हलवू शकत ना जगण्यासाठी लागणारं दूध, अन्नपाणी मिळवू शकत. हाच मदतीचा हात पुढं आयुष्यभर वेगवेगळ्या क्षेत्रांत वेगवेगळ्या कारणांसाठी त्याला लागत राहातो, तो अगदी मरेपर्यंत. इतकंच काय गेल्यानंतरही कुणाच्यातरी मदतीनंच हे नश्वर शरीरही त्याला अनंतात विलीन करावं लागतं.

हीच मदत माणसाच्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनली असली तर त्यात नवल नाही. याच मदतीची दुसरीही बाजू आहे. मनुष्य आयुष्यभर नुसती मदतच घेतो असं नसून तो ज्या ज्या बाबतीत स्वतंत्र, शक्तिशाली होत जातो त्या त्या बाबतीत तो इतरांना मदतही करतो.

पण पुन्हा अनेक बाबी अशा राहतात की, त्यासाठी त्याला दुसऱ्यांकडं मदतीचा हात मागावाच लागतो. मदतीची ही देवघेव मानवी व्यवहाराचा मोठा भाग व्यापून असते. या मदतीचं माणसाच्या आयुष्यातलं स्थान ठरवणं हे खरोखरच एक अत्यंत कठीण काम आहे हे मात्र खरं.

याचं कारण असं की, याच अपरिहार्य मदतीमुळं सतत मदत घेण्याची सवय लागणं, मदतीवरच जगणं, शक्य असूनही मदत न करणं, एखाद्याला मदत व्हावी म्हणून प्रयत्न करणं, एखाद्याची मदत रोखणं, सतत मदत करण्याची खोड लागणं, मदत ही शारीरिक

असणं,आर्थिक असणं, मानसिक असणं, आध्यात्मिक असणं, दैवी असणं असे अनेक प्रकार दिसून येतील.

हे एवढ्यावरच संपत नाही तर अशी मदत डोळस असणं, मदत आंधळी असणं, केवळ मदतीसाठी मदत करणं, मदत करणाऱ्यानं लक्षात ठेवणं, घेणाऱ्यानं लक्षात ठेवणं, न ठेवणं, मदतीची परतफेड करणं, न करणं, त्यांची जाणीव असणं, नसणं, मदतीची याचना करणं, समजून मदत करणं, योग्य मदत करणं, पांगळी करणारी मदत करणं, समर्थ करणारी मदत करणं, नको इतकी मदत करणं - असे मदतीच्या या महाविश्वात इतके प्रकार आढळतील की, या मदतीचा थोडा अधिक विचार केला तर नक्कीच उपयोगी पडेल. या मदतीच्या विश्वात मनुष्य किती नकळत वावरत असतो, पण तिचा तो कधी फारसा विचारही करत नाही.

द्रौपदीची पुराणातली कथा मोठी उद्‌बोधक आहे. वनामध्ये काही अकल्पित संघर्ष घडून आला. त्यात सर्व पांडव मृत्युमुखी पडले. द्रौपदी आक्रोश करू लागली. तेव्हा वनातल्या यक्षाला तिची करुणा आली. त्यानं प्रकट होऊन द्रौपदीला दोन वर दिले. त्यांतल्या पहिल्या वरानं तिनं पाचही पांडव जिवंत व्हावेत अशी प्रार्थना केली.

त्या वरामुळं सर्व पांडव जिवंत झाले. त्याबरोबर द्रौपदी त्यांच्यासमवेत निघून जाऊ लागली. यक्ष पाहातच राहिला. कारण दुसरा वर तिनं मागितलाच नव्हता. द्रौपदी तो विसरून गेली असेल असं वाटून त्यानं द्रौपदीला हाक मारून वराची आठवण करून दिली.

द्रौपदीनं नम्रतेनं सांगितलं की, मला त्या वराचं स्मरण आहे. पण माझे पती जिवंत झालेले असताना, त्यांच्याकडं कर्तृत्व असताना मी काही मदत मागणं हे मला नि त्यांनाही कमीपणाचं आहे. म्हणून मी दुसरा वर मागू इच्छित नाही.

मदतीची अपेक्षा करताना आपल्या परिस्थितीचा, क्षमतांचा, कर्तृत्वाचा विसर न पडू देणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे. आपल्या

ठिकाणी असलेली शक्ती, बुद्धी, सर्वप्रकारची ताकत - जोपर्यंत उपयोगी पडण्याची शक्यता आहे तोपर्यंत मदतीला आपण पात्रच नाही. उलट असं असतानाही मदत घेणं, हे आपल्याला कमीपणाचं वाटावं याची जाणीव होण्याची गरज आहे.

मदतीचं विश्व हे इतकं व्यापक आहे की, त्यात एकाएका कोपऱ्यामध्येसुद्धा विचार करण्यासारखं आणि अंमलात आणण्यासारखं कितीतरी दडलेलं आहे, हे मात्र खरं !

***

## २१. स्वत:चा अडथळा

माणसाचं आयुष्य ही तशी एक अडथळ्यांची शर्यतच असते. हा आपला सर्वांचा अनुभव असतो. अगदी बाजारातून एखादी साधी वस्तू आणावी म्हणून ठरवून जावं तर वाटेत कुणीतरी कधी नव्हे ते भेटण्यापासून ते नेमकी त्याच दिवशी दुकानात ती वस्तू संपण्यापर्यंत काय काय अडचणी येतील आणि कोणकोणते अडथळे निर्माण होतील याची कल्पना करणंसुद्धा कठीण आहे.

आपल्याला अपेक्षित असलेल्या अडथळ्यांतला कुठला अडथळा आला तर आपण एक वेळ समजून घेतो, घेऊ शकतो. पण अडथळे येतात ते इतके अनपेक्षित आणि अकल्पित येतात की, आपण अनेकदा थक्कही होतो आणि हतबलही होतो.

हे सामान्य माणसाला इतकं नित्याचं आणि अनुभवाचं आहे की, पाच मिनिटांच्या वाटेवरच्या ठिकाणाचं एखादं काम करायला जावं तर काल रात्री झोपतानाच्या वेळेपर्यंत कुठं मागमूसही नसताना कुठल्या तरी डिपार्टमेंटच्या माणसांनी दारात रात्रभर राबून इमानेइतबारे आडवा चर खणून ठेवलेला दिसतो. आता स्कूटर काढणंही शक्य नाही. मग पायपीट करून पाचाच्या जागी पन्नास मिनिटं धावून तेच काम करताना या अडथळ्यांच्या शर्यतीची मजा सामान्य माणसाला कितीदातरी अनुभवायला मिळत असते.

तसा या अडथळ्यांचा अधिक विचार केला तर असे ठोस, अगदी चर खणल्यासारखे स्वच्छ दिसणारे पण अनपेक्षित अडथळे खूपच प्रकारचे असतात. म्हणून रोजच्या साध्या साध्या कामांचं सोडा, पण मोठमोठ्या सभासमारंभ, लग्नकार्य अशा बाबतीत माणसं साधारणपणे संभाव्य अडथळ्यांचा, अडचणींचा विचार करतात.

अचानक लाईट गेले तर काय करायचं, त्याच दिवशी बंद पुकारला जाण्याची शक्यता असली आणि वाहनं, दुकानं नसतील तर

काय व्यवस्था करायची - अशा स्वरूपात अडथळे आणि त्यांची चर्चा, उपाययोजना नेहमी घडताना आपण पाहातो. पण या साऱ्या अडथळ्यांमध्ये बाह्य स्वरूपाचे, ठोस, ढोबळ असे जसे अडथळे आढळतात तसे काही सूक्ष्म, आंतरिक असेही आढळतात.

नेहमी गप्पांच्या मैफली रंगवणाऱ्या एखाद्या मित्राला आपण एखाद्या घरगुती कार्यक्रमात आवर्जून बोलावतो, वाट पाहातो, तो येतो पण मैफल काही रंगत नाही. सारं सुनंसुनं पाहून आपण अधिक चौकशी करतो. तेव्हा कुणाकडून कळतं की, त्याचा आज 'मूड' नाही. नेहमी गाण्याची मैफल रंगवणारे असोत, पट्टीचे खेळाडू असोत, उत्तम कलाकार, नट असोत त्याला या 'अंतर्गत अडथळ्यानं' गाठलं तर 'रंगाचा बेरंग' होतो. आनंद पसरायचा दूर राहून खिन्नता, अस्वस्थता पसरते.

हे केवळ त्या 'मूडचं' झालं. पण काही वेळा काही काही माणसं आपल्याला भेटतात. ती म्हणतात,'सगळा त्रास आहे, वैताग आहे, सतत काळजी लागली आहे.' त्यांच्या बाबतीत आनंदाचं नावच नको. उलट दु:खाची नि त्रासाची सतत सोबत घडताना दिसते.

पण त्यांच्या जवळची माणसं जर मोकळेपणानं, स्वतंत्रपणे भेटली तर सांगतात,'अहो, काही काळजी करण्यासारखं आहे का खरंच ? पैशाकडून नाही, माणसांकडून नाही, त्यांना तसं लौकिकानं काहीच इतकं खंत करण्यासारखं नाही हो, पण स्वत:च स्वत:ला सुख लागून देत नाहीत, त्याला काय करणार ?'

आपण अशीही माणसं पाहिली असतील की, आजाराच्या गांभीर्यापेक्षासुद्धा त्यांनी आजाराची घेतलेली धास्ती आणि अगदी सोडून दिलेला धीर ह्याच अधिक गंभीर असतात आणि मग डॉक्टरही सांगतात की आम्ही या बाबतीत काहीच करू शकत नाही.

अशा एक ना अनेक प्रकारे आपल्या लक्षात येईल की,

आपल्याला बाहेरून येणाऱ्या, निर्माण होणाऱ्या अडथळ्यांच्या बरोबरीनं अनेकदा आपल्या स्वत:च्याकडून निर्माण होणारे अडथळेही अडचणीत आणत असतात. मग तो स्वत:चा हट्ट असो,आग्रह असो, संकुचितपणा असो, अनाठायी ठाम मतं असोत, अतिभावनिकता असो वा अनाठायी अतिकर्तव्यकठोरता असो, कर्मठपणा असो !

बाहेरचे अडथळे आपल्या आनंदाच्या आड येतात हे एक वेळ आपण समजू शकू, पण आपला स्वत:चाच अडथळा आड आला, तर तो दूर करणं आपल्याच हातात आहे ना ?

***

## २२. खरी मदत

निसर्गदत्त हे मोठे आत्मानुभवी आणि बुद्धिनिष्ठ सत्पुरुष होऊन गेले. ते एके ठिकाणी मदतीबद्दल बोलताना म्हणतात,'दुसऱ्याला खरी मदत तोच करतो जो त्याला त्यापुढं कुठल्याही मदतीची गरज उरणार नाही, इतकी आणि एवढी मदत करू शकतो.' मदत करण्याच्या बाबतीतली ही अगदी आदर्श आणि अनुकरणीय स्थिती म्हणावी लागेल.

म्हणजे असं की, आपण नेहमी एकमेकांना ज्या मदती करतो, ज्याबद्दल आपल्याला कल्पना असते, त्या साऱ्या मदती या माणसाच्या दैनंदिन आयुष्यातल्या वेगवेगळ्या वस्तू, पैसा, शारीरिक बाबी, अन्नदान अशांबद्दलच्या आहेत. या मदतीची माणसाला अनेकदा गरज पडते. ती भागवणारेही भेटतात. पण या गरजांचं स्वरूप असं काही असतं की, माणसाला पुन्हा मदतीची गरज लागते.

उदाहरणादाखल भूक घ्या. एखाद्या गरीब माणसाला भूक लागेल तेव्हा त्याला कुणी अन्नाची मदत करणं हे अत्यंत आवश्यक आहे. पण ते केलं की, मदतीची गरज संपत नाही. संपते पण तात्पुरती संपते. कारण पुन्हा भरलेलं पोट रिकामं झालं की, माणसाला पुन्हा भूक अन् पुन्हा अन्नाची गरज लागणार, हे उघड आहे.

अशा वेळी भुकेलेल्याला जो अन्नाची मदत करेल तो थोर तर आहेच, पण जर त्या माणसाला हळूहळू उद्योग म्हणा, कला म्हणा काही शिकवून स्वत:चं पोट भरण्याइतपत, स्वत:ची भूक भागवण्याइतपत चार पैसे मिळवायला किंवा धान्यधुन्य मिळवायला जो शिकवील तो मदत करणारा खरा अधिक थोर म्हटला पाहिजे. कारण निदान त्या बाबतीत तरी त्याला पुन्हा मदत लागू नये अशी व्यवस्था भले सावकाश, हळूहळू का होईना करण्यात तो यशस्वी

झाल्यानं ही मदतीची गरज कायमचीच भागून गेली.

अशा दृष्टिकोनानं जरी एखाद्याला मदत केली तरी ती मदत वेगळी आणि विधायक मदत होईल. पण वस्तुस्थितीत अनेकदा तर असं दुसऱ्याला स्वयंपूर्ण करण्याचा दृष्टिकोनच माहीत नसतो, तर अनेकदा दुसऱ्याला मदत करण्यामुळं 'मी' सुखावतो म्हणून असेल, ज्याला मदत करतो तो तसाच आपल्या मदतीवर अवलंबून कसा राहील हेच पाहिलं जातं, हे मोठं दुर्दैवाचं आहे.

निदान या बाबतीत आपण सावध झालो, तर आपण एखादी मदत घेताना परस्वाधीन तर बनत चाललो नाही ना हे पाहू. तशा मदतीची वारंवार गरज न पडता हळूहळू या मदतीपासून आपण मुक्त होऊ शकू का, हा विचार तरी डोक्यात ठेवू.

निसर्गदत्त म्हणतात तो मदतीचा अर्थ मात्र या साऱ्या लौकिकातल्या मदतीपलीकडचाच आहे. गुरूसुद्धा शिष्याला मदत करतात. त्याचं व्यक्तिमत्त्व घडवतात. त्याचे दोष, अवगुण जाणून ते दूर करायला त्याला मदत करतात. या प्रक्रियेत स्वाभाविकपणे शिष्याला गुरूचा आधार वाटायला लागतो. त्यात गैर नाही पण हा आधार देता देताच खरे गुरू हे त्याला त्याच्या स्वत:च्या साधनेनं परिपूर्ण करून या आधाराची गरज नाहीशी करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून खऱ्या गुरूकडं आलेला प्रत्येक शिष्य खऱ्या गुरूला शिष्य राहावा असं कधीच वाटत नाही. तो गुरू व्हावा असंच वाटतं.

श्री गोंदवलेकर महाराज यांचं उदाहरण प्रसिद्ध आहे. श्री ब्रह्मानंद हे त्यांचे पट्टशिष्य ! ब्रह्मानंदांची साधनेतली तयारी योग्य त्या प्रमाणात झाल्यावर महाराजांनी त्यांना स्वत:जवळ एक शिष्य म्हणून गोंदवल्यात ठेवून न घेता दूर करायचं ठरवलं. वास्तविक, गुरूजवळ राहायला मिळण्याइतका आनंद खऱ्या शिष्याच्या दृष्टीनं कशातही नसतो.

तरीही एके दिवशी ब्रह्मानंदांना बोलावून ते म्हणाले, 'बुवा,

झाडाखाली झाड वाढत नाही. लक्ष्मीचा प्रसाद म्हणून हा रुपया तुम्ही घ्या आणि कर्नाटकात जाऊन रामनामाचा प्रसार करा.' तिथून ब्रह्मानंदांना मोकळं केल्यामुळं श्रींच्या परंपरेत शोभेल असं गुरुत्व त्यांच्या अंगी निर्माण झालं. त्यांनी पुढं अपार कार्यही केलं.

निसर्गदत्त म्हणतात ती मदत या पातळीवरची आहे. लौकिकातली मदत करून कधी संपणार नाही. या वस्तूऐवजी त्या वस्तूची मदत लागतच राहील. कारण वस्तूंना, गरजांना आणि मदतीलाही अंत नाही. पण अशी मुक्ततेसाठी, भगवंतप्राप्तीसाठी मदत मात्र एकदा मुक्तता घडवून दिली की संपते. एकदा भगवंत गाठला की थांबते. पुन्हा गरजच उरत नाही.

ज्या मदतीनं एका भगवंताखेरीज कुणाच्याच मदतीची माणसाला गरज उरत नाही, अशी खरी मदत आपल्याला कुणाला करता येईल काय किंवा आपल्याला अशी मदत कुणाची घेता येईल काय, हा खरा प्रश्न आहे !

***

## २३. प्रश्न सोडवण्याचा मार्ग

पूज्य साने गुरुजींनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या ज्या अनेक मूलभूत गोष्टींवर चिंतन केलं आहे त्यात स्त्रीशिक्षण, चारित्र्य, ग्रामविकास, स्वातंत्र्य असे अनेक विषय आहेत. हे चिंतन मांडताना त्यांची प्रतिभा मूळ प्रश्नाची उकल, मांडणी करता करता काही शाश्वत सत्यांवर, काही अमूल्य सूत्रांवरही प्रकाश टाकून जाते.

त्यातलंच एक म्हणजे 'प्रश्न सोडवण्याचा खरा मार्ग कुठला' हे होय. या सूत्राचं स्वरूप समजून घेण्यापूर्वी त्याची पार्श्वभूमी आपण समजून घेऊ. म्हणजे पूज्य साने गुरुजींनी त्या सूत्रावर प्रकाश टाकताना कोणती नवी आणि मौलिक दिशा दिली आहे ते आपल्याला अधिक चांगलं स्पष्ट होऊ शकेल.

आज आपलं जीवन सतत आणि सर्वकाळ व्यापून असलेली एक चीज म्हणजे 'प्रश्न' होत. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना कोणत्या ना कोणत्या प्रश्नानं-समस्येनं गांजलेलं आहे. शिक्षणाचा, प्रगतीचा, नोकरीधंद्याचा, स्पर्धेचा, गुलामगिरीचा, गळचेपीचा, पैशाचा, स्थैर्याचा एक ना दोन नाना तऱ्हेच्या प्रश्नांनी माणूस - त्याचा समाज सतत व्यग्र आहे.

जसे एका बाजूनं हे प्रश्न सर्व व्यापून आहेत तसंच आपल्याला हेही आढळेल की, त्याच्याच बरोबरीनं ते प्रश्न सोडविण्याची एक समांतर प्रक्रिया सुरू आहे. त्यातसुद्धा माणूस जसा स्वत: स्वत:चे प्रश्न सोडवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो आहे, तसाच आटोकाट प्रयत्न समाजातल्या इतर व्यक्तीही त्या माणसाचे किंवा त्या त्या माणसांच्या समूहाचे प्रश्न सोडविण्यासाठी करीत आहेत.

एखाद्या व्यक्तीला एखादा स्वत:चा प्रश्न सोडविण्यात जर वेळी त्याची बुद्धी, संस्कार, कुवत, पाठबळ अशा अनेक कारणांनी

अडथळे निर्माण होत असतील, तर अशा व्यक्तीचा तो प्रश्न सोडविण्यात इतर व्यक्ती किंवा इतर समाज मदतीला धावून येऊन तो प्रश्न सुटतो. निदान मार्ग निघतो, हे आपण पाहातोच.

एखाद्या समाजातला अंधश्रद्धेचा, काही जाचक रूढींचा प्रश्न असला तर अशा वेळी ज्या व्यक्तींना हा प्रश्न समजला आहे, त्यावर मार्गही त्यांना सुचलेला आहे, तो अंमलात आणण्याची ज्यांची कुवत नि तयारी आहे अशी माणसं पुढं येऊन हा त्या त्या व्यक्तीचा प्रश्न सोडवतील.

पण अनेकदा आपल्याला असं आढळेल की, एखाद्याला एखाद्या गोष्टीचा त्रास असला, त्याची एखादी समस्या असली तर ती सोडविण्यासाठी ज्या दोन महत्त्वाच्या गोष्टींची गरज आहे - म्हणजे समस्या समजणं आणि ती सोडवू शकणं - या दोन्ही गोष्टी जर व्हायच्या असल्या तर एवढं नुसतंच वाटून उपयोगी नाही. नुसतंच समस्या कळून व ती सुटावी असं वाटून धडपड करायला गेलो तर अनेकदा दिशा चुकते, मार्ग चुकतो, संबंधित समस्याग्रस्तांना त्या प्रयत्नांपासून फायदा न होता त्रासच वाढतो. असं का होतं ?

याचा विचार करताना साने गुरुजी म्हणतात की,'दुसऱ्याच्या जीवनात शिरता आल्यावर त्याचा प्रश्न खरा सोडवता येतो.' म्हणून कुणाचाही प्रश्न सोडवायचा असला, तर सर्वप्रथम त्याच्या जीवनाशी तादात्म्य होता आलं पाहिजे. एका सत्पुरुषांची गोष्ट या संदर्भात उद्‌बोधक आहे.

एक लहान तान्हं मूल फार रडत होतं. घरगुती उपचार करून झाल्यावर डॉक्टरांना पाचारण झालं. त्यांनीही विविध प्रकारे प्रयत्न केले. त्याचं रडणं काही थांबेना.

शेवटी या सत्पुरुषांकडं त्या मुलाला नेलं. एक क्षणभर शांत चित्तानं त्याच्याकडं पाहून ते म्हणाले, त्या बाळाची मान लचकली आहे. त्यावर उपचार करा. ते त्याला सहन होत नाही, म्हणून ते रडतं

आहे. तो उपचार झाला. मुलाचा प्रश्न सुटला. रडणं थांबलं. त्या सत्पुरुषांना विचारल्यावर ते म्हणाले,'हे कळायला त्या जीवाशी तादात्म्य व्हावं लागतं. ते झालं की, खरा प्रश्न कळतो, उत्तरही सापडतं.'

साने गुरुजींनी दाखवलेला 'प्रश्न सोडवण्याचा खरा मार्ग' असाच मोलाचा आहे. तो चोखाळला नि ज्याचा प्रश्न सोडवायचा त्याच्या जीवनात आपण खरंच प्रामाणिकपणे शिरलो, त्याच्या जीवनाशी तादात्म्य झालो तर जीवनातल्या अनेक समस्या समाधानकारकपणे सुटतील, खऱ्या अर्थानं सोडवताही येतील.

***

## २४. दिसणं आणि पाहाणं

नुसतं दिसणं वेगळं आणि खरं पाहाणं वेगळं, नाही का ? डोळे उघडले की माणसाला दिसू लागतंच. माणसं, वस्तू, घटना अनेक गोष्टी. पण त्या साऱ्याचं हे खरं दर्शन म्हणणं कठीण असतं.

जसं एखाद्या सिनेमागृहात आपण जाऊन बसतो. समोर अनंत घटना जिवंतपणे घडत असतात. माणसं प्रेम करीत असतात, एकमेकांचा द्वेष करीत असतात, झगडे करतात, झगडे मिटवीतही असतात. पण मागे बसलेल्या प्रोजेक्टरवरच्या माणसानं एक कळ जरी दाबली तरी क्षणात सारा खेळ ठप्प होतो, थांबतो.

मग आपल्या एकदम लक्षात येतं की, ही जी सिनेमातली पात्रं एकमेकांच्या विरोधात झगडत होती, भांडत होती त्यांतल्या कुणी काही समजून घ्यावं - भांडण थांबवावं असं आपल्याला वाटत असतं. ते एका क्षणात थांबवण्याचं सामर्थ्य त्या सूत्रधाराकडं आहे. किंबहुना हे जे सुरू आहे, तेसुद्धा मुळात त्याच्याच इच्छेनं सुरू आहे. आता नुसतं दिसणं संपून खऱ्या पाहण्याला सुरुवात होते.

तसं जर एकदा पाहायला यायला लागलं तर घटना मग नुसत्याच 'दिसत' नाहीत! एखाद्या माणसानं एखादी वस्तू आपल्याला आणून दिली, भले ती वस्तू अगदी छोटीशी, नगण्य असेल आणि जर आपल्याला नुसतंच 'दिसत' असेल तर ती भेट आपल्याला 'क्षुद्र, नगण्य' वाटेल. पण जर आपण 'खरे पाहणारे' असू तर त्याच वस्तूच्या मागं असलेला प्रेमाचा, आदराचा, आपुलकीचा, शुभेच्छांचा भाव आपल्याला दिसेल, आपण पाहू शकू. जे नक्कीच गरजेचं आहे, हिताचंही आहे, आपल्या अन् देणाऱ्याच्याही !

अशा दृष्टीनं जगाकडं आपण जर पाहायला शिकलो तर हळूहळू एक आश्चर्यकारक गोष्ट घडते, असं आपल्या लक्षात येईल. ती अशी की, वरवर दिसणाऱ्या घटनांच्या मागची व्यवस्था, योजना,

भाव असं सारं काही दिसता दिसताच जसजशी एका कुठल्यातरी निसर्ग किंवा परमेश्वर यांच्या मोठ्या इच्छेचं किंवा योजनेचं आकलन होत जातं, तसंच हळूहळू आपल्याला आपल्या स्वत:चंही आकलन होत चालल्याचं आपल्या लक्षात येईल.

समजा एखादा लोभी, अत्यंत कंजूस व्यापारी आहे. त्याच्या डोक्यात सतत पैशाचा विचार येतो. घरातलं माणूस जरी समोर आलं तरी याच्यापासून मला फायदा काय किंवा तो कसा करून घेता येईल असा विचार त्याच्या मनात येतो. त्याच्याभोवती गोळा होणारी माणसंसुद्धा मग अशीच पैशासाठी, फायद्यासाठी गोळा झालेली असतात.

कधी काही कारणानं जर अशा माणसाला नुसताच पैसा न दिसता खरं पाहाता यायला लागलं, तर त्याला हळूहळू आकलन व्हायला लागतं की, आपण जे सारं काही मिळवलं आहे असं आपल्याला वाटतं आहे, त्यामागंसुद्धा काही पाहाण्यासारखं आहे.

त्याचे आजवरचे इतरांशी असलेले संबंधसुद्धा आत्ता त्याला वेगळे दिसायला लागतात. पैशापोटी आपुलकी दाखवणारे कोण आणि 'खरे आपले' कोण, तेही त्याला लक्षात येऊ लागतं.

ही झाली एक बाजू. पण नकळतच त्याच्या हळूहळू हेही लक्षात येऊ लागतं की, आपण नेमकेकसे आहोत, आपली वृत्ती कशी आहे, आपल्याला लोभ कितपत आहे.आपल्या संपर्कात येणाऱ्या माणसांचा विचार, आपण 'माणसं' म्हणून करतो की, कळत नकळत आपल्याला होऊ शकणाऱ्या आत्ताच्या किंवा भावी फायद्याच्या हेतूनं करतो ! म्हणजेच,या साऱ्यातून त्याला एक आत्मदर्शन होऊ शकतं, हे आश्चर्याचं आहे ! कुणी विचार करायचा ठरवला, तर कुणालाही असं 'आत्मदर्शना'चं दार उघडण्यासारखं आहे!

हाच दृष्टिकोन आपल्याला काच नि आरशाकडं बघताना

दिसतो. काचेतून पलीकडचं दिसतं तेव्हा जग नुसतंच दिसतं. त्याच काचेला थोडा पारा लावला म्हणजे त्या दिसण्याच्या मागं काय आहे हे लक्षात घेतलं की, त्या साऱ्या जगामागची निसर्गाची, भगवंताची इच्छा, योजना दिसू लागते.

आणि काचेला हा पारा पूर्ण लागला की मात्र जगही दिसायचं राहातं, निसर्गही राहातो आणि काचेचा आरसा होऊन आपल्याला 'आत्मदर्शन' घडू लागतं. जिथं माणसाच्या जीवनाचं सार्थक घडतं. पूर्णविराम येतो. त्याची सुरुवात व्हायला, प्रथम 'दिसणं आणि पाहाणं' हे टप्पे तरी ओलांडण्याची गरज आहे, नाही का ?

***

## २५. मदतीचा सुवर्णमध्य

माणसाचं मदतीशिवाय चालत नाही हे आपण पाहातोच. पण मदत करण्याचे आणि करणाऱ्यांचे इतके प्रकार आणि इतक्या भूमिका असतात की आश्चर्य वाटतं.

एके ठिकाणी दोघी शेजारणींची गोष्ट सांगितली आहे. थंडीचे दिवस आले. अर्थातच जुने गरम कपडे, स्वेटर्स वगैरे निघाले. नवे खरेदी झाले. एका बाईनं आपल्या मुलाला शाळेत जाताना अगदी माफक, आवश्यक तेवढेच गरम कपडे घातले आणि शाळेत पाठवून दिला. त्याला हेही सांगितलं की, तुला जर थंडी नाही सोसली, वारा नाही सोसला तर दप्तरातला मफलर गुंडाळ. सोसणारं असलं तर मफलर काढू नको.

शेजारणीनं ते पाहिलं. तिची समजूत अशी की, एक तर या बाईला गरम कपडे घ्यायला नको, घेतले असतील तर मुलाला घालायचा कंजूसपणा. म्हणून शेजारणीनं आपल्या स्वभावाप्रमाणं आपल्या मुलाला गरम कपड्यांची पूर्ण मदत केली. अगदी सगळीकडून त्याला उबेत ठेवला. गरम टोपी काय, मफलर काय, स्वेटर काय, मोजे काय. वर हे करताना ती रोज म्हणे आपल्याला काय कमी आहे, सगळे गरम कपडे तू घातलेच पाहिजेस. थंडीचा स्पर्शसुद्धा तुला होता कामा नये.

अर्थात यातलं बरंचसं जरी पहिलीला उद्देशून असलं तरी यातून या मुलाला जी थंडीपासून पूर्ण बचावानं राहण्याची सवय झाली ती झाली. पहिली मात्र आपल्या भूमिकेवर ठाम होती. तिचं म्हणणं होतं की, मुलानं थोडातरी थंडीवारा सोसलाच पाहिजे. असा त्याला जर तळहातावरच्या फोडासारखा जपला तर कुठलाच ऋतू, हवामानातला चढउतार त्याला जराही सोसणार नाही. शरीर हळूहळू दुबळं होईल.

दुर्दैवानं पुढं तसंच झालं. दुसऱ्या बाईच्या अशा अति काळजी घेण्यानं तिचं मूल जराही हवामान सहन करू शकेना. जरा बदल झाला की, आजारी पडे. याउलट पहिलीचं मूल ऊनवारं खाऊन तयार झालं. निदान थोड्या प्रमाणातले हवामानाचे आघात ते सहज सहन करी.

आपल्याला मदत करणाऱ्याच्या बाबतीतही अनेकदा असं घडताना दिसेल. काहींची मदत ही असल्या प्रकारातली असते. ते दुसऱ्याला मदत करतात ती अशा पद्धतीनं करतात की, त्याला पांगळं व्हायला होतं.

पोहायला शिकवताना शिकवणारा डबा बांधतो, मोधळा बांधतो जरूरच. कारण पाण्यात पडायचं म्हणजे दहा प्रकारच्या गोष्टी नवीन असतात. माणसाला सगळंच एकदम जमणं कठीण असतं. तसं अपेक्षितही नाही. म्हणून निदान बाकीच्या गोष्टी शिकेपर्यंत उदा. पाण्याची भीती जाणं, पाण्यात हातपाय हलवण्याचा सराव होणं - अशा चार गोष्टी शिकेपर्यंत त्याला पाण्यात बुडण्याची भीती वाटू नये यासाठी मदत करण्याची मोठी गरज असते.

शिकवणारा डब्याच्या साहाय्यानं ते करतो, शिवाय बरोबर राहून स्वतः आवश्यक ती मदत तो करतो. पण बाकीच्या गोष्टी जमल्या की, आठवणीनं एक दिवशी डबा काढूनही घेतो. मग त्याची मदत नसली, तरी आपण बुडत नाही हा आत्मविश्वास एकदा आला की मग शिकवणारा आपला पोटाखाली आधारासाठी धरलेला हातसुद्धा वेळीच काढून घेतो. कारण ही अंतिम मदतही थांबवण्याची वेळ आलेली असते. ते ओळखून केलं, तर पोहणारा लवकरच तयार होतो.

अशी वेळेला अगदी आवर्जून आणि योग्य प्रमाणात केलेली मदत आणि वेळ येताच थांबवलेली मदत ही खरी मदत म्हणावी लागेल, नाही का ?

आपण कुटुंबात काय, समाजात काय, एखाद्याकडून मदत घेत असू किंवा एखाद्याला मदत देतही असू, पण मदत करताना किंवा घेताना आवश्यक तिथं ती घेणं जितकं गरजेचं तितकंच ती मदत आपल्याला पांगळं करणार नाही ना याची खात्री करणं, ती देणं किंवा घेणं वेळीच थांबवणं आणि बिनमदतीचं राहाता येणं, स्वतंत्र होणं हा मदतीचा सुवर्णमध्य ठरेल. हा सुवर्णमध्य गाठता येणं उपयुक्त ठरेल, स्वत:ला आणि दुसऱ्यालाही !

***

## २६. सुशिक्षितपणाच्या खुणा

साने गुरुजींनी ज्या क्षेत्रांचा अत्यंत तळमळीनं विचार करून ठेवला आहे आणि मांडून ठेवला आहे, त्यांतलं एक अत्यंत महत्त्वाचं क्षेत्र म्हणजे शिक्षणाचं. ते स्वाभाविकच आहे. कारण ज्या क्षेत्रावर वर्तमानच नव्हे, तर साऱ्या समाजाचं भविष्य अवलंबून आहे, असं हे क्षेत्र आहे यात दुमत होण्याचं कारण नाही.

जगात कितीही मोठे आणि कितीही गंभीर प्रश्न असले आणि त्यांना वरवर पाहाता कितीही नि कोणतीही कारणं असली तरी त्यांतल्या बहुतांश प्रश्नांचं मूळ कारण 'माणूस' हाच असल्याचं आपल्याला आढळून येतं. तो माणूस अविकसित, अडाणी, आडमुठा, स्वार्थी, मतलबी, मत्सरी अशासारखा काही असणं म्हणजेच पर्यायानं तो जसा असायला हवा तसा नसणं, हेच या अनंत प्रश्नांचं खरं कारण असल्याचं दिसेल. असा हा 'हवा तसा नसलेला' माणूस 'हवा तसा' करण्याची प्रधान विद्या कोणती असेल तर ती म्हणजे 'शिक्षण' ही होय.

म्हणूनच हे जसजसं सर्वांना कळत गेलं तसतसा या शिक्षणक्षेत्राकडं बघण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. गंभीर होत गेला. त्या क्षेत्राला प्राधान्य आलं. त्यातूनच शाळामहाविद्यालयांचं जाळं इतर ठिकाणाप्रमाणं आपल्याही देशात कसं विणलं गेलं, वाढत गेलं याची आपल्याला कल्पना आहे.

जितका म्हणून शिक्षणाचा प्रचार, प्रसार करण्याचा धडाक्याचा प्रयत्न सुरू झाला, तसतसा त्याचं सार्वत्रिकीकरण करण्यामागच्या घाईमुळं म्हणा किंवा उत्साहामुळं म्हणा किंवा संख्यात्मक सुधारणेवरच्या अतिरिक्त भरामुळं म्हणा शिक्षणाच्या बाबतीतल्या तितक्याच किंवा वेळी त्याहूनही महत्त्वाच्या उद्दिष्टांकडं किंवा शिक्षणाच्या कसदारपणाकडं दुर्लक्ष होत गेलं आणि दुर्लक्ष होत आहे

हेही दुर्दैवानं ध्यानी आलं नाही, असं आपल्याला दिसून येईल.

कारण अमुक एक लोकसंख्या 'शिक्षित' झाली, किमान 'साक्षर' झाली, ती टक्केवारी कशी वाढत गेली अशा तऱ्हेच्या गोष्टींकडंच आपली नजर खिळली होती. हे म्हणजे थोडक्यात असं झालं, एखादा धनुर्धारी योद्धा दुसऱ्या योद्ध्याबरोबर चढाओढीनं बाण सोडायला लागावा, तो दहा मिनिटांत दहा बाण सोडतो, तर आपण दहा, वीस, तीस सोडू. असं करता करता दुप्पट चौपट कशी गाठू याचे प्रयत्न करावेत, ते यशस्वीही व्हावेत. पण ते यशस्वी करण्याच्या नादात शत्रूला बाण लागतो की नाही, याकडं दुर्लक्ष होऊन पूर्वी दहाच बाण सोडताना जेवढे लक्ष्यवेध करीत, तेवढे आज चाळीस बाण सोडूनही लक्ष्यस्थानी लागू नयेत - अशी अवस्था व्हावी तशीच काहीशी अवस्था या क्षेत्रातल्या प्रगतीच्या बाबतीत होत गेली.

म्हणूनच मुळात शिक्षणाचं उद्दिष्ट काय ? अशिक्षिताचा सुशिक्षित झाला म्हणजे त्याच्या खुणा कोणत्या, याचा विचार करण्याची साने गुरुजींसारख्या विचारवंतांना निकड वाटली. खूप माहिती डोक्यात कोंबलेली असणं किंवा स्मरणशक्तीची सरावानं वाढ करून अशी कोंबलेली माहिती वेळेला सादर करणं ही सुशिक्षितपणाची खूण गणली गेली.

इथं मोठी गफलत झाली, कारण असा 'माहितीवान सुशिक्षित' माणूस व्यक्ती म्हणून समाजाला हिताचा, पुढं नेणारा, कामाचा उरला नाही. उलट त्या माहितीलाच ज्ञान समजून त्याचा गर्व धारण करून इतरांना तुच्छ लेखून त्रासदायक ठरणारा, अपमान झाल्यास वेळी इतरांचा घात करणारा घटक बनला.

म्हणून साने गुरुजींनी सुशिक्षितपणाच्या खऱ्या खुणा सांगताना दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. पहिली म्हणजे, माणसाच्या माहितीच्या साठ्याची नव्हे तर 'ग्रहणशक्तीची वाढ' होणं. आकलनाची, ग्रहणाची क्षमता ही त्याच्या आणि

समाजाच्या दृष्टीनं अत्यंत गरजेची, विधायक बाब आहे. त्याचबरोबर दुसरी महत्त्वाची खूण ही माणसाजवळ शिक्षणानं 'नम्रता' किती वाढली, जितकं जास्त शिक्षण होईल, तितका माणूस अधिक 'नम्र' झाला पाहिजे. तर त्याला स्वत:लाही ते हिताचं ठरतं आणि समाजालाही प्रेरणादायक आणि स्वास्थ्याचं ठरतं !

म्हणून साने गुरुजींनी सांगितलेल्या या दोन महत्त्वाच्या निकषांवर आपल्या शिक्षणाची परीक्षा करून पाहिली, तर आपल्या शिक्षणाची खरी स्थिती समोर येईल नि आपल्याला दिशाही मिळेल.

***

## २७. अज्ञानाचं ज्ञान

लहानथोर प्रत्येक माणसाला काही ना काही माहिती ही असतेच. तेवढ्या मर्यादित अर्थानं प्रत्येक जण ज्ञानी असतो असंच म्हणावं लागेल. त्यातही माणसाच्या बाबतीत एक विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याला ज्ञानाची एक सूक्ष्म आणि निरंतर ओढ असते.

रस्त्यानं गर्दीत लोक जाताना दिसले आणि याला स्वत:चं खूप काम पडलेलं असलं तरी त्यातून दोन मिनिटं थांबून दाराशी किंवा खिडकीशी जाऊन त्याला विचारावंसं वाटतं की, काय झालं, कसली गर्दी ? रस्त्यावर एखादा चित्रविचित्र आवाज जरी ऐकला तरी त्याचे कान टवकारतात, त्याला वेळ नसला तरी वाटतं की कळून घ्यावं, आवाज कसला होता ? कळल्याशिवाय चित्ताला स्वस्थता येत नाही. न कळलं तर त्या गोष्टीशी आपला संबंध नाही, कळूनही काही उपयोग नाही, हे माहिती असूनसुद्धा - न कळलं तर, आहे त्या चाललेल्या कामात लक्ष लागत नाही. इतकी ज्ञानाची ओढ माणसाला उपजतच आहे.

इतकंच काय, त्यामुळंच की काय कुणास ठाऊक एखादी गोष्ट एखाद्याला कळू न देता केली गेली किंवा नकळत करायची ठरवली तर त्याला त्यात त्याचा फार मोठा अपमान किंवा शिक्षा वाटते. घरात साधी एखादी वस्तू जरी घ्यायची ठरली, घरातल्या मोठ्या माणसाच्या कानावर ते घालायचं राहिलं आणि प्रत्यक्ष ती वस्तू आणल्यावरच त्यांनी पाहिली तर आधी काहीच 'न कळल्याबद्दल' तो माणूस पुढं चार-आठ दिवस अस्वस्थ राहातो. इतरांच्या कानांवर आपली नाराजी घालतो, हे आपण पाहिलं असेलच.

पण यातही एक वैशिष्ट्य आहे,ते असं की, कळून घेण्याची,

ज्ञान करून घेण्याची माणसाला जी एवढी ओढ असते, त्यापोटी प्रत्येक मनुष्य तसा थोडाफार जाणणारा -'ज्ञानी' असतो. त्याच्या जाणण्याचा विषय मात्र काही अमुक एक असा नाही. घरप्रपंचापासून जगाच्या शांततेच्या प्रयत्नांपर्यंत कोणत्याही विषयाचं ज्ञान त्याला असू शकतं आणि तेवढ्याच्या आधारावर तो स्वत:ला माहितगार, जाणकार, ज्ञानी असं समजू शकतो, समजतोही.

ज्ञानी समजतो म्हणायचं अशासाठी की, एखाद्याला 'काही कळत नाही' असं म्हटलं की, त्याचा राग लगेच उफाळून येतो. एखाद्या वयस्कर माणसाला 'तुम्हाला प्रपंचातलं किंवा अमक्यातमक्यातलं काय कळतंय' असं चुकून जरी म्हटलं तरी होणाऱ्या प्रतिक्रियेवरून कळतं की, नकळत का असेना तो स्वत:ला किती 'ज्ञानी' समजतो.

अशाच काही ज्ञानी माणसांसंबंधी एक गोष्ट सॉक्रेटिसच्या काळात घडलेली आपल्याला ठाऊक असेल. सॉक्रेटिसच्या वेळी अत्यंत ज्ञानी म्हणून प्रसिद्ध असलेले आणि स्वत:ची शिष्य परंपरा जपणारे काही 'विद्वान' होते. सॉक्रेटिस हा तर ज्ञानाचा उपासकच होता. पण सतत लोकांना प्रश्न विचारून विचारून विचार करायला प्रवृत्त करणारा आणि खऱ्या सत्य-ज्ञानापर्यंत नेणारा होता. तो स्वत:ला कधी 'ज्ञानी' समजत नसे. लोकांनी त्याला तसं समजावं अशीही त्याची अपेक्षा नसे. आपल्याला काय काय कळतं आहे याचा गर्व सर्व जग बाळगतं. असं असताना तो मात्र आपल्याला काय काय कळत नाही, ते समजून घेण्यात आणि मान्य करण्यात तत्पर असे.

गावातल्या काही विद्वानांत, खरा ज्ञानी कोण आहे हा वाद झाला. दुसऱ्याचं ज्ञान मान्य करायला कुणीच तयार नसल्यानं हा वाद मिटेना. शेवटी देवाला कौल लावायचा ठरला. महत्त्वाच्या विद्वानांच्या नावासाठी कौल लावल्यावर कुणीतरी सॉक्रेटिसचं नावही त्यात घेण्याची सूचना केली. कौल लावला.

हे सगळे तथाकथित विद्वान बाजूला ठेवून देवानं 'खरा ज्ञानी' म्हणून सॉक्रेटिसला कौल दिला. विद्वानांत एकच खळबळ उडाली. सॉक्रेटिस त्या साऱ्यांपासून लांबच होता. त्याला कुणीतरी हे सांगितलं. तो शांतच राहिला. तो म्हणाला,'माझ्या ज्ञानाची मला कल्पना नाही. पण मला माझ्या अज्ञानाचं बऱ्यापैकी ज्ञान आहे. म्हणून कदाचित असा कौल मिळाला असेल.'

आपल्याला हे सहज लक्षात येईल की, आपल्याला कळतं याचा मोठेपणा बाळगण्यापेक्षा आपल्याला काय कळत नाही, याची नम्र जाणीव बाळगली तर 'खऱ्या ज्ञानाची कवाडं' आपल्याला उघडतील.

***

## २८. विकासाची वाट

विकास हा तसा आज परवलीचा शब्द झाला आहे. व्यक्तिगत पातळीवर असो, सामाजिक पातळीवर असो, राष्ट्रीय पातळीवर असो, जागतिक पातळीवर असो - 'विकास' किंवा 'विकासाचा विचार' आज प्रधान धरला जातो. हा 'विकास' जसा वेगवेगळ्या पातळीवर केला जातो तसा तो वेगवेगळ्या क्षेत्रांच्या बाबतीत, वेगवेगळ्या विषयांच्या बाबतीतसुद्धा केला जातो - जसा आर्थिक विकास, नैतिक विकास, शैक्षणिक विकास, कलागुणात्मक विकास.

त्या दृष्टीनं आजूबाजूला अनेक व्यक्ती, सामाजिक संस्था, निमसरकारी - सरकारी संस्था या विविध प्रकारच्या विकासांसाठी प्रयत्न करीत असलेल्या आपल्याला दिसतील. त्यासाठी वेगवेगळ्या योजना बनवणं, कार्यक्रम बनवणं, आवश्यक ती साधनसामग्री गोळा करणं, त्या योजनेची विशिष्ट वेळेत अंमलबजावणी करणं असंही कार्य सुरू असलेलं आपल्याला दिसतं. अनेकदा पूर्वापार चालत आलेले धर्म-पंथ-संप्रदाय हेही अशा प्रकारचं विकासात्मक कार्य नेटानं करताना दिसतात.

याच्याच बरोबर दुर्दैवानं असंही एक चित्र आपल्याला दिसेल की, मुळात विकासाच्या कामासाठी म्हणून उभ्या राहिलेल्या संस्था, संप्रदाय कुठंतरी एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. वेळी संघर्ष करताहेत. मग काही विशिष्ट मुद्द्यांवरच्या मतभेदातून सुरू झालेला वाद-संघर्ष मुद्द्यावरून गुद्द्यावर येतो आहे, तत्त्वं हळूहळू बाजूला पडून वैयक्तिक उखाळ्या-पाखाळ्या, हेवेदावे, आरोपप्रत्यारोप, वेळी आर्थिक संघटनात्मक गैरव्यवहार असा सारा असंस्कृत प्रकार घडलेलाही दिसून येतो.

जगात शांततामय मार्गानं विकास व्हावा म्हणून

स्थापलेल्या संस्थेच्या अध्यक्षांनी नि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी एकमेकांतल्या सत्तास्पर्धेमुळं असलेली आधीची शांततासुद्धा घालवण्याचा प्रकारही दुर्मीळ नाही.

काही काही वेळा मात्र या चित्राची दुर्दैवी बाजू समोर वेगळ्याच स्वरूपात येते आणि ती म्हणजे विकास कशा पद्धतीनं करावा या बाबतीतल्या तीव्र मतभेदांमुळं. एक संस्था एका पद्धतीनं विकास घडवणं आवश्यक आणि योग्य समजते तर दुसरी दुसऱ्या पद्धतीनं. काही वेळा या मतांना आग्रहाचं नि हट्टाचं स्वरूप येतं. ते इतकं पराकोटीचं की वेळी स्वत:चं विकासकाम सोडून दुसऱ्याची पद्धत कशी चुकीची आहे, इतकंच नव्हे तर ती पद्धत बंद कशी पडेल यासारखे मुद्दे मांडणं आणि अंमलात आणणं हेच काम होऊन बसतं.

हे असं वेगवेगळ्या प्रकारचं दुर्दैवी चित्र का दिसतं आणि 'विकास' हे सर्वांना मान्य असलेलं, सर्वांच्या हिताचं असलेलं उद्दिष्ट असूनसुद्धा असं का होतं याची मीमांसा पूज्य साने गुरुजींनी समर्पकपणे केली आहे. त्यांनी 'विकासा'संबंधीच्या आपल्या मूलभूत विचारांमध्ये सांगितलं आहे की, विकास करताना आपण आपल्याला झालेलं विकासाचं दर्शन, त्याचा आपण केलेला विचार सत्य आणि बरोबर म्हणून गृहीत धरलेला असतो. पण सत्य ही सर्वांच्याच मालकीची वस्तू आहे आणि विकास हा सर्वांचाच अधिकार आहे, याचा विसर आपल्याला पडतो.

म्हणून माझंच म्हणणं बरोबर असा एकांगी निष्कर्ष आपण काढतो. इतकंच नव्हे तर, त्यानुसार वेळी दुसऱ्याच्या विकासाच्या आड आला तरी चालेल अशा पद्धतीनंसुद्धा स्वत:चा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न आपण करतो. असं घडल्यानंच आधी सांगितलं तसं विघटन, संघर्ष अशा काही दुर्दैवी गोष्टी घडतात.

या बाबतीत साने गुरुजी म्हणतात,'जो माझा विकास दुसऱ्याची वाढ खुंटवूनच मला साधता येतो, तो माझा खरा

विकासच नव्हे. प्रत्येकानं दुसऱ्यांनाही स्वातंत्र्य द्यावं आणि स्वत:चाही विकास करावा.' आपल्याला जशा विकासाच्या कल्पना, योजना नि त्या अंमलात आणण्याचं स्वातंत्र्य आहे, तसंच ते सारं दुसऱ्यालाही आहे. हे लक्षात घेतलं तर साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणं 'सर्वांच्याच मार्गातला अंधार दूर होऊन प्रगतीचं पाऊल टाकायला सर्वांनाच प्रकाश मिळेल.'

यासाठी 'विकासाची वाट' सर्वांच्याच मालकीची असते, हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे !

***

## २९. स्वत:साठीही जगा

बाबुरावांच्या घरासमोरच्या अंगणातल्या बाकड्यांवर आम्ही त्यांचे काही मित्रमंडळी बसलो होतो. हृदयविकाराच्या आकस्मिक आघातानं बाबुरावांचं सकाळीच निधन झालं होतं. नुकतंच क्रियाकर्म उरकून आम्ही परतलो होतो. पण त्यांच्या घरातून पाय निघत नव्हता.

तसा त्यांचा माझा बऱ्याच वर्षांचा परिचय होता, फक्त बदलीमुळं परगावी राहण्यानं गाठीभेटी मधल्या काळात वर्षावर्षांनी होत. मात्र अलीकडं आठवडाभरापूर्वीच त्यांची झालेली भेट अन् संभाषण माझ्या डोळ्यांसमोर सारखं येत होतं.

त्यावेळी ते भेटले तेव्हा ते नेहमीसारखे काळजीत अन् प्रापंचिक योजनांत होते. थोडासा वादविषय त्यावरूनच झाला होता. त्यांच्या निवृत्तीला आता फक्त दोन वर्षंच राहिली होती. त्यांना तीन मुलं होती. एक मुलगी लग्न होऊन सासरी गेली. तर तिची तिकडं परिस्थिती बेताची असल्यानं तिच्यासाठी दोन लाख रुपये ते बाजूला ठेवण्याच्या प्रयत्नांत होते. दोन्ही मुलांची शिक्षणं त्यांनी बराच पैसा खर्च करून पुरी केली होती.

एकाला मोठ्या प्रयत्नानं नोकरी लागली होती. त्याचं लग्नही झालं होतं, पण त्याला झालेला मुलगा जन्मत:च अपंग होता. त्या नातवाची बाबुरावांना काळजी वाटे. त्यामुळं मुलासाठी काही आर्थिक तरतूद करून ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या बाबुरावांना अलीकडं त्या नातवासाठीसुद्धा काही वेगळी तरतूद करावीशी वाटे.

दुसऱ्या मुलाचं शिक्षण पुरं होऊनही त्याला नोकरी लागत नव्हती आणि त्याला त्यात रसही नव्हता. त्यानं स्वत:चा धंदा काढला होता. आधी त्याच्यासाठी भांडवल उभं करण्यासाठी बाबुराव धडपडत होते. पुढं ते केल्यावर धंद्यातले चढउतार पाहाता त्याच्यासाठी काही वेगळी रक्कम बाजूला ठेवण्याच्या प्रयत्नाला ते

लागले होते. हे अजून दोन वर्षांनी येणाऱ्या निवृत्तीपूर्वी व्हावं, म्हणून बाबुराव अजूनही पोटाला चिमटा घेऊन राहात होते. आमचा विषय त्यावरूनच झाला होता. बाबुरावांना वाचनाचं वेड होतं, संगीताची आवड होती. पण या साऱ्या गोष्टी त्यांच्या या साऱ्यांची व्यवस्था लावण्याच्या प्रयत्नात कधीच हद्दपार झाल्या होत्या.

मी त्यांना अखेर थोडंसं रागावूनच म्हटलं होतं की, तुम्ही स्वत:साठी काही जगणार की नाही ? का इतरांचं सारं करतानाच एक दिवशी पटकन राम म्हणणार ? दुर्दैवानं आठवड्यातच तो दिवस आला.

प्रश्न बाबुरावांचा नव्हता. तसा तो अनेकांचा असतो. अत्यंत स्वार्थीपणे स्वत:चं सुख पाहात आयुष्य काढणारे लोक एका बाजूला असतात. ते नक्कीच कुणाला आवडणारे नि पटणारे नसतात. तो आदर्श कधी कुणापुढं कुणी ठेवीतही नाही.

पण असे दुसऱ्या टोकाकडं झुकणारे लोकही अलीकडं अनेक ठिकाणी दिसतील. आपल्या पत्नीला, मुलांना कुठलीही अडचण पडू नये म्हणून ते इतके धडपडताना दिसतील. प्रत्येकासाठी स्वतंत्र ब्लॉक घेतील, त्यांतल्या सोयीसुद्धा सर्व मुलांना सारख्या कशा मिळतील हे पाहतील, वाहन घेतलं तर प्रत्येक मुलाला स्वतंत्र घेतील. शक्यतो सारखं नि चांगलं. त्यांच्यासाठी आणीबाणीच्या प्रसंगी उपयोगी पडावी, म्हणून प्रत्येकाची वेगळी आर्थिक तरतूद करण्याचा प्रयत्न करतील.

यात तसं नावं ठेवण्यासारखं काही चूक वाटत नाही, हे खरं. पण जरा अधिक विचार करा ! मुलांच्या कर्तृत्वाला यात वाव राहातच नाही. अनेकदा हे सारंच मिळाल्यानं मुलांना त्याची किंमतही राहात नाही. अनेकदा अशा मुलांना आईवडिलांविषयी कृतज्ञता वाटून ती चांगल्या मार्गात राहण्यापेक्षा, आयत्या हाताशी उरणाऱ्या पैशामुळं तिसऱ्याच मार्गाला लागलेली दिसतात.

हे त्यांचं झालं, पण विचार केला, तर स्वत:च्याबद्दलचंही नुकसान लक्षात येतं. स्वत:ला असलेले साधे साधे छंद, आवडी कधीच सोडल्या जातात. त्या छंदांमुळंसुद्धा आपल्या व्यक्तित्वाचा विकास होत असतो. इकडं दुर्लक्ष केलं जातं. स्वत:च्या नि मुलाबाळांच्या तरतुदी करून त्यांना वेळी पंगू करण्याच्या धडपडी पलीकडंसुद्धा आपलं स्वत:चं म्हणून एखादं विकासाचं, पूर्णत्वाचं ध्येय असू शकतं, याचं विस्मरण घडतं आणि अर्थातच होणारं नुकसानही आपलंच असतं.

म्हणून सर्वांसाठी जगताना कुठंतरी थोडं 'स्वत:साठी जगा' म्हणून सांगण्याची वेळ येते, गरज वाटते.

***

## ३०. बोलकी मदत

कुणा संस्थेच्या वतीनं काही विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम होता. सकाळपासून रेकॉर्ड लागल्या होत्या. चार दिवस आधीपासून मोठे बॅनर्स आणि बोर्डस् चौकात वगैरे लागलेले होतेच. संध्याकाळपर्यंत रेकॉर्डस् झाल्यावर मग थोर पुढारी वगैरे येऊन फोटो, हारतुरे सारं काही झालं. कार्यक्रमाचं व्हीडिओ शूटिंग झालं. कार्यक्रम स्पीकरवरून सहज ऐकू येत होता. ते ऐकलं तर ज्यांना मदत केली अशी मुलं सुमारे बारा पंधराच होती. कार्यक्रमात उपस्थित श्रोते, कार्यकर्ते, वार्ताहर वगैरे सारे मिळून पाचसातशे तरी माणसं हजर होती.

दुसऱ्या तिसऱ्या दिवसापासून वेगवेगळ्या वृत्तपत्रात फोटोसह मोठमोठ्या बातम्याही झळकल्या. संस्थेचे एक कार्यकर्ते सहज भेटले. ते बहुधा संचालकांच्या ग्रुपमधले नसावेत.

कारण त्यांनी सहज आकडेवारी सांगितली की, मूळ मदतीवर झालेला खर्च या साऱ्या कार्यक्रमाच्या खर्चाच्या पावपटच होता. पंचवीस टक्के मदत आणि उरलेले पंच्याहत्तर टक्के त्या मदतीची प्रसिद्धी व्हावी म्हणून केलेला खर्च होता. अशी मदत अनेक अर्थानं 'बोलकी मदत' असते, नाही का ?

मदत करणं ही एक सामाजिक, व्यक्तिगत गरज आहे, यात दुमत असायचं कारण नाही. कारण सर्वांनाच तिची गरज लागते आणि तशी ती लागत राहणारही. जमिनीवर जसं उंचसखल असणार तसं माणसातही कुठं संपन्न, कुठं विपन्न, कुठं भरपूर, कुठं अपुरं - हे असणारच. ते गरजेप्रमाणं भरून काढण्याचे प्रयत्न प्रामाणिकपणे करणं ही मानवी संस्कृतीच आहे.

ही मदत करताना व्यक्तीनं करणं, संस्थेनं करणं यातही फरक आहे. व्यक्तीनं मदत केली, तर तिला ना कुठल्या पावतीची गरज, ना

फोटोची गरज. संस्था ज्यावेळी हे सारं करते, तेव्हा तिला हिशेब, जबाबदारी, साक्षपुरावा सर्व काही असतं. त्यामुळं त्यांना काही व्यक्तीसारखं निरपेक्ष किंवा काही गाजावाजा न करता राहाणं कसं जमेल ? पण मदत करण्यापेक्षा तिचा गाजावाजा करणं हेच जर उद्दिष्ट झालं, तर मात्र ही मदत अनेक अर्थानं बोलकी ठरते, हे खरं. अशी बोलकी मदत घेणाऱ्यांनासुद्धा अडचणीची ठरू शकते, हे वेगळंच.

आपण तर अशीही उदाहरणं पाहिली असतील की, दोन सामाजिक संस्थातल्याच हेवेदाव्यापोटी एखाद्याला मदत करण्यातसुद्धा चुरस निर्माण होऊन मदत घेणारासुद्धा अडचणीत येईल, इतकी ही मदत बोलकी ठरते. त्यात पुन्हा मदत करणाऱ्यांच्यात गटतट, पक्ष, राजकारणं - अशा काही गोष्टी शिरलेल्या असतील, तर अशा मदती नुसत्या बोलक्याच नाहीत, तर संघर्षमयही बनतात.

यातला संस्थेचा भाग क्षणभर जाऊ द्या. पण व्यक्तिगत पातळीवरसुद्धा अनेकांना मूक मदतीपेक्षा बोलकी मदतच मनातून आवडते, असं आढळेल. एखाद्याला ते मदत करतील, अगदी पदरमोड करूनसुद्धा करतील, पण पुढं तो कुणाकडं त्याचा उल्लेख करतो आहे की नाही याच्याकडं कळत नकळत लक्ष ठेवतील. ही मदत तशी बोलकीच म्हणावी लागेल. मदत करणाऱ्यांच्या सर्वत्र लागलेल्या पाट्या आणि संगमरवरातली खोदकामं आपल्याला या बोलक्या मदतीचे पुरावे देऊन टाकतील.

याउलट अनेकांचं उदाहरणही आपल्याला दिसेल ते मदत करतीलच, पण ते ते विसरूनही जातील. आपल्याकडून अपेक्षाही राहणार नाही की याबद्दल उच्चार व्हावा. अशा अर्थानं मूकपणे केलेल्या मदतींची अनेक उदाहरणं आपल्यालाही माहिती असतील.

यासंबंधी एक उदाहरण पाहण्यासारखं आहे. एकांनी गरजू विद्यार्थ्याची शिक्षणाची फी सर्व शिक्षण संपेपर्यंत त्याच्या वडिलांच्या मार्फत भरली. या मदत करणाऱ्या गृहस्थांची एकच अट होती.

त्यामुळं, ती त्या विद्यार्थ्यालाही कळली नव्हती. हे मदत करणारे गृहस्थ कालांतरानं गेले.त्यावेळी त्यांच्या घरी सांत्वनासाठी भेटायला जाण्यापूर्वी, या मुलाच्या वडिलांनी,त्याच्या शिक्षणाची फी या गेलेल्या गृहस्थांनी भरली होती आणि ते हयात असेपर्यंत या मुलाला ते सांगू नये, अशी अट घातली होती. त्यामुळं ही गोष्ट वडिलांना आजवर सांगता आली नव्हती. हे मदत करणारे गृहस्थ आता गेल्यामुळं, वडिलांनी या मदतीची कल्पना मुलाला दिली. आता वडिलांच्या बरोबर,हा सुशिक्षित झालेला मुलगा जेव्हा,त्या गृहस्थांच्या घरच्यांना भेटायला गेला, तेव्हा त्याच्या मनात कोणते भाव असतील, याची आपण कल्पना करू शकतो. ही मदत बोलकी तर नव्हतीच, पण खरी मदत कशी असावी, याचा तो एक आदर्शच होता !

ही मदतीची चर्चा एवढ्यासाठी की, शास्त्रात एके ठिकाणी उल्लेख आहे की, उच्चार झाला की पुण्यसुद्धा नाहीसं होतं. त्याचं फळही अर्थात नाहीसं होतं.

त्या अर्थानं विचार केला, तर मदत जर मूक राहिली तर कर्त्याला फलदायी राहील. व्यवहारानं, नाईलाजानं कधी विषय होईलही, पण तो मुद्दाम केलेला नसेल. असं झालं तर ही मूक मदत उपयोगी ठरेल.

बोलकी झाली - त्यातही मुद्दाम बोलकी झाली - तर तिचं मूल्य कमी होईल, तिच्यापासून लाभही कमी होईल !

***

## ३१. एक विश्वासू हितचिंतक

आरसा ही आपल्या आयुष्यात अगदी सर्वांच्या दैनंदिन जीवनात एक छोटीशी, पण नगण्य वाटणारी गोष्ट असते. तो बेसिनवर, भिंतीवर, कपाटावर नुसता असतो. यापलीकडं आपल्याला त्याचं काहीच विशेष मोल नसतं, असं आढळून येतं. एखादं मिनिट त्यात डोकावण्यापलीकडं त्या आरशाला काही महत्त्व आपल्या आयुष्यात आहे, असं आपल्याला बहुधा वाटत नाही. पण हे खरं आहे का, हे पाहाणं मात्र जरा उपयोगी ठरेल, असं वाटतं.

एका सत्पुरुषांनी सांगितलेली एक गोष्ट पाहू. एक लग्नाचा मुलगा होता. तसा नोकरीनं वगैरे बरा असला तरी स्वतः रूपानं सुमारच होता. बाकी परिस्थिती वगैरे यथातथाच होती. पण स्वत:विषयी कल्पना पाहाल तर मात्र साऱ्या 'सिनेयुगातल्याच' होत्या. त्याची अर्थातच भावी पत्नीबद्दलची अपेक्षा काही विशिष्ट होती, निश्चित होती. म्हणजे तशा बऱ्याच अपेक्षा होत्या. तरीही त्याला प्राधान्यानं मुलगी सुंदर हवी होती. त्यानुसार मग मुली पाहाणं सुरू झालं.

याच्या अपेक्षेत कुठलीच मुलगी बसेना. जिलातिला तो नावं ठेवायला लागला. आईवडील अगदी कंटाळून गेले. त्याची एक मोठी बहीण होती, चतुर होती, अनुभवी होती. अखेर तिलाच ते त्याच्याबरोबर मुली पाहायला पाठवू लागले. तिनंही काही दिवस याच्याबरोबर जाऊन अनुभव पाहिला. तिच्या हळूहळू लक्षात यायला लागलं.

अखेर तिच्या दृष्टीनं बरीचशी माहिती चांगली वाटलेली मुलगी ते पाहायला गेले. परत आल्यावर याची नेहमीप्रमाणं नाकं मुरडायला सुरुवात झाली.दिसायला ती मुलगी खरी तशी सर्वसामान्य, पण व्यवस्थित होती. याला ती काळीमेळी वाटली. सुंदर तर नाहीच

वगैरे वगैरे.

बहिणीनं सारं ऐकून घेतलं. आतल्या खोलीत गेली. एक आरसा आणला. त्याच्यासमोर धरला आणि विचारलं,'याच्या शेजारी ती मुलगी कशी वाटते ते सांग.' तो एकदम चमकला. आपली स्वत:ची स्थिती त्याला आरशात एकदम दिसली. क्षणभर तो गप्प झाला. मग नरम स्वरात म्हणाला,'बरीच बरी आहे.'

ही आरशाची एक करामत आहे. आपण अनेकदा स्वत:विषयी मोठमोठ्या भ्रामक कल्पनात वावरत असतो. अनेकांची अशी समजूत असते की, त्यांची योग्यता फार मोठी असून त्यांच्या वाट्याला आलेली नोकरी, त्यांना दिली गेलेली पोस्ट, घरची माणसं फारच सामान्य आहेत. ते फार मोठ्या सन्मानाला लायक असूनही त्यांना फार हलक्या दर्जाची कामं करावी लागतात, फार खालच्या-सामान्य हुद्द्यावर कारकुनी करावी लागते - एक ना दोन !

अशा तक्रारी करीत ही माणसं जगतात आणि अर्थातच आजूबाजूच्या सर्वांवर अन्याय तर करतातच, पण त्यांचं स्वास्थ्यही अशा या कॉमेंट्सनं घालवीत असतात. अशा माणसांच्या रोगावर 'आरसा' हे एकच रामबाण औषध असतं, याची आपल्याला कल्पना नसते.

अर्थात असाही विचार मनात येऊ शकेल की, हे जर इतकं सोपं 'रामबाण' औषध आहे तर ते सर्रास का वापरलं जात नाही ? घरच्या घरी ते घेऊन लोक बरे झालेले का दिसत नाहीत ? पण थोडा विचार केला तर हे लक्षात येईल की, असं 'पाहाणं' हेच बरेचदा माहीत नसतं. याला काही इलाज नाही. ते वैचारिक बेसावधपण आहे. घरात एखादं रामबाण औषध असलं आणि माहीत नसलं तर आजारी माणूस एकतर वणवण करील किंवा ते शक्य नसलं तर इकडं आजार वाढेल, तसं हे असतं.

दुसरं हे की, जरी हे माहीत असलं तरी साध्या आरशात

पाहाणं सोपं असतं. पण अशा हितचिंतक, विश्वासू, मित्ररूप आरशात डोकावणं मात्र थोडं धाडसाचं आहे. तितपत वृत्तीचा मोकळेपणा अन् प्रामाणिकपणा लागेल. तो मित्र दाखवतो त्यातले अर्थही उलगडावे लागतील. त्यामुळंही हा 'विश्वासू हितचिंतक' अगदी हाताशी असूनही बहुधा बऱ्याच जणांना उपयोगी पडत नसावा.

अर्थात आणखीही एकच गरज असते, ती म्हणजे आरशाची काच स्वच्छ पुसून ठेवावी लागते. ती स्वच्छ नसली तर नसलेले गुण तो आरसा आपल्या प्रतिबिंबाला चिकटवण्याची शक्यता असते आणि असलेले दोषही आपल्या प्रतिबिंबात झाकून टाकण्याची शक्यता असते.

पण एवढं केलं आणि या दृष्टीनं पाहिलं, तर आरसा ही घरातली एक फुटाभरची नगण्य वस्तू नसून ते खऱ्या सुखाचं आणि स्वास्थ्याचं एक मूल्यवान साधन असतं !

तो नुसताच भिंतीवर वा बेसिनवर लटकवलेला काचेचा तुकडा नसून आपल्याला स्वत:चं दर्शन घ्यायचं आवाहन करणारा आपला विश्वासू हितचिंतक असतो.

***

## ३२. नकोशी मदत

मदत करणाऱ्यांचे इतके प्रकार जगामध्ये असतात, हे विचार केला तरच कळतं. त्या मदत करणाऱ्यांचे पुन्हा मदत करण्याचेसुद्धा इतके प्रकार असतात की, त्यावरही विचार करण्याची वेळ येते. एखाद्या गायकाबरोबर साथीदार हे मदतीसाठीच असतात. तसेच काही गायकांच्या बरोबर त्यांचे घरचे पालक किंवा मित्रमैत्रिणी हेही मदतीसाठी बरोबर असतात. काही प्रमाणात मदतीची गरज म्हणूनच हे घडतं, ते स्वाभाविकही आहे.

पण प्रत्यक्षात त्यांचं त्यांच्या पुढंमागं येणंजाणं, स्टेजवर कार्यक्रमाच्या वेळचा त्यांचा वावर पाहिला की, असं वाटतं की अनेकदा तो कलाकारसुद्धा या मदतीनं अडचणीत येतो आहे. त्याच्या चेहऱ्यावरसुद्धा असे भाव येऊन जातात. तीच गोष्ट अनेकदा साथीदारांच्या मदतीचीही घडते. मूळ गाणाऱ्याच्या योजनेत मदत करण्यासाठी, त्यात रंग भरण्यासाठी, त्याचं गाणं उठावदार व्हावं या हेतूनं मदत करण्यासाठी खरं म्हणजे त्यांची नेमणूक असते, त्यांना बरोबर घेतलेलं असतं. पण काही वेळा हे मदतनीस अशी काही मदत करतात की ऐकणाऱ्याला वाटावं की, कार्यक्रम नक्की कुणाचा आहे ?

हे काही कुठल्या मैफिलीलाच लागू आहे असं नव्हे. व्यक्तीव्यक्तींच्या संबंधातल्या मदतीलाही ते तितकंच किंबहुना जास्तीच लागू आहे. कारण त्याचा संबंध आपल्या व्यवहारात जास्त आहे. एखाद्या बाईनं स्वयंपाकाला जरा मदत करणार का म्हणून मैत्रिणीला, शेजारणीला विचारावं आणि तिनं येऊन अख्खं स्वयंपाकघरच ताब्यात घ्यावं हा प्रकार आपल्याला आढळत नाही का?

अशा वेळी मदत घ्यायला जाणारा किती अडचणीत येतो

याचा विचार करण्याची गरज आहे. बरं हे एवढ्यावर थांबतं असंही नाही. काहींच्या मदतीचा प्रकार आणखीनच और असतो.

एखाद्या गवंड्यानं किंवा प्लंबरनं अर्धवट टाकलेलं काम पुरं करण्यासाठी दुसरा गवंडी किंवा प्लंबर आणला तर ते काम पुरं करण्यापूर्वी तो पहिल्या कामातले फॉल्ट काढण्यात अर्ध्या दिवसाची मजुरी घेतो आणि मग उरलेल्या दिवसात पहिल्या कामाची शक्य तेवढी पाडापाडी करतो आणि या पूर्ण दिवसाची मजुरी यातच जाते आणि दुसरे दिवशी खरं काम करतो.

तशी काहीशी पद्धत या मदत करणाऱ्यांची असते, असं आढळून येईल. हाक मारली की मदतीला येतील, पण आतापर्यंत कामात झालेल्या सर्व चुका वेळी दाखवून देतील, त्यापूर्वी कुणी त्याला मदत केली असल्यास त्या सर्वांचा उद्धार करतील आणि मगच मदतीला हात घालतील. असं झालं तरी मदत घेणाऱ्यांचा 'हरी' अडलेला असल्यानं तो नाईलाजानं मदत घेतो, पण मनातून त्याला अशी मदत नकोशी वाटते, हे खरं.

पण याउलट विनोबांनी सूर्याचं उदाहरण दिलेलं आहे तशी मदत करणाऱ्यांचासुद्धा प्रकार असतो. सूर्याच्या सेवेचं उदाहरण देताना त्यांनी म्हटलं आहे की, तो सदैव मदतीसाठी तयार आहे. उजाडलं की तो दारी उभा राहील. फट असेल तर किरणांनी प्रवेश करेल. तुम्ही नाही लवकर उठलात, नाही दरवाजा उघडलात तर तो दाराशी उभा राहील अगदी दहा वाजले तरी. पण 'किती वेळ झाला मी तुम्हाला मदत करण्यासाठी उभा आहे !' म्हणून त्रागाही नाही की दरवाजा फोडून आत प्रवेशही करणार नाही !

यातून अशा मदत करणाऱ्यांनी बरंच शिकावं, असं वाटतं. मदतीची गरज, प्रमाण, वेळ, ती थांबवण्याची, आवरती घेण्याची वेळ या साऱ्याच बाबतीत अनेकांच्या मदतीबद्दल आपल्याला विचार करावासा वाटेल. एखादी मदत एखाद्याकडून एकदा घेतली की ही

मदत आता मीच करणार अशी काहींची अपेक्षा असते, किंबहुना पक्की समजूत असते. एखाद्या शेजाऱ्याकडून आपण वस्तू आणली आणि दुसऱ्यांदा तीच वस्तू दुसऱ्यांकडून आणली तर हा पहिला शेजारी दुखावतो, याला काय म्हणावं, हे खरोखर कळणं कठीण आहे.

इतरांचं जाऊ द्या, पण आपल्यापुरतं पाहिलं तरी आपण अनेकांना अनेक बाबतीत जी मदत करतो ती अशी त्यांना कुठं त्रासाची ठरेल, नकोशी वाटेल अशी होत नाही ना, याचा विचार करण्याची तरी गरज आहे. म्हणजे हे प्रमाण जर सांभाळता आलं तर विनाकारण मदत करीत राहणं जसं टळेल, तसंच त्यांनाही हवीशी तेवढीच मदत घडून आनंद मिळेल. त्यांचं काम खऱ्या अर्थानं सफल होईल ! अशी मदत हवीशीही वाटेल.

***

## ३३. सामर्थ्याची साधना

पूज्य साने गुरुजींनी ज्यावर मौलिक चिंतन करून ठेवलं आहे अशी आणखी एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'सामर्थ्याची'. आपण पाहतोच की, प्रत्येकालाच सामर्थ्यवान व्हावं असं वाटत असतं. हे आजच वाटतं आहे असं नाही. अनादिकालापासून सामर्थ्याची ओढ माणसाला आहे. त्यासाठी त्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

एखादी गोष्ट मनाप्रमाणं किंवा योग्य रीतीनं, आवश्यक त्या प्रकारानं घडवून आणायची असेल तर त्यासाठी सामर्थ्याचीच माणसाला गरज असते. जन्मल्यापासून मरेपर्यंत आपल्या कल्पनेप्रमाणं आपल्या आपल्या परिस्थितीला, जगाला आकार देण्याचा, त्यात बदल घडवून आणायचा प्रयत्न माणूस करीत असतो. अगदी लहान मूल असलं आणि त्याच्याकडं तसं कुठल्याच प्रकारचं शारीरिक, आर्थिक, शाब्दिक सामर्थ्य नसलं तरी तेही काही एका सामर्थ्यानं त्याला पाहिजे ती गोष्ट मिळवू शकतं. मग भले ते सामर्थ्य त्याच्यावरच्या प्रेमामुळं त्याच्यात येवो,त्याच्या रडण्याच्या शक्तीमुळं त्यात येवो, त्याच्या निरागसतेमुळं त्याच्यात येवो.

हे 'सामर्थ्य' जरी प्रत्येकाला हवीशी वाटणारी गोष्ट असली तरी ते मिळवण्याचे मार्ग मात्र प्रत्येकाचे सारखेच नाहीत. किंबहुना ते मिळवण्याविषयीच्या कल्पनाही सारख्या नाहीत. अनेकांना तर असं सामर्थ्य मिळवण्यासाठी त्यांना स्वत:ला काही करावं लागेल याचीही कल्पना नाही. ते नुसतंच मिळावं असं वाटणं किंवा ते इतरांनी आपल्याला मिळवून द्यावं असं वाटणं या दोन्ही फोल कल्पना असून त्यांचा फारसा विचार करायचं कारण नाही.

खरं पाहाता 'सामर्थ्य'ही साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणं 'साधनेनं आणि संयमानं' प्राप्त करून घ्यायची गोष्ट आहे.

तसं पाहिलं तर 'सामर्थ्य' हेही बऱ्याच प्रकारचं असू शकेल.

तरीही साने गुरुजींचं या बाबतीतलं म्हणणं किती मूलगामी आणि उपयोगी आहे, हे समजून घेण्यासाठी एका प्रकारचं सामर्थ्य आपण विचारात घेऊ या. नेहमीच्या आपल्या व्यवहारात आपल्याला पदोपदी परिचित असणारं शब्दांचं सामर्थ्य घ्या.

काहींच्या शब्दाला एक सामर्थ्य असतं. पूर्वीच्या काळी तर 'शब्दां'मागं इतकं सामर्थ्य मिळवलं गेलं की, अनेक भौगोलिक घटनासुद्धा इकडच्या तिकडं करण्याचं सामर्थ्य त्या शब्दांत निर्माण होई. अगदी आजचं जरी पाहिलं, तरी काही माणसांनी शब्द टाकला की, तो पडत नाही, तो मानला जातो, ऐकला जातो. त्यानुसार वागायला माणूस तयार होतो. हा अनुभव आपण नेहमी घेतो. मुलगा आपलं ऐकणार नाही, पण तो अमक्या तमक्याचं ऐकेल असं आपल्याला वाटतं. त्यानुसार ते घडतंही.

हे 'सामर्थ्य' त्यांच्या शब्दांत कुठून आलं ? शब्द म्हणून पाहिलं तर त्यातली अक्षरं, ती भाषा यात काही वेगळं नसतं, तीच अक्षरं आपणही उच्चारू शकतो. पण परिणाम तोच होत नाही. म्हणजेच त्या अक्षरामागं त्या त्या व्यक्तित्वाचं एक सामर्थ्य उभं असतं, ते तिथं उगीच येत नाही. साने गुरुजी म्हणतात की, ते त्या त्या व्यक्तीच्या संयमानं, त्यानं केलेल्या साधनेनं येत असतं.

दुसऱ्यानं आपला शब्द ऐकावा, पाळावा असं आपल्याला वाटतं, हे ठीक आहे. पण ते सहसा घडत नाही. उलट इतर लोक आपला शब्द पाळत नाहीत एवढी सार्वत्रिक तक्रार मात्र सहजपणे घडताना ऐकू येते. पण त्यासाठी आपला शब्द आपण पाळायची संयमाची साधना स्वतःला करावी लागते, हे आपल्या ध्यानी येत नाही. त्याशिवाय त्यांनी आपला शब्द पाळावा असं सामर्थ्य आपल्या शब्दाला कसं येईल ?

मला स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धीची आज्ञा पाळण्यासाठी स्वतः संयम दाखवावा लागतो. ही एक प्रकारे सामर्थ्याची साधना

असते. तीच माझ्या ठिकाणी सामर्थ्य निर्माण करते. यासाठी साने गुरुजींनी एक सूत्र सांगून ठेवलं आहे की,'आधी स्वतः स्वतःची आज्ञा पाळा आणि मग दुसऱ्याला हुकूम करा ! मलाच आधी माझा शिष्य होऊ दे, मग मला इतर शिष्य मिळतील.'

अशा तऱ्हेनं आत्मसंयमानं जगणाऱ्यांचीच खरी समाजालाही आज गरज आहे. संयमानं राहणं म्हणजे दुबळेपणा नव्हे, साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणं ती 'सामर्थ्याची साधना' आहे.

***

## ३४. साधेपणाची गरज

एखादी वस्तू बरेच दिवस घरात असली किंवा नेहमीचीच झाली की, अनेकदा तिचं महत्त्व कमी होतं, इतकंच नव्हे तिच्याकडं दुर्लक्षही होऊ लागतं. तसंच काहीसं जीवन सुंदर करणाऱ्या एका सद्‌गुणाचं झालं आहे.

याकडं लक्ष वेधताना पूज्य साने गुरुजींनी म्हटलं आहे की, हा जीवनविशेष म्हणजे 'साधेपणा'. जीवन सुंदर करणारी आणि आपल्याला फार पूर्वीपासून परिचित असलेली ही गोष्ट होय. किंबहुना, आपल्या भारतीयांच्या संस्कृतीत या 'साधेपणा'ला एक विशिष्ट असं मोठं स्थान आहे. कित्येक मोठमोठ्या व्यक्तींनी अगदी उपनिषत्कालापासून या सद्‌गुणाचा अंगीकार कटाक्षानं केलेलाही आपल्याला दिसून येतो.

अशी ही आपल्या घरात बरेच दिवस असणारी बहुमोल वस्तू आपल्याला नेहमीचीच होऊन आता हळूहळू जाणवेनाशी झाली आहे. तिच्यापासून होणारे फायदे आता इतके दृष्टिआड झाले आहेत की, मुद्दाम होऊन त्यांची उजळणी करण्याची पाळी आपल्यावर आली आहे.

दुसऱ्या बाजूला, या दुर्मिळ झालेल्या सद्‌गुणाकडं दुर्लक्ष घडत गेल्यानं आपण अशा एका ठिकाणी येऊन पोचलो आहोत की, साधेपणा हा आपल्याला मागासलेपणा, बावळटपणा वाटावा. त्यामुळंच आज अशी परिस्थिती दिसते की, अत्यंत साध्या वेशात, पोशाखात वावरणारा माणूस बहुधा अडाणी, अशिक्षित, गरीब, सामान्य कुवतीचा असावा अशी आपली प्रथमदर्शनी समजूत होते. त्याउलट देखण्या पोशाखातला किंवा कडक सुटाबुटात वावरणारा माणूस हा उच्चशिक्षित, हुशार, चाणाक्ष, सधन, सत्तावान असा असावा अशी आपली अगदी सहज समजूत होते, नाही का?

पण आपण थोडं खोलात पाहिलं, तर या साऱ्याचा एकमेकांशी अपरिहार्य असा संबंध थोडाच आहे ! अत्यंत उच्चशिक्षित माणसानं साधी विजारशर्ट किंवा साधा पँट, मॅनिला घालू नये असं थोडंच आहे? किंवा तसा वेष केल्यानं त्याच्या हुशारीतला काही भाग थोडाच कमीजास्त होतो ? पण आजची धारणाच अशी होऊन बसली आहे की, ही सारी उत्तम वेशभूषा केल्याशिवाय आपला तथाकथित मोठेपणा जणू सिद्धच होणार नाही. अतिशय विद्वान किंवा एखाद्या विषयातले जर आपण तज्ज्ञ म्हणून गणले जायचे असलो तर झकपक प्रभाव टाकणारा पोशाख करणं हे जणू आवश्यकच आहे.

वास्तविक, साने गुरुजी सुचवतात त्याप्रमाणं या भपक्याचा नि वास्तविक मोठेपणाचा तर काही संबंध नाहीच, उलट असल्या वरवरच्या भपक्याला भुलण्यानं वस्तुतः नुकसानच आहे. व्यक्तीपुरतं पाहिलं, तर त्याच्या गरजा विनाकारणच वाढून आर्थिकदृष्ट्या अनावश्यक खर्चवेच वाढतो. आपल्या मूळ कार्याकडं, ध्येयाकडं दुर्लक्ष केल्यानं स्वतःची, मूळ कार्याची हानी होते. समाजाच्या दृष्टीनंसुद्धा अशा फोल नि पोकळ गरजा वाढणं, एकामुळं दुसऱ्यानंही या वायफळ मोठेपणाच्या स्पर्धेत भाग घेऊन सामाजिक तणाव नि टंचाई निर्माण करणं, अनावश्यक खर्चाला बळी पडणं, त्यामुळं अखेर भोगलालसा नि सामाजिक दारिद्र्य तसंच गरीब श्रीमंतातली दरी वाढणं - असल्या अनिष्ट गोष्टींना सामोरं जावं लागतं.

याहीपलीकडं जाऊन साने गुरुजी सांगतात की, अनंत प्रकारच्या भोग्य वस्तूंच्या हव्यासापायी आपण आपलं स्वास्थ्य तर गमावून बसतोच पण प्रत्येकाला आपलं जीवन सार्थकाचं करण्यासाठी,तसंच समाजाचं, राष्ट्राचं जीवनही सार्थकाचं करण्यासाठी जे मूळ विधायक कार्य करण्याची गरज आहे, त्या कामाकडं त्याचं दुर्लक्ष होतं. ते काम तो मन ओतून, हृदय ओतून करू शकत नाही.

म्हणून हा साधेपणा केवळ पोशाखच नव्हे, तर नाना तऱ्हेच्या

दृश्यातल्या आणि बाह्य स्वरूपाच्या वस्तू गोळा करून होणाऱ्या आपल्याच नुकसानीवरचा एकमेव सोपा उपायच आहे. हा उपाय पूर्वीच्या काळी भारतीयांनी अंमलातही आणला आहे.

इतकंच काय, एकेकाळी या 'साधेपणा'ला समाजाकडून अत्यंत आदराचं नि प्रेमाचं स्थान दिलं जाई. साने गुरुजी म्हणत त्यानुसार हा 'सुंदर नि थोर साधेपणा' आपल्या जीवनात आपण आज आणू शकलो तर आपलं जीवन खचितच निरामय नि आनंदी होईल, यात शंकाच नाही.

***

## ३५. खरा वापर

आपल्याला कल्पना आहेच की,टेलिफोन प्रथम आले तेव्हा ती अपूर्वाई होती. प्रथम पोस्टातले पीसीओ, मोठमोठी ऑफिस - अशा ठिकाणीच ही सोय उपलब्ध होती. नंतर फोन हळूहळू घरोघरी आले. तरीही, त्या काळात त्यांची संख्याही कमी होती आणि परगावी फोन करण्याची त्या काळातली एसटीडीची सोयही घरी नव्हती. अशावेळी टेलिफोनच्या सार्वजनिक बूथवर जावं लागे. त्या काळातली गोष्ट आहे.

टेलिफोनच्या बूथवर रांगेत बरेच लोक उभे होते. एका कॉलेजकुमाराचा फोन चालला होता. तो बराच वेळ चालल्यानं माझा नंबर अगदी पाठोपाठ असूनही येत नव्हता. मागं रांग खोळंबली होती, वाढत चालली होती.

म्हणून मी सहज बूथवरच्या केबिनमध्ये डोकावून पाहिलं तर तो मुलगा नुसत्या माना हलवीत होता. माझी कल्पना अशी होती की, हा तर तरुण मुलगा आहे, वेळेचं भान राहिलं नसेल, मित्राबरोबर किंवा मैत्रिणीबरोबर मोठमोठ्यानं गप्पा चालल्या असतील - तर कुठलं काय ? अखेर त्यानं रिसीव्हर आदळला नि बाहेर पडताना पुटपुटला,'फोनच्या या भागाला रिसीव्हर का म्हणतात ते बाबांचा फोन आला म्हणजे कळतं ! पण त्यांच्या हातात जो हाच फोनचा भाग असतो त्यालाही 'रिसीव्हर'च का म्हणतात ते मात्र कळत नाही !' यावर त्याच्याबरोबर असलेला त्याचा मित्र हसला.

माझ्या लक्षात आलं. याच्या बाबांचा जेव्हा केव्हा याला फोन येत असेल किंवा तो करीत असेल त्या त्या वेळी याला सारा काळ नुसतं ऐकूनच घ्यावं लागत असणार. त्याचं म्हणणं, त्याच्या अडचणी, शंका काही म्हणून सांगायची संधी त्याला मिळत नसणार. अखेर साऱ्या सूचनांच्या भडिमाराला कंटाळून हा दर वेळी फोन

ठेवीत असणार.

ही परिस्थिती त्याच्या बाबांसारखी अनेकांची असते. अशी माणसं आपल्या घरी येवोत, आपल्याला वाटेत भेटोत, आपल्याला फोन करोत, कुठं लग्नकार्यात भेटोत - कुठंही भेटले की जी सुरुवात करतील ती निघेपर्यंत किंवा नाईलाजानं थांबावं लागेपर्यंत. बरं असं काही अलौकिक सांगण्यासारखं त्यांच्याकडं असतं का की, जे ऐकणाऱ्यानं अगदी जिवाचे कान करून ऐकत राहावं ? तर असंही नाही. ते नेहमीचंच असतं.

साधारणपणे अशा माणसांना जगाचा बराच अनुभव असतो, त्यांनी खूप पावसाळे पाहिलेले असतात, जगातल्या बऱ्याचशा किंबहुना सगळ्या क्षेत्रांतली माहिती असते किंवा सगळ्या क्षेत्रांतलं मर्म त्यांच्या लक्षात आलेलं असतं, अशी अर्थात त्यांची समजूत असते. शिवाय ते सोडून जी इतर माणसं जगामध्ये असतात ती तद्दन सारी अपरिपक्व, अननुभवी, जगाची माहिती आणि भान नसलेली अशी असतात. साहजिकच, त्यांच्या कल्याणाची चिंता यांना लागलेली असते. किंबहुना, यांची ती स्वतः घेतलेलीच जबाबदारी असते.

त्यामुळं मनुष्य ऐकायला सापडला, मग भले प्रत्यक्ष असो किंवा फोनवर असो ते आपलं ऐकवण्याची संधी एक मिनिटसुद्धा वाया दवडीत नाहीत. स्वतःच्या फोनला फक्त बोलण्याची एकच बाजू असते आणि ऐकणाऱ्याच्या फोनला फक्त ऐकू येण्याची एकच बाजू असते अशी यांची समजूत असते. त्यामुळं आपल्या फोनलाही ऐकण्याची आणि दुसऱ्याच्या फोनला बोलण्याची बाजूही असते ही वस्तुस्थिती त्यांच्याकडून विसरली जाते आणि फोनचा खरा वापर होत नाही.

हा प्रश्न 'फोनचा खरा वापर' करण्याचा नाही तर माणसाला निसर्गानं उपलब्ध करून दिलेल्या शक्तींचा खरा समतोल नि

विधायक्वापर करण्याचा आहे. बोलणाऱ्या तोंडाबरोबरच ऐकू शकणारे कान ही निसर्गाची मोठी कल्पक देणगी आहे. आपली सारी प्रगती, ज्ञान, विचार या ऐकणाऱ्या कानांवर फार अवलंबून आहेत. तोंडाच्या बाबतीत तर ते नुसतं ऐकवण्याचंच काम करू शकतं असं नसून आपलं अज्ञान, आपल्या शंका, आपला मतभेद हेही व्यक्त करण्याचं तेच साधन आहे हे लक्षात येतं.

उलट जितका माणूस आतून तयार होईल, मुरेल तितकी त्याची सांगण्याची उर्मी कमी होईल. तो लोकांना जरूर तर बोलेल, सांगेल किंवा अगदीच कळवळ्यानं राहावत नाही म्हणून सांगेल. त्यामुळं खऱ्या प्रगतीसाठी दोन्हीचाही वापर त्याला प्रमाणात, समतोलपणे करणं गरजेचं ठरेल. हा काळ मागं पडला. फोनची जागा प्रत्येकाच्या हातातल्या मोबाईलनी घेतली. त्यामुळं असे प्रसंग बूथवर येणार नाहीत, पण माध्यमाच्या खऱ्या वापराचा प्रश्न मात्र तसाच राहील आणि त्यावरचा असा विचार करण्याची गरजही तशीच राहील!

त्यामुळं 'फोनच्या' खऱ्या वापराची जाणीव आपल्याला आपल्या कर्मेंद्रियांच्या, ज्ञानेंद्रियांच्या 'खऱ्या वापरा'कडं घेऊन जाईल आणि अंतिमतः ते आपल्या हिताचंच ठरेल !

***

## ३६. विधायक नकार

आयुष्यात होय किंवा नाही या दोन शब्दांची गाठ न पडलेला माणूस विरळाच. त्याचबरोबर होय आणि नाही हे कधी न म्हणावा लागलेला माणूसही विरळाच म्हणावा लागेल. वेगवेगळ्या प्रसंगात, वेगवेगळ्या कारणानं माणूस होकार-नकार देत असतोच.

तसा दोन्ही शब्दांत 'शब्द' म्हणून फारसा फरक नसला, तरी अर्थात आणि परिणामात जबर फरक आहे. त्यातही त्यातल्या त्यात होकार आणि त्यावरून मग पुढं होकारात्मक विचार-परिस्थिती असे अनेक प्रकारही निर्माण होतात. जसे नकारात्मक विचार, नकारात्मक दिशा, नकारात्मक प्रतिक्रिया असे प्रकारही निर्माण होतात. त्यातही साधारणपणे होकारात्मक विचारसरणीला प्राधान्य मिळतं, होकारात्मक प्रतिक्रिया किंवा दिशा या स्वाभाविकच विधायक म्हणून ओळखल्या जातात. वरवर पाहाता ते बरोबरही आहे.

कोणतीही गोष्ट किंवा नवा विचार, नवा पर्याय समोर आला की त्यामुळं आता कोणतीही बसलेली घडी कशी विस्कटणार, गोंधळ कसा वाढणार, नवनव्या अडचणी कशा निर्माण होणार असा नकारात्मक विचार करणारा आणि मांडणारा माणूस हा तरी स्वागतार्ह कसा वाटेल आणि तो प्रगतीशील तरी कसा म्हणता येईल ? त्यामुळं नकार ही साधारणपणे त्याज्य गोष्ट मानली जाते हेही पटू शकतं.

पण याला आणखी एक बाजू आहे, असंही कधीकधी लक्षात येतं. एखाद्या शाळकरी मुलाला आईस्क्रीमसारखी वस्तू आवडते. तशीच ती आमच्या शेजाऱ्यांच्या मुलालाही स्वाभाविकपणे आवडत होती. सर्वांनाच आईस्क्रीम सांगितलं म्हणून ते त्यालाही सांगितलं, दिलं. पण त्यानं 'नको' म्हटलं.

यावेळी मला प्रथम वाटलं की, त्याला त्या प्रकारचं आईस्क्रीम आवडत नसावं. सहज बाजूला घेऊन विचारलं, 'तुला

दुसऱ्या कुठल्या प्रकारचं हवं होतं का ? हे आवडत नाही का ?' त्यावर तो सहज म्हणाला,'नाही, नाही, तसं नाही, मला तर हे खूपच आवडतं !' मग मी विचारलं,'अरे मग तू नाही का म्हणालास ?'

त्यावर तो क्षणभर थांबून उद्‌गारला,'खरं सांगू का काका, माझी संगीताची एक अगदी महत्त्वाची आणि करियरच्या दृष्टीनं निर्णायक मैफल जवळ आली आहे. त्या दृष्टीनं आवाजाची काळजी घ्यायला गुरुजींनी सांगितलं आहे. त्यात आईस्क्रीमचं पथ्य आहेच. आमच्या आवडीची वस्तू म्हणून त्यावर चर्चाही झाली. तेव्हा गुरुजी म्हणाले, तुम्हाला एखादी उच्चतर गोष्ट मिळवायची असेल तर त्यात आड येणाऱ्या गोष्टींना 'नाही' म्हणायची ताकत तुमच्यात आली पाहिजे. मला ते पटलं म्हणून ही ताकत अजमावण्यासाठी आणि वाढवण्यासाठी मी 'नाही' म्हटलं !'

मला वाटलं की शास्त्रात असो, अध्यात्मात असो, कलासाधनेत असो, अत्युच्च शिखरावर पोचणाऱ्यांच्या जीवनातलं एक महत्त्वाचं सूत्रच हा सांगतो आहे. अशा अनेक मोहांना, क्षुद्र आनंदांना कितीतरी प्रसंगात या व्यक्तींनी 'नकार' दिलेला आहे. त्यांच्याजवळ 'नाही'ची मोठी ताकत आहे. ज्या ताकतीच्या जोरावर ते वाटेतले अडथळे आणि भूलभुलय्ये पार करून यशाच्या शिखरावर पोचलेले आहेत. ते आज समाजाला दीपस्तंभासारखे ठरलेले आहेत.

असे यात्रिक वाटेतल्या साध्यासाध्या देहसुखाला 'नाही' म्हणतील, विचलित करणाऱ्या प्रलोभनांना 'नाही' म्हणतील, आडमार्गाला नेऊ पाहाणाऱ्या व्यक्तींना 'नाही' म्हणतील. पण त्यांचा नकार हा मोठा ताकतवान आणि विधायक नकार म्हणावा लागेल, नाही का ?

आज समाजाच्या स्वास्थ्याला धोक्याच्या ठरणाऱ्या पण वरवर पाहता व्यक्तीला फायद्याच्या, सुखाच्या वाटणाऱ्या अनेक गोष्टींना शुद्ध विधायक 'नकार' देणाऱ्या कणखर माणसांचीच गरज आहे, हे

पटतं आणि असे वाईट गोष्टींना विधायक नकार देऊ शकणाऱ्यांचीच मोठी उणीवही भासते.

म्हणून नेहमीच्या 'नकोशा' वाटणाऱ्या 'नकारा'लाही एक 'हवीशी' बाजू आहे आणि ताकतवान 'विधायक नकार' ही लक्ष देण्याजोगी गोष्ट आहे, हे खचितच !

***

## ३७. अडचणीचे देव

वामनराव आपले जुने मित्र. सर्वेश त्यांचा मुलगा. अनेक वर्षांचा संबंध असल्यानं वामनराव थोडे अकालीच जाऊनसुद्धा माझा सर्वेशशी संबंध टिकून होता. तोही कधी काळी काही सल्ला, माहिती लागली तर आवर्जून येई. सर्वेश तसा सरळमार्गी, सज्जन व वयाच्या मानानं समजूतदार मुलगा होता. आता तो मोठ्या नोकरीत होता. लग्न होऊन एक अपत्यही पदरात होतं.

त्या दिवशी काही कामानिमित्त घरी गेलो होतो. वेळ तशी सकाळची धावपळीची, ऑफिसला जाण्याचीच होती. त्या वेळच्या धावपळीची मला तशी अपेक्षा होतीच. माझंही काम वामनरावांच्या फंड वगैरे संदर्भातलं होतं. थोडंसंच होतं, पण लवकर झालं तर ते सर्वेश वगैरेंनाच उपयोगी पडलं असतं. म्हणून मी सकाळीच चक्कर टाकली होती.

पण वामनरावांच्या घरातली सकाळची धावपळ नुसतीच धावपळ वाटत नव्हती. तिला धुसफुशीचं स्वरूप होतं. सर्वेशही तसा समजूतदार असल्यानं उगाच असं काही होणार नाही, या खात्रीनं मी शांत राहून काय घडलं ते समजून घेण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं होतं. माझ्या लक्षात आलं, प्रश्न देवांच्या पूजेचा होता.

ऑफिसमध्ये इन्स्पेक्शन आल्यानं सर्वेशला लवकर जायचं होतं. सकाळचा त्याचा वेळ इतर अचानक निघालेली आवश्यक कामं करण्यात गेला होता. म्हणून त्याची अपेक्षा हे काम आईनं किंवा पत्नीनं करावं अशी होती. अपेक्षा फारशी चुकीची नव्हती, पण त्या दोघींनाही त्या कामात अजिबात रस नव्हता. मुळात त्यांना या विषयाची आस्थाच नव्हती. सर्वेश जरा चिडीतच होता.

त्यानं बाहेर येऊन माझ्या त्या कागदपत्रांवर सह्या करता करता म्हटलं,'काका, खरं सांगू का, हा फार मोठा प्रश्न नाही. पण

आज जरा सरकल्यासारखं झालंय खरं. पण तुम्ही घरातलेच आहात. तुम्ही जरा आत येता का?' मी त्याच्याबरोबर स्वयंपाकघरात गेलो.

त्यानं देवघराच्या कपाटाचं दार उघडलं आणि म्हणाला,'काका, मला देवांची आवड आहे. पूजेचं महत्त्व, पूजेची आवडसुद्धा आहे. पण तुम्हीच बघा, हे पाच बाळकृष्ण, या सात देवी, हे सात-आठटाक, वेगवेगळ्या क्षेत्रांत गेल्यावर आमच्या पणजोबा, खापरपणजोबांपासून प्रत्येकानं आठवण म्हणून आणलेले शाळीग्राम, गोटे, गंगाजलाचे गडू, एक ना दोन, प्रत्येक पिढीतल्या लग्नाबरोबर आलेले बाळकृष्ण नि अन्नपूर्णा तरी डुप्लिकेट, ट्रिप्लिकेट झाल्या आहेत. ती सारी संख्या पाहिली की, मुळातच नाउमेद व्हायला होतं. प्रत्येक पिढीबरोबर यात आणखीनच भर पडत चालली आहे.

बरं काही देव कमी करायला जावं तर सर्वांचा विरोध. मानसिक भीती, काही आजारपणं, अपघात असलं काही मागं लागलं तर पुन्हा गंगेतून हे देव परत कुठून आणायचे ? तुम्हीच आता सांगा हे सयुक्तिक आहे का ? की यावर ज्येष्ठ मंडळी काही मार्ग काढणार आहेत ? '

मी त्याच्याशी पूर्ण सहमत होतो. वस्तुस्थिती समोरच होती. मला वाटलं यात खरंच काहीतरी करण्याची गरज आहे. मी त्याला आश्वासन दिलं की, यावर आपण विचारानं, विवेकानं आणि श्रद्धा कायम राखूनसुद्धा काही मार्ग जरूर काढू या. मी अनेक विचारी माणसांचं मत घेतलं. हा प्रश्न अनेकांना असल्याचं माझ्या लक्षात आलं. त्या पोटी अनेक घरी देवांबद्दल अप्रीती, अनेक ठिकाणी पूजा हे संकट तर अनेक ठिकाणी पूजेच्या नावावर कुठं निरांजनच लाव, कुठं नुसती फुलंच बदल असले मार्गही नाईलाजानं अवलंबले गेलेले दिसले.

मला वाटतं, हा अनेकांचा प्रश्न आहे. देव हा जगाचा चालक

म्हणून, कर्ता म्हणून, आधार म्हणून, नीतीधर्माचा कणा म्हणून, श्रद्धेचा भाग म्हणून जरूर असेल आणि त्यासाठी घरात प्रतीक म्हणून त्याची प्रतिमा ठेवणंही आपल्याला आवश्यक वाटत असेल. पण ज्या वेळेला त्याच्या प्रतिमांची अवस्था अशा स्थितीला येते तेव्हा देव हा भीतीचा नि अडचणीचा विषय बनतो. आपल्याला काय करता येण्यासारखं आहे ? एक मार्ग नक्कीच आहे.

आपण स्थापलेले देव आपण विसर्जन करावे. अर्थात मृत्यूची वेळ काही सर्वांना आधी कळत नाही. अशा वेळी ही जबाबदारी मागं राहणाऱ्या जोडीदाराची आहे. दोघं एकदम गेल्यास पूर्ण समजुतीनं त्या दोघांचीही इच्छा म्हणून मुलांची आहे. मुलगा आस्तिक असेल तर तो पुन्हा प्रतिमा ठेवील व त्याही संख्येनं मर्यादित ठेवील, पण स्वत:बरोबर प्रतिमांच्या विसर्जनाचीही तरतूद करील. त्याच्यामागं ही पूजा सक्तीची राहणार नाही. झालीच तर पूजा आनंदानं होईल, कृतज्ञतेनं होईल आणि मला वाटतं हे देवालाही आवडेल.

फक्त सारं अंमलात आणायला आता समजूतदार भक्तीची गरज आहे, आपण तसे खचितच होऊ शकू !

***

## ३८. खारीचा वाटा

एक थाटामाटाचं लग्न झालं. दोन्ही पार्ट्या बड्या, हौशी. लग्नानंतर पंगतीवर पंगती उठत होत्या. गप्पा, गाठीभेटी, चेष्टा, हास्य - सारं काही आनंदानं सुरू होतं. हॉलच्या एका कोपऱ्यात बरोबरच्या बरेच दिवसांनी भेटलेल्या इष्टमित्रांबरोबर मीही गप्पा मारीत बसलो होतो. डोळ्यांदेखत लोक जेवून उठत होते. पुढची पंगत घेतली जात होती.

एक पंगत संपली की कार्यालयाचे कामगार येऊन टेबलावरची रिकामी ताटं गोळा करून बादल्यांतून भरून घेऊन जात होते. कित्येक पानांत टाकलेले मसाले भात, पुऱ्या, कोशिंबिरी, भाज्या, अर्धवट टाकलेल्या श्रीखंडाच्या वाट्या - अशांतलं अन्न ते एका मोठ्या स्टीलच्या बादलीत एकत्र ओतत होते. मग ताटं, वाट्या वेगवेगळ्या बादल्यांत टाकल्या जात होत्या. पानांतून टाकलेल्या अन्नाची बादली पाहून मला कसंतरीच होत होतं - पोटातही आणि डोक्यातही.

ते अन्न इतक्या चांगल्या दर्जाचं, इतक्या प्रकारचं होतं, पण ते एका बादलीत काढल्यामुळं ते सारं एकत्र होत होतं नि बादली भरली की, कार्यालयासमोर रस्त्यावरच्या कचराकुंडीत एक कामगार ते टाकून येत होता. बादली ओतून रिकामी व्हायच्या आतच कुत्री आणि इतर प्राणी त्यावर तुटून पडत होते. कित्येकदा ते त्या कामगाराला कुंडीपर्यंत पोचूही देत नसत.

माझ्या बाजूच्यांचं तिकडं लक्ष वेधलं. ते माझ्याकडं बघून जरा ओशाळले. त्यांनीही पानात टाकलं असावं. ते आपण होऊनच म्हणाले, यांच्याकडं आग्रहच एवढा होता की, जवळपास प्रत्येकाच्या पानात टाकलं गेलं. बरं नको म्हणावं तर ते इतक्या अगत्यानं,

प्रेमानं वाढत होते, ते तर अगत्याबद्दल प्रसिद्धच आहेत.

मी म्हटलं, खरं आहे ! फक्त मी कार्यालयाच्या बाहेरच्या भिंतीजवळ, टळटळीत उन्हात फाटके कपडे सावरीत, बादली बाहेर आली की कुंडीकडं पळणाऱ्या भिकाऱ्यांकडं बोट केलं. अन्न एकत्र झाल्यामुळं एखादा पुरीसारखा पदार्थच ते कुत्र्यांना बाजूला करून उचलून आणीत होते. बाकीच्या काल्यातून त्यांना खाण्यासारखं उचलता येत नव्हतं. टाकलेले चांगले पदार्थ त्यांच्यासाठी कुणी वेगळे फेकणार नव्हतं. आम्ही एकमेकांकडं पाहिलं.

यात यजमानांचं बोलवण्यातलं, वाढण्यातलं अगत्य आम्ही सर्वच समजू शकत होतो. आलेल्यानं भरपूर जेवावं, ती माणसं तृप्त व्हावीत, हेही समजू शकत होतं. समजू शकत नव्हता, तो पानात प्रमाणाबाहेर अन्न घालण्याचा आग्रह आणि त्यामुळं अन्न टाकण्याचा प्रकार ! तो नको म्हणत असताना, त्याचं शरीर नको म्हणत असताना जबरदस्तीनं वाढलेलं अन्न नाईलाजानं पानात टाकून ती माणसं उठली होती. हे असं प्रत्येक पंगतीत अनेकांचं झालं तर किती अन्न वाया गेलं असेल याची कल्पना मात्र येऊ शकत होती.

तो मुहूर्ताचा दिवस होता. शहर मोठं होतं. शहरात किमान वीस तरी हॉलवर जेवणं सुरू असतील. सगळीकडं अशीच प्रवृत्ती राहिली तर होणारं चित्रही समजू शकत होतं. यावर आमची चर्चाही झाली. अन्न वाया जाऊ नये म्हणून स्वयंसेवेचा - बुफेचा प्रयोग योग्य आहे असाही मुद्दा निघाला. पण त्यात जर आमंत्रितांकडं लक्ष देण्याइतका वेळ यजमानांना नसला किंवा तशी जाणीव नसली तर 'तुमचं तुम्हाला हवं तर हवं तेवढं जेवा नाहीतर जावा' इतका कोरडेपणा किंवा तुटकपणा त्या स्वयंसेवेच्या प्रयोगात येऊ शकतो, हाही अनुभव होता.

त्यापेक्षा पंगत मध्यममार्ग होता. चर्चेत हाही मुद्दा निघाला होता की, आग्रह केला नाही तर माणसं कमी जेवतात, अनेकदा

आपलं त्यांच्याबद्दलचं अगत्य-प्रेम त्यांना खरं वाटत नाही. पण हे म्हणण्यातली अपरिपक्वता स्पष्ट होती. कारण याच पंगतीत मीही काही न टाकता जेवलो होतो. अशी काही बाकीची माणसंही होती. त्यांनी कुणी अन्न टाकलंही नव्हतं आणि आग्रहाची, आपुलकीची गरजेशी गल्लतही केली नव्हती.

त्यापेक्षा मग बाहेर अन्नाची वाट पाहाणाऱ्या सर्वांची भूकच खरी होती. आतल्या माणसांनी गरजेची इतर कशाशीही गल्लत न करता जेवल्यानं कितीतरी लोकांची खरी भूक एक वेळ - एक दिवस तरी नक्की भागली असती. प्रश्न गरजेपुरतं वाढण्याचा - घेऊ देण्याचा होता. तो मानसिक होता.

हे काही केवळ अशा कार्यप्रस्थांत होतं असंही नाही. घरोघरी अनेक माणसं पानात न आवडणारे पदार्थ, चांगले न झालेले पदार्थ, जादा झालेले पदार्थ अनेकदा ताटात तसेच टाकून उठलेले आपण पाहिले असतील. तापवण्याची किंवा टिकवण्याची नीट प्रक्रिया न केल्यानं कितीतरी अन्न घरोघरी वाया गेलेलं आपण पाहिलं असेल. अनेक ठिकाणचे नीट बंद न केल्यानं किंवा दुरुस्तीची काळजी न घेतल्यानं गळत असणारे नळ आणि वाहून जाणाऱ्या टाक्या आपल्याला आठवतील. तेव्हाहा प्रश्न नुसता आग्रह अन् आपुलकीचा नसून साधारण बेसावधतेचा आहे, हे लक्षात येतं.

मला मनाशी श्री गजानन महाराजांची आठवण झाली. प्रगट झाल्यावर त्यांना प्रथम पाहिलं गेलं तेच अशा फेकलेल्या पत्रावळीवरचं टाकलेलं अन्न वेचून खाताना. नंतर त्यांनी शेजारच्याडबक्यातलं पाणीही प्यालं. दोन्हीही कृती प्रत्यक्ष करून माणसाच्या प्राथमिक गरजांच्या बाबतीतली त्याची उधळमाधळ त्यांनी दाखवून दिली, त्याच्या उपायांकडंही लक्ष वेधलं.

या सामान्य दिसणाऱ्या पणसूचक कृती करणाऱ्या सत्पुरुषानं भल्याभल्यांना जगण्याबद्दल सावधान केलं, विधायक दिशा दाखवली.

यालाही आज शंभर वर्षांहून अधिक काळ लोटला, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

वास्तविक अन्न आणि पाणी अशा माणसाच्या गरजेच्या मूलभूत गोष्टींची उधळमाधळ करण्याचा माणसाला कुठला अधिकार नाही. पण इतर बाबतीत चाणाक्ष असलेला माणूस याकडं सहसा फार सावधपणे पाहात नाही. पाहिलं तर लक्षात येईल की, माणूस अन्न पिकवीत असला तरी निर्माण करू शकत नाही. पृथ्वीची आणि पाण्यासारख्या अनेक महाभूतांची ती कृपा आहे. अमुक एवढं पेरलं म्हणजे अमुक एवढं उगवेल असं सांगता येत नाही. इतकंच काय नक्की उगवेलच असंही सांगता येत नाही.

तीच अवस्था पाण्याची, विशेषत: पिण्याच्या पाण्याची आहे. ती त्या आभाळाची असीम कृपा आहे. अन्न आणि पाणी या जर माणसाच्या एवढ्या प्राथमिक गरजा निसर्ग म्हणा, परमेश्वर म्हणा पुऱ्या करतो आहे, शिवाय त्यांची उपलब्धता मर्यादित आहे तर त्या जपून वापरणं, आपल्या परस्परांबद्दलचं अगत्य, प्रेम, आतिथ्य, स्वीकार या भावनांचा आदर राखूनही हा वापर योग्य ठेवणं हे माणसाचं आद्य कर्तव्य नव्हे का ? हा वापर करतानाही भगवंताच्या मूळ कृपेची जाणीव राखणं, त्यापोटी जरुरीपुरत्या वापरानं विशेषत: अशी नासाडी कटाक्षानं टाळून या बाबतीतल्या माणसाच्या जबाबदारीचा आपला वाटा कृतिशीलपणे उचलणं आवश्यक वाटतं.

आज अन्नपाण्याचे स्रोत आटत चालल्यावर आपण उपायांची धावाधाव सुरू केली आहे. इतकंच काय पुढची महायुद्ध तर पाण्यावरून होतील म्हणतो आहोत तर निदान याची जाणीव अनावश्यक आग्रह टाळून, अन्न टाकून देणं टाळून आपण आपला खारीचा वाटा उचलून दाखवू का ? भिडस्त माणसाची काळजी जरूर घेऊ, पण निदान अगत्य आणि प्रेम आग्रहावर अवलंबून नाही हे जाणून जेवणाऱ्यांनी आग्रहाच्या अपेक्षा ठेवल्या नाहीत आणि

वाढणाऱ्यांनीही गरज पाहून वाढलं तरी खूप होईल. खरी आपुलकी असल्या आग्रहावर अवलंबून नाही, तो पोकळ मोठेपणा आहे, एवढं ओळखलं तरी काम होईल.

मग खऱ्या गरजूंना मिळणारा अन्नपाण्याचा वाटा आपोआपच वाढेल, त्यावरून होणारे संघर्ष टळतील, टंचाईची तीव्रता कमी होईल. फक्त घरोघरी प्रत्येकानं त्यासाठीचा आपला खारीचा वाटा उचलण्याची गरज आहे !

***

## ३९. देणारे भक्त

मंदिर मोठं भव्य होतं. दुपारची आरतीची वेळ होती. मंदिरात आणि बाहेर खूप गर्दी होती. उभं राहायलासुद्धा जागा नव्हती. सारे जण भक्तिभावानं, देवदर्शनाच्या अपेक्षेनं, दाटीवाटीनं उभे होते. नंतर साग्रसंगीत आरती. मग दर्शनाची गर्दी. प्रत्येकाला देवासमोर यायची गडबड. देवासमोर यायला मिळताच नमस्कार आणि मनातल्या मनात एक किंवा अनेक प्रार्थना - मागण्या. त्यानंतर पुन्हा प्रसाद-महाप्रसादाची मागणी !

हे चित्र एखाद्याच देवासमोर असतं असं नाही, हजारो मंदिरं, हजारो समाध्या, हजारो क्षेत्रं इतकंच काय कुणी सत्पुरुष प्रत्यक्ष असतील तर त्यांच्यापुढंही आजसुद्धा असंच चित्र आपल्याला हजारो ठिकाणी दिसेल. देवाचं, समाधीचं, सत्पुरुषाचं दर्शन 'हवं' इथंपर्यंत आपण समजू शकतोच, पण पुढं अजून बरंच काही 'हवंच' असतं !

मग कुणाला नोकरीचाकरी, स्थैर्य, बढती, नोकरीतल्या जाचापासून सुटका, स्वत:ची बदली, बॉसची बदली, दुकानाला जागा, ती असलेल्याला शेजारचा गाळा, कुणाला मुलंबाळं, कुणाला आजारापासून सुटका, कुणाला कोर्टकचेरीत आपल्या बाजूनं निकाल, कुणाला आवडलेल्या मुलाकडून-मुलीकडून होकार, परदेशी जायची संधी, निवडणुकीत यश, मंत्रिमंडळात वर्णी, कुणाला विहिरीला पाणी - अक्षरश: असंख्य गोष्टी ! अगणित भक्तांना देवाकडून असंख्य गोष्टी 'हव्या' असतात.

तसं हे आपण समजूही शकतो. कारण तशी माणसाची ताकत कमी पडते, तो अपूर्णच आहे. त्याला व्यक्तिश:, कौटुंबिकदृष्ट्या अनेक गरजा असतात. तो कष्ट करीत नाही, असं नाही. इतरही चांगले मार्ग तो अवलंबतो. म्हणजे एखादी गोष्ट हवी असली तर स्वत:च्या प्रयत्नांच्या बरोबरच तो इतरांचं मार्गदर्शन घेतो, योग्य त्या

ठिकाणी त्यांची मदत घेतो, आधीपासून अनेक गोष्टींची तो तयारी करतो, आखणी करतो,संभाव्य धोके-चुका यांच्यापासून वाचण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतो - अशा अनेक मार्गांनी त्याचे प्रयत्न सुरू असतातच. तरीही कामं होत नाहीत, पुरी होत नाहीत, यशस्वी होत नाहीत, अडचणी उभ्या राहातात.

अनेकदा आपली ध्येयं आपल्या एकट्याच्या ताकतीवर गाठणं अशक्य वाटायला लागतं. अशा वेळी सर्वशक्तिमान अशा मानल्या गेलेल्या देवाकडं तो धाव घेतो, त्याच्याकडून या आणि अशा अनेक गोष्टींची याचना तो करतो हे एकप्रकारे समजून घेता येतं. त्यात फार चुकतं आहे असंही वाटायचं कारण नाही.

मग यात विचार करण्यासारखं काय आहे ? तर ते असं की, आपण इतक्या गोष्टी देवाकडं या ना त्या रूपात, या ना त्यावेळी आयुष्यभर मागत असतो, त्या तो देतही असतो, पण आपल्या मनात असा कधी विचार येतो का, की हा सारा एकतर्फीच मामला नाही का ? आपल्या देवाकडून शेकडो अपेक्षा असतात, तशी देवाला आपल्याकडून काही अपेक्षा असेल का? आपण त्याच्याकडं इतकं सारं मागतो, तो आपल्याकडून काही मागत असेल का ?

आता हे मान्य आहे की, 'देव' हा मुळातच आपण सर्वशक्तिमान, सत्ताधीश, परिपूर्ण मानला आहे, तर त्याला काय कमी पडणार, त्याला कशाची अपेक्षा असणार ? त्याच्याकडं काही नाही म्हणून तो ते आपल्याकडं मागेल ही शक्यताच नाही. या अर्थानं त्याची काही अपेक्षा नसेल, हे बरोबर आहे खरं !

पण याचा अर्थ 'देवा'ला काहीच नको असेल असं मानणंही चुकीचं ठरेल. आपलं मागणं हे स्वत:ला कमी पडतं म्हणून आहे, एवढ्यावरच आपण त्याला काही नको असेल असं ठरवतो आहोत, पण त्याला स्वत:साठी काही नकोच असेल, पण दुसऱ्यासाठी, इतर कुणासाठी किंबहुना या भक्ताच्या कल्याणासाठीच काही हवं असेल

तर ?

संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींनी जसं स्वत:ला काही मागितलं नाही, पण इतरांचं कल्याण मागितलं, दुष्टांचा दुष्टपणा जाऊ दे म्हटलं, लोकांना सदैव सत्संगती मिळो असं मागितलं ! तसं देवाचं आपल्याकडं मागणं असेल की, आपण सद्‌गुणांची उपासना करावी, शेजाऱ्यावर प्रेम करावं, सर्वांभूती भगवद्‌भाव पाहावा, निरपेक्षपणे आपलंआपलं कर्तव्य करावं - असं काही त्याला आपल्याकडं मागायचं असलं तर ?

हे मात्र शक्य आहे. यात देवाला स्वत:ला काही नको असलं तरी त्याच्या 'देवकार्या'साठी ते हवं असू शकतं. असे अनेक सत्पुरुष आहेत की जे अगदी निरिच्छ आहेत. त्यांना त्यांच्या शिष्यांकडून, भक्तांकडून पैसुद्धा नको आहे, पण त्यानं सन्मार्गात राहावं, सद्‌बुद्धी टिकवावी, विवेकानं वागावं हे त्यांचं मागणं आहे ! जे अंतिमत: भक्ताच्याच कल्याणाचं आहे. असं बरंच काही देवही मागत असेल, पण त्याला ते विचारणारा आणि देणारा भक्तच कदाचित दुर्मीळ झाला आहे, हे आपण समजून घेण्याची गरज आहे.

***

## ४०. दुसऱ्यांचा प्रपंच

प्रापंचिक माणूस तसा सगळीकडून व्यापलेला असतो. आज नुसती चांगल्या तऱ्हेनं जगण्यासाठी करावी लागणारी धडपड एवढी मोठी आहे की, इतर काही जादा काम करायला त्याला इच्छा असली तरी सवड मिळणं कठीण आहे.

एका बाजूनं नोकरीधंद्यात सततची अस्थिरता, अपुरी उत्पन्नं, ना गिऱ्हाईकाची खात्री, ना कामगारांची खात्री, त्यात कायदेकानूंची बंधनं हे सगळं साधून मिळकत टिकवायची कसरत करावी लागते, तर दुसऱ्या बाजूला वाढणाऱ्या गरजा आणि सततच्या भाववाढी, त्यातून कुटुंबातल्या सगळ्यांच्याच वाढत्या अपेक्षा त्यामुळं कितीही मिळवून पुन्हा नेहमीच्या खर्चाचीच मिळवणी करणं कठीण जातं आहे. त्यामुळं स्वतःचा प्रपंच सोडून दुसऱ्या कशात लक्ष घालायला वेळ मिळणं तसं अशक्य वाटतं. हे सारं प्रथमदर्शनी खरं वाटतं, पण काही वेळा अनुभव मात्र थोडा वेगळा येतो.

आमच्या जुन्या ऑफिसमधले एक सहकारी खूप दिवसांनी घरी आले होते. ते आल्यावर बोलता बोलता म्हणाले की, त्यांना काल रात्री जरा जागरण झालं. त्यांची पत्नी खूप उशिरापर्यंत बोलत बसली. मला वाटलं घरात काही घटना घडली असेल, मुलाबाळांचा काही विषय असेल, म्हणून विचारणार एवढ्यात ते होऊनच म्हणाले की, विषयानं विषय वाढला.

वास्तविक त्यांच्या घरात काहीच झालं नव्हतं. शेजारच्या काकूंची मुलगी माहेरी आली होती. ती बरेच दिवस माहेरीच होती, हे अर्थातच त्यांच्या पत्नीच्या काही दिवसांनी लक्षात आलं. मग त्यांनी आधी आजूबाजूनं चौकशी केली. मग तिला सासरी सांभाळीत नसावेत असं कळलं. म्हणून दुपारी काही काम काढून त्या शेजारीपाजारी जाऊन आल्या. त्यातून खूपच माहिती कळली. त्यानं

त्यांनाच अस्वस्थता आली.

संध्याकाळी जेवणं वगैरे झाल्यावर त्यांनी यांच्याकडे विषय काढला. त्यावर मग बराच ऊहापोह झाला. खुद्द मुलीकडून काय चुकलं, आईवडिलांची काय चूक होती, तिच्या नवऱ्याच्या ठिकाणी निर्णयशक्ती कशी नव्हती, सासू कशी बनेलपणा करणारी आहे, नणंदा कशा जहांबाज आहेत, त्यांनी कुठंकुठं कायकाय भूमिका बजावली, सासरे कसे गरीब आहेत - एक ना दोन.

दोघा पतीपत्नींना साऱ्या चर्चेत रात्री एक कसा वाजला हे कळलंच नाही. शेवटी चर्चा करून करून कंटाळून हे झोपी गेले. नंतर ते म्हणाले की, सकाळी उठल्यावर आम्हाला आठवण झाली की रोज रात्रीचं आपलं नित्याचं पठण आणि प्रवचनाचं वाचन कधी विसरलं, ते लक्षातच आलं नाही.

त्यावरून अशा अनेक प्रसंगांची मलाही आठवण झाली. याच घटनेतले शेजारी राहिले एका बाजूला, त्यांची मुलगी, त्या बिचारीचं दुःख दुसऱ्या बाजूला, सासर - ती माणसं - त्यांचं चूकबरोबर तिसऱ्या बाजूला - इतकं करूनही सहानुभूती म्हणून इतकी चर्चा करून हे काही करणार होते का तर काहीच नाही, कारण त्यांच्याच बोलण्यात पुढं आलं की, त्यांचं-यांचं गेली कित्येक वर्षं पटत नाही - जाणंयेणं नाही. मग त्यांचा हा सारा प्रपंच यांनी का केला ?

हे इथंच घडतं असं नाही. अनेक क्षेत्रांत, अनेक ठिकाणी ते सुरू असतं. यातून लहानमोठं कुणी सुटत नाही. आपला स्वतःचा प्रपंच करायला सवड नाही म्हणणारा माणूस, दुसरीकडं असे कितीतरी दुसऱ्यांचे प्रपंच फुकटच करीत असतो.

कुणाच्या तरी मुलीचं लग्न कसं होईल, एखाद्याच्या ऑफिसात त्याला काहीच काम कसं नाही, एखाद्याला यायला रोजच वेळ होतो, अमक्यातमक्यांचा लाईट रात्री खूप उशिरापर्यंत सुरू असतो - अशा

कोणत्या कारणासाठी इतरांचा प्रपंच आपण करीत असू हे सांगणं कठीण आहे.

बरं एखाद्याशी आपण संबंधित आहोत, त्याच्या प्रपंचावर, घडामोडींवर लक्ष ठेवणं आपली जबाबदारी आहे, असं असेल तर ते ठीकच आहे, पण असा कुठला संबंध नसताना जाणारा हा वेळ वाचण्यासारखा तर आहेच,पण अनेकदा तोच वेळ आपल्या स्वत:च्या प्रपंचाला, तो पुरेसा झाला असला तर व्यक्तिगत विकासाला, तोही पुरेसा झाला असला तर एखाद्या निकडीच्या सामाजिक, विधायक, कामाला देता येणं सहज शक्य आहे.

यातून एका बाजूला वेळेचा, मानवी शक्तीचा अपव्यय तर टळेलच, पण दुसऱ्या बाजूला वाचलेल्या अशा वेळेच्या सदुपयोगातून एखादी चांगली विद्या संपादन करता येईल, एखादं चांगलं प्रापंचिक काम तडीला जाईल, एखादं विधायक, सामाजिक काम उभं राहील.

पण त्यासाठी आपल्याकडून कळत-नकळत विनाकारण होणारे दुसऱ्यांचे प्रपंच लक्षात येण्याची आणि ते थांबवण्याची गरज आहे, नाही का ?

***

## ४१. आरास

विश्वासराव एक मोठी यात्रा करून नुकतेच परतले होते. भेट झाल्यावर त्यांचे अनुभव ऐकले. ओघाओघानंच त्यांनी पाहिलेल्या अनेक मंदिरांची, क्षेत्रांची चर्चा झाली. त्यातलं एक मंदिर त्यांच्या बोलण्यात वारंवार येत होतं. ते काही त्यांच्या डोक्यातून जात नव्हतं.

तिथली भव्य वास्तू, मोठमोठे सुंदर कोरीव काम केलेले असंख्य खांब, शोभिवंत प्रचंड दरवाजे, मेघडंबऱ्या, आतला विस्तीर्ण परिसर, त्यातली कापीव-रेखीव हिरवळ, चारी चौकातली कारंजी, कारंज्यांच्या रचनेतली कलात्मकता, त्यातली रंगबेरंगी दिव्यांची योजना, त्यामुळं पाण्यात-फवाऱ्यात निर्माण होणारी रंगांची उधळण, मुख्य मंदिरावरचा लक्षवेधी सोन्याचा कळस, सभामंडपातली कारपेट्स, हंड्याझुंबरांची शोभा, मार्बलची मनोरम मांडणी - अनेक दृष्टीनं ते मंदिर त्यांना वारंवार आठवत होतं.

ते राहून राहून म्हणत होते की, ते पाहिल्यानं या साऱ्या यात्रेचं सार्थक झालं. पुन्हा शक्य झालं तरी जाऊन यायची इच्छा आहे, खर्च-त्रास झाला तरी चालेल, किंबहुना ते येणाऱ्या-जाणाऱ्यालाही ते मंदिर अवश्य पाहायची शिफारस करीत होते.

म्हणून उत्सुकतेनं चौकशी केली की, इतकं सारं भव्यदिव्य मंदिर ज्याच्यासाठी उभं केलं तो तिथला देव कसा होता ? त्यावर मात्र हा प्रश्नच थोडा अनपेक्षित आणि गैरलागू वाटल्यासारखा त्यांचा चेहरा झाला. ते म्हणाले, तो कसा असायचाय, आपला नेहमीचाच, एकफूट दोनफूट उंचीची मूर्ती होती - तशी संगमरवरी होती, पण बाकीचं काही आठवत नाही, तशी लक्षात राहाण्यासारखी नव्हतीच. असं म्हणून त्यांनी तो विषय गुंडाळला नव्हे जवळजवळ झटकूनच टाकला.

एखादा हिरा जरी झाला तरी तो वापरता यावा, खुलून

दिसावा म्हणून कोंदणात बसवतात, हे खरंच आहे. हिऱ्याचं महत्त्व लक्षात यावं, वापर सोयीचा व्हावा म्हणून त्याला सुयोग्य असं कोंदणही घडवतात. हिऱ्याच्या मूल्याच्या प्रमाणात ते कोंदण वेळी सोन्याचंसुद्धा बनवलं जातं, हे आपण पाहातो. पण अर्थातच त्याचा उद्देश आपण विसरत नाही, इतकंच काय शेवटी खुलून दिसताना, लक्षात राहाताना मूळ हिराच लक्षात राहातो.

तसा तो राहावासुद्धा. पण त्या हिऱ्याच्या आकाराच्या मानानं मोठं, फारच नक्षीदार, आकर्षक, भव्य, अधिक मोलाच्या मटीरिअलचं कोंदण बनवलं तर मात्र अनेकदा वापरही कठीण, अन् पाहाणाऱ्याच्या लक्षातही हिऱ्यापेक्षा कोंदणच जास्त राहाण्याची शक्यता, ज्यानं कोंदणाचा मूळ उद्देशच हरवतो.

जी गोष्ट देवाची आणि त्याच्या आराशीची होते, जी गोष्ट हिऱ्याची आणि त्याच्या कोंदणाची होते तीच गोष्ट इतर अनेक गोष्टींचीही होताना आपल्याला दिसेल. माणसं आणि त्याचं घरदार, गवयाचं मूळ गाणं आणि त्याची साथसंगत - अशा अनेक बाबतीत ही गफलत दररोज घडताना आपल्याला आजूबाजूला दिसेल. म्हणून एका सत्पुरुषांनी आवर्जून सांगितलं आहे की, देवापेक्षा त्याची आरास मोठी नसावी.

त्यांच्या म्हणण्यातली तळमळ लक्षात घेण्याची गरज आहे. ती लक्षात न आली की, देव लक्षात न राहाता, मंदिरं लक्षात राहायला लागतात. मग आपणही तसंच काहीतरी करावंसं वाटू लागतं. त्यात माणसाची स्वाभाविक ओढ ही दृश्याकडं, बाह्यांगाकडं असल्यानं मखमली पडदे, अब्दागिऱ्या, छत्रचामरं, झेंडे, भव्य वास्तू, कमानी, तोरणं - अशा गोष्टींचं त्याला मुळातच आकर्षण असतं. त्यामुळं तो तिकडं सहज ओढला जातो.

मग सद्बुद्धीची प्रेरणा देणारा, चांगल्या गुणांची जोपासना करायला प्रेरणा देणारा, खऱ्या शांततेची-समाधानाची ओळख देणारा,

माणसाला पशुत्व विसरायला लावून माणुसकीची आणि देवत्वाची जाग देणारा तो देवच लक्षात राहात नाही, विसरला जातो आणि मग मंदिराचा मूळ हेतूच हरवतो.

या प्रवृत्तीकडं लक्ष देण्याची गरज तशी सार्वत्रिकच आहे. नाहीतर ताट चांदीचं, रांगोळी वेलबुट्टीची. मंद सुगंध उद्‌बत्तीचा हे सारं मनुष्य करतो, पण मूळ जेवणाकडं दुर्लक्ष असल्यानं निकृष्ट, अपुरं, असमाधानकारक अन्न पदरी पडतं, ज्यानं तहानभूकही भागत नाही अन् शक्तीही येत नाही.

म्हणून आज असं अनेक क्षेत्रात आढळेल की कोंदणं, आरास अन् बाह्यांगाला अवाजवी मोल आल्यानं उलाढाल खूप पण नफा कमी तसा व्यवहार खूप, कष्ट खूप पण मूळ माणुसकीचं नि देवत्वाचं समाधान कमी अशी अवस्था दिसते. ती अवस्था आपण विचार करून सुधारू शकू. अशी देवापेक्षा आरास मोठी करण्याचं टाळून ही अवस्था नक्की बदलू शकू, चांगली करू शकू.

***

## ४२. तुलनेतलं तारतम्य

मनुष्य बाजारात भाजी घ्यायला जावो,नाहीतर दुकानात साडी घ्यायला जावो, तो तुलना करूनच बरंवाईट, स्वस्तमहाग ठरवतो.अगदी कोथिंबिरीची जुडी जरी झाली तरी या भाजीवाल्यापेक्षा त्या भाजीवाल्याकडची अधिक चांगली आहे, हे तो मंडईत चार दुकानं हिंडून तुलनेनंच ठरवतो.

अगदी एकाच विक्रेत्याकडं एखादी भाजी असली तरी ती ताजी, चांगली, दर्जेदार आहे की नाही हे तो दुसरीकडची भाजी तुलनेला नसतानासुद्धा सांगू शकतो याचं कारणही उघडच आहे. दुसरी भाजी तुलना करायला समोर नसली तरी त्या प्रकारची चांगली भाजी त्यानं पूर्वी पाहिलेली असते, तिची माहिती त्याच्या आठवणीत पक्की असते, त्या माहितीशी पुन्हा तो करतो ती या भाजीची तुलनाच. मग या तुलनेनंच त्याला ही चांगली-वाईट ठरवता येते.

त्याच पद्धतीनं तो जगात माणसं, वस्तू साऱ्या बाबतीत ही तुलना सतत करीत राहातो. त्या तुलनेमुळंच शिक्षक बरे-वाईट ठरतात, मित्र बरे-वाईट ठरतात, कोर्स चांगला-वाईट ठरतो, पतीपत्नी-मुलं-नातेवाईक बरे-वाईट ठरतात अशा अनेक बाबतीत, अनेक पातळ्यांवर ही 'तुलना' सुरूच राहाते.

त्याचा उपयोग आपल्याला किती होतो हेही उघडच आहे. फक्त त्यातून एक सूक्ष्म दोष निर्माण होतो, याकडं मात्र आपलं क्वचितच लक्ष जातं. होतं काय की, तुलनेच्या या उपयोगामुळं आपली या तुलनेवर मोठी भिस्त निर्माण होते. तिच्यामुळं मिळणारं ज्ञान खरं आहे, तुलनेशिवाय चालणार नाही, तुलना सगळीकडं केलीच पाहिजे, ती सर्वत्र करणं योग्य आहे - असे काही समज मनात नकळतच तयार होतात.

तुलना हे माणसाच्या हातातलं एक शस्त्र आहे, हे विसरायला

होतं. ते माणसाच्या हातातलं एक शस्त्र आहे म्हणजेच माणसानं जरूर तेव्हा वापरायचं आणि शस्त्र जसं शांततेच्या काळात वापरणं अनावश्यक असतं, तसं हे तुलनेचं शस्त्रसुद्धा काही परिस्थितीत वापरणं अनावश्यक असतं. इतकंच काय, असं ते अनाठायी, उगीच, सवय झाली म्हणून, वापरलं तर अकारण जखम करू शकतं, शांतता घालवू शकतं, स्वास्थ्य बिघडवू शकतं, हे विसरायला होतं.

अनेकदा तर अशा अकारण केलेल्या तुलना,त्या करणाऱ्यांचं, त्यांच्या कुटुंबियांचं-संबंधितांचं स्वास्थ्य तर घालवतातच, पण त्यांच्या मागं विनाकारण काही खर्च आणि व्यापही निर्माण करतात, हे जरा सावधपणे पाहिलं तर कळतं.

होतं काय की, शेजारी एखादी वस्तू त्याच्या कुटुंबाला गरजेची म्हणून घेतो, आपल्या परिस्थितीची त्यांच्याशी अकारण तुलना, बेसावधपणे झाली की, तीच वस्तू आपल्या घरी आणण्याचा फुकटचा उद्योग आपल्या मनाला लागतो आणि न आणावी तरी तो स्वास्थ्य घालवतो आणि आणावी तरी विनाकारण खर्च आणि अडगळ वाढवूनही, आपलं स्वास्थ्य शेवटी घालवतोच.

अनेकदा आपली मुलं शिक्षण घेतात, त्यांच्यासाठी तुलनेनं त्यातल्या त्यात चांगली शाळा, पुस्तकं, साहित्य, अभ्यासिका - अशा अनेक प्रकारचं वातावरण आपण देतो, इतपत तुलनेचा उपयोग चांगलाच होतो. मुलंही त्याचा जास्तीत जास्त वापर करून, त्यांच्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करून यश मिळवतात. ते यश अनेकदा खरं कौतुकास्पद आणि आनंददायी असतं. पण ही अकारण, घातक आणि नकळत होणारी त्यांच्या यशाची इतरांच्या यशाशी बेसावध तुलना, तेच जिवापाड कष्ट करून मिळवलेलं कौतुकास्पद आणि आनंदाचं यश, निराशाजनक आणि दु:खाचं करून टाकते. बेसावध तुलनासुद्धा त्यांच्या त्यांच्या क्षमतांची तुलना न करता यशाची आणि फक्त मार्कांची तुलना करते आणि मग दु:खद चित्र निर्माण होतं, हे

लक्षात घेण्याची खरोखरच गरज आहे.

एखाद्या चांगल्या स्थळाला आपण भेट देतो. तिथं तिथला निसर्ग, वातावरण आनंददायकच असतं, पण त्यापूर्वी कधीतरी दुसऱ्या एखाद्या स्थळाला आपण भेट दिली होती, त्यावेळच्या आनंदाशी याची अकारणच तुलना होते, हा कमी ठरतो, उणा ठरतो आणि आजचा खरा आनंद आपल्याला पारखा होतो, आपले त्यासाठीचे आजचे सारे कष्ट मातीमोल होतात.

तुलना करायला लागलेलं मन अनेकदा हे विसरूनच जातं की, काही गोष्टींची तुलना करायचीच नसते तर काही गोष्टी ज्या आईच्या प्रेमासारख्या असतात, त्या तुलनेपलीकडच्या असतात. म्हणून आपणच जर सावध झालो तर तुलनेचा योग्य उपयोग करून जीवन सुखी करूच,पण अकारण, नकळत, अयोग्य तुलना ओळखून त्यामुळं येणारं दु:ख निराशा हेही आपण टाळू शकू.

***

## ४३. किमया

आरसा ही आपण दैनंदिन व्यवहारात वापरत असलेली वस्तू आहे. तिचा वापर इतका सहज आणि नकळत असतो की, 'आरसा' हा काही तिच्यावर वेगळा विचार करण्यासारखी वस्तू आहे, असं म्हटलं तरच आपल्याला आश्चर्य वाटेल. 'आरशात' बघायचं, त्यात विचार कसला करायचा, असंच कुणीही म्हणण्याची शक्यता आहे आणि ते आपल्यालाही पटेल. परंतु 'आरशा'चा विषय हा वाटतो इतका वरवरचा नि साधा खचितच नाही.

आरशाची साधी रचना पहा. वास्तविक, ती एक काचच आहे. जिच्यातून कुठल्याही बाजूनं, आतून वा बाहेरून पलीकडचं दिसतं असा गुणधर्म असलेली. पण या काचेचा एवढा एकच प्रकार नाही. आपल्याला कल्पना आहे की, अशा काचाही आपण पाहातो, वापरतो की, ज्यातून फक्त आपल्याच म्हणजे एकाच बाजूच्या माणसाला पलीकडचं दिसतं, दुसऱ्याला अलीकडचं किंवा आपण दिसत नाही.

याच्याच बरोबर दुधी रंगाच्या काचेनं प्रकाश इकडून तिकडं किंवा तिकडून इकडं जात असला, तरीही दोघांनाही अलीकडचं-पलीकडचं काही दिसू नये अशीही काच असलेली आपण पाहातो. आपल्याला जग दिसावं, पण आपण जगाला दिसू नये अशीही काच असलेली आपण पाहातो.

आपल्याला जग दिसावं पण आपण जगाला दिसू नये, अशी आपली धारणा असेल तर ती पूर्ण करणारी काच जशी बनवता येऊ शकते, त्याप्रमाणं आपण आणि जग यांच्यात संबंध तर असावा, पण कुणीच कुणाला दिसू नये अशी आपण भूमिका घेत असू तर तशीही काच बनवता येते.

काच ही जशी आपल्याआपल्या भूमिकेशी निगडीत आहे,

तशी ती माणसाच्या सामर्थ्याशीही निगडीत आहे. माणसाच्या दुबळ्या झालेल्या दृष्टीचं सामर्थ्य वाढवू शकणारा साधा चष्मा हाही या काचेच्याच वापराचा एक प्रकार आपण नेहमी पाहातो.

एवढंच नव्हे, तर एरवी साध्या डोळ्यांना दिसणं अशक्य असे सूक्ष्म जीवजंतू किंवा अत्यंत दूरवरचं दृश्य बघणंसुद्धा माणसाला शक्य करून देणारी दुर्बिणीसारखी किंवा सूक्ष्मदर्शक यंत्रासारखी उपकरणं हे याच काचेचे काही परिणामकारक उपयोग आहेत. आपल्याला दैनंदिन जीवनात आवश्यक असलेला प्रकाश देतादेताच आपल्याला नको असलेले ध्वनी आणि नको असलेली हवा टाळण्याचं सामर्थ्यही या काचेमध्ये आहे, हे आपण अनुभवतो.

अशा या अनेक पैलूंनी नटलेल्या नि आपल्या प्रकारानुसार माणसाच्या भूमिकेवर आणि धारणेवर प्रकाश टाकणाऱ्या काचेचा खरा प्रभावी आणि विचारप्रवर्तक वापर आरशाच्या रचनेत झाला आहे. याच काचेला एका बाजूनं चांदी किंवा पारा लावला की, हीच काच आता जगाकडं बघण्याचं साधन न राहाता स्वत:कडं बघण्याचा मार्ग बनते, हे एक आश्चर्य नव्हे का?

तसं जगामध्ये जगाला बघणं, दुसऱ्याला पाहाणं, दुसऱ्याचे गुणदोष, वर्तन सारं पाहाणं अतिशय प्रारंभिक आणि सोपंच मानलं गेलं आहे. पण स्वत:कडं पाहणं, प्रथमत: निदान आपलं बाह्यांग दिसणं आणि पुढं अंतरंग दिसणं हे किती कठीण आहे ! पण ते आपल्या प्रगतीच्या दृष्टीनं किती गरजेचं आहे, हे आपण सहज ओळखू शकू. 'स्वत:ला ओळखणं, स्वत:ला जाणणं' म्हणजे तर साऱ्या धर्मग्रंथांचं नि परमार्थाचं सार आहे आणि ते करायला अशी साधीशी काच एक पारा लावला की उपयोगी पडावी, हे आश्चर्यच नाही का ?

आरशाची रचना पाहिली तरी हे आपल्या सहज लक्षात येऊ शकेल की, जगाकडं नुसतंच बघत राहाण्याची काचेची सवय

झालेल्या आपणाला त्याच दृष्टीच्या काचेला कुठंतरी थांबण्याचा, खऱ्या जिज्ञासेचा, विरक्तीचा, विवेकाचा पारा लावण्याची गरज असते. तो लागला की, त्याच काचेचा आरसा होतो आणि आपल्याला जगाऐवजी खरा महत्त्वाचा असलेला मी आणि त्याही पलीकडचं 'आत्मदर्शन' घडू लागतं.

पण त्यासाठी काचेचा असा आरसा करायची किमया यावी लागते. अशा विधायक 'वैचारिक किमये'च्या विद्येचा परिचय व उपयोग आपल्या जीवनात घडो अशी सदिच्छा व्यक्त करून या चिंतनमालेला विराम देऊ या.

***

# डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
## (आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

**३७. बोधपाठ :** आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

**३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) :** आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

**३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) :** जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

**४०. गुरुतत्त्वतरंगिणी :** गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

**४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

**४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation**

**४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :** डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

**५५. शिदोरी :** व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

**५६. विचारविसावा :** विसावा देणारी विचारांची विद्या

**५७. सारविस्तार भाग २ :** चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

**५८. महाराजांची शाळा :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

**५९. साधनपदावली भाग २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

**६०. आरतीपुष्पमाला :** डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

**६१. विनवणीची वाणी :** चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

**६२. श्रद्धेची पहाट :** खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

**६३. उपासनामाला :** येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

**६४. पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

**६५. अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**६६. कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

**६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

**६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)**
श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

**६९. संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

**७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

**७१. उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

**७२. अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७३. श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

**७४. अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७५. अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

**७६. जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

**७७. स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

**७८. वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**७९. अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

**८०. वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**८१. भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

# आपलं जीवन प्रकाशमय करणारी सोपी विचारसूत्रं

